## सुरेंद्र पाथरकर

# प्रारब्ध



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# प्रारब्ध (The destiny)

(कथासंग्रह)

## लेखक : सुरेंद्र पाथरकर

# प्रारब्ध (The destiny)

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यासाठी अनेकांचा वेळ, पैसा व बुद्धी खर्च झाले आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्रारब्ध (The destiny) (कथासंग्रह)

लेखक : सुरेंद्र पाथरकर

पत्ता: ”आशीर्वाद”बंगला न. ०३, कोणार्क नगर-२, आडगाव शिवार, पंचवटी, नाशिक-४२२००३.

संपर्क: ०२५३-२३०३७८३, 8554836989,

EMAIL: patharkar. sp@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १२ जानेवारी २०२० (स्वा. विवेकानंद जयंती)

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



लेखकाचा अल्प परिचय:

नाव: सुरेंद्र पुरुषोत्तम पाथरकर,

जन्म तारीख: २२/०२/१९५५

निवृत्त अधीक्षक, सेन्ट्रल वेअरहाउस,

वडील कै. पुरुषोत्तम पाथरकर,

प्राथमिक शिक्षक, सरस्वती विद्यालय, नासिक.

पत्ता: "आशीर्वाद"बंगला न. ०३, कोणार्क नगर-२, आडगाव शिवार, पंचवटी, नाशिक-४२२००३.

संपर्क: ०२५३-२३०३७८३, 8554836989, EMAIL: patharkar. sp@gmail. com

आवडते लेखक: जी. ए. कुलकर्णी, पु. ल. देशपांडे, रणजीत देसाई, विश्वास पाटील, वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर, ग. दि. माडगुळकर इत्यादी.




सुरेंद्र पाथरकर लिखित "अंतिम लढत"

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/antim_ladhat_surendra_patharkar. pdf

## लेखकाचे मनोगत:

लहानपणापासून लिहिण्याची आवड. पूर्वी नासिकच्या गावकरी वर्तमानपत्रात काही सामाजिक विषयांवर लेख लिहले होते. सेन्ट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशनमधे ३९ वर्ष सेवा झाली, तेव्हा हेड ऑफिस दिल्लीवरून हिंदीमध्ये त्रिमासिक प्रसिद्ध होत असे त्यात माझ्या कथा शृंखला १, २, ३, ४, ५, ६, ७ अश्या प्रसिध्द झाल्या आहेत. नंतर कामाच्या व्यापामुळे निवृत्तीपर्यंत लिखाणाला वेळ देता आला नाही. फेब्रुवारी २०१५ ला निवृत्त झाल्यावर मात्र ठरवून लिखाणासाठी वेळ काठला.

माझी "अंतिम लढत" ही अतिशय सुंदर कथा असून ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे काही दिवसांपूर्वी ई-प्रकाशित झाली आहे, तरुणांसाठी मार्गदर्शक अशी कथा आहे. भारताच्या रक्षणासाठी राकेश सहभागी असलेले वेगवेगळे सिक्रेट मिशन अंगावर काटा आणणारे आहेत. प्रत्येकाने वाचलीच पाहिजे अशी ही कथा आहे. जीवन आनंदाने जगणे हे सगळ्यांचे उद्दिष्ट असतेच. पण सुरळीत आनंदाने चाललेल्या जीवनात अचानकपणे चोरपावलाने अनपेक्षित दुःख प्रवेश करते, त्याला धीराने खंबीरपणे तोंड देण्याशिवाय पर्याय नसतो. मनुष्य हतबल असतो. कधी अशी दुःख असाध्य आजारपणामुळे किवा आपल्याच जवळच्या माणसांमुळे झालेले असते. "मर्सी डेथ", " माझे ते माझे तुझे ते पण माझे" आणि "प्रारब्ध" या शेवटपर्यंत उत्सुकता वाढवणाऱ्या व वाचकांना आवडतील अशा कथा आहेत. जे होणारच असते त्याला पर्याय असूच शकत नाही. ही वास्तविकता या माझ्या कथा संग्रहात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तविकतेमुळे जीवनात किती उलथापालथ होऊ शकते याचे विदारक सत्य हेच या तीन कथा सांगतात. काहीही झाले तरी आनंदाने भविष्यातील उद्याच्या आनंदाच्या शोधात कौशल्याने जगावेच लागते.

सुरेंद्र पाथरकर

मोबाईल:8554836989

## प्रस्तावना

माझे स्नेही श्री. सुरेंद्र पाथरकर, यांनी आग्रहपूर्वक विनंती केली त्यांच्या विनंतीला मान देऊन आपणही दोन शब्द लिहावे या दृष्टिकोनातून थोडक्यात प्रस्तावना लिहिण्याचा प्रयत्न करत आहे.

श्री. सुरेंद्र पाथरकर साहेब कोणार्क नगर-२ येथे रहावयास आल्यापासून म्हणजे जवळपास १० ते १५ वर्षापासून त्यांचा व माझा परिचय आहे. ते शांत व मनमिळाऊ असल्यामुळे जरी आम्ही वेगवेगळया ठिकाणी नोकरी करत होतो तरी त्यांची व माझी मैत्री जमली. त्यांना समाजासाठी काहीतरी करण्याचा ध्यास पण आहे. सोसायटीतील मुलांसाठी ते कोणार्क नगर वाचनालयाच्या माध्यमातून निरनिराळे उपक्रम राबवत असतात. त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व आहे तेवढेच हिंदी व मराठीवर पण आहे.

सेन्ट्रल वेअरहाउसमधून अधीक्षक पदावरून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी लेखनाच्या आपल्या आवडल्या क्षेत्रात पाय टाकला. या कथा संग्रहातील “मर्सि डेथ” या कथेमधून माधवी वर कोसळलेल्या प्रसंगाचे वर्णन वाचतांना अंगावर काटाच येतो. तसेच नरोत्तम चा अपघात व त्यातून दोन्ही पाय निकामी होणे परंतु पायांचे रोपण करून त्याला डॉक्टर वाचवतात. या कथेत माधवी व नरोत्तम एकाच परिस्थितीतून जातात पण नशिबाची साथ जशी नरोत्तमला मिळते तशी माधवीला मिळत नाही. मानवी मनाची अवस्था, त्यात त्याला मानसिक आधाराची गरज, शरीरावर व मनावर होणारे आघात त्यातून कोलमडून पडणे म्हणजे काय असते? शिवाय भाऊबंदकी कुठल्या थरापर्यंत जाते याचे वास्तव दर्शन श्री. पाथरकर यांनी “ माझे ते माझे तुझे ते पण माझे “ या कथे मधून उत्कृष्ट पणे मांडलेले आहे. तसेच रक्ताची नाती सुद्धा सूड कसे घेऊ

शकतात, एवढी नाती कमजोर असतात का? स्वार्थासाठी वयाच्या उत्तरार्धातसुद्धा क्षणात परके करून टाकता येते का? अश्या असंख्य प्रश्नांची कोडी घालण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

या तिन्ही कथा एक वेगळाच विचार करावयास लावतात व वाचकांना शेवटपर्यंत वाचावयास भाग पाडतात. शेवटी जीवनात फक्त पैसाच महत्वाचा असतो का? मानवी व संस्कार काही आहे की नाही? वृद्धपकाळात जशी आपल्या माणसांची गरज भासते तसेच आजारपणात पैशाची अत्यंत आवशकता असते त्यासाठी नियोजनाचे महत्व जाताजाता लेखक सांगून जातो.

त्यांची “अंतिम लढत” ही अतिशय सुंदर कथा असून ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे काही दिवसांपूर्वी ई-प्रकाशित झाली आहे, तरुणांसाठी मार्गदर्शक अशी कथा आहे. भारताच्या रक्षणासाठी राकेश सहभागी असलेले वेगवेगळे सिक्रेट मिशन अंगावर कट आणणारे आहेत. प्रत्येकाने वाचलीच पाहिजे अशी ही कथा आहे. श्री. पाथरकर त्यांनी असेच लिहित राहो त्यासाठी त्यांना चांगले आरोग्य लाभो ही प्रार्थना करून त्यांच्या भावी लेखन कार्यासाठी शुभेच्छा.

Sd/-

नरेंद्र त्रिंबक कुलकर्णी,

उपाध्यक्ष कोणार्क नगर-२, वाचनालय,

बंगला नंबर ८६, कोणार्क नगर-२, आडगाव शिवार,

पंचवटी, नाशिक-३. मोबाईल: 9823437010.

अर्पणपत्रिका:

माझी पत्नी सौ. मिनल, जिने खंबीरपणे संसार शून्यातून उभा करण्यात नेहमीच मला साथ दिली

तसेच माझ्या जीवनातील संकट प्रसंगात मला आधार देऊन मार्गदर्शन करणाऱ्या अनेक ज्ञात/अज्ञात व्यक्तींना अर्पण...

सुरेंद्र पाथरकर

या कथासंग्रहातील सर्व कथा काल्पनिक असून त्यांचे कोणाही जीवित व्यक्तींशी साम्य आढळून आल्यास तो केवळ योगायोग मानावा.

# कथानुक्रम

मर्सी डेथ

प्रारब्ध

तुझे ते माझे



## मर्सी डेथ

डॉक्टर राजन सुधाकर माने. शहरातील नामांकित डॉक्टर. अत्यंत अद्ययावत, आधुनिक उपकरणांनी सज्ज असे दोन मजली हॉस्पिटल आकर्षक डिजिटल बोर्डामुळे, हाय वे वरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांचे लक्ष वेधून घेत होते. रात्रीचे १० वाजले होते. सर्वच वार्डात शांतता दिसत असली तरी इमरजन्सी वार्डातून वेदनेचे, तळमळण्याचे आवाज येत होते. सिस्टर्स, असिस्टंट डॉक्टर्स प्रत्येक पेशंट जवळ येऊन त्यांना औषध, इंजक्शन देण्यात मग्न होते.

साधारण रात्रीचे १० वाजून ४५ मिनिटे झाली असतील हॉस्पिटलच्या आवारात ॲम्बुलंसने मोठ्याने सायरन वाजवत प्रवेश केला. हॉस्पिटल मधील हजर असलेल्या सर्व स्टाफने ॲम्बुलंसमधून आणलेल्या पेशंटला स्ट्रेचरवर ठेवण्यास सुरवात केली. असिस्टंट डॉक्टर सामंत यांनी पेशंटची नाडी तपासली. पेशंट २२ वर्षाची तरूण मुलगी होती. अंगावरचे कपडे पूर्णपणे जळून अंगाला चिटकलेले होते. डॉक्टर सामंतानी त्वरित डॉक्टर राजन यांना मोबाईल वरून फोन करून तातडीने बोलावले व पेशंटला इमरजन्सी वार्डात दाखल करून घेतले. पोलिसांना फोन करून घटनेची माहिती दिली. पेशंट बरोबर गावातले 3 लोक व मुलीचे काका वय ६५ वर्षेचे शंकरराव आलेले होते. शंकररावानी हॉस्पिटलच्या कौंटरवर जाऊन सिस्टरने दिलेला फॉर्म तिच्याच मदतीने भरण्यास सुरवात केली. पेशंटचे नाव: कुमारी माधवी, वय २२ वर्षे, शिक्षण १०वी पास. जळीत घटना.

दुर्घटनेचे सवीस्तर वर्णन: ३० किलोमीटर अंतरावर असलेले तळेगाव. गावातील रमेश पाटलांच्या मुलाच्या लग्नाची वरात संध्याकाळी ७ वाजता निघाली होती. वरातीला गावातल्या लोकांनी बरीच गर्दी केली होती. गावात ८ तासाचे लोड शेडींग असल्यामुळे पाटलांनी १० पेट्रोमॅक्सची ऑर्डर दिली होती. पेट्रोमॅक्सच्या उजेडात व बॅंडच्या तालात गावातील तरुण, तरुणी नाचत होते. वरातीतील घोड्याजवळ काही लहान मुले पण नाचत होती. अचानक घोड्याच्या पायांमध्ये पाच वर्षाचा राहुल नावाचा मुलगा आल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी, जवळ चालत असलेल्या नानांनी गडबडीने मुलाला घोड्याच्या पायांमधून ओढून बाहेर काढले. बायकांच्या

गर्दीतल्या राहुलच्या आईने ही घटना दुरून बघितली व त्या दिशेने धाव घेतली. धावत येतांना तिचा धक्का एका ६० वर्षाच्या वृद्ध बाईस लागला, व ती आजी धडपडून पेट्रोमॅक्स डोक्यावर घेतलेल्या माणसाच्या अंगावर आदळली. बाजूनेच माधवी आपल्या मैत्रणी बरोबर उत्साहाने चालत होती, तिच्या अगदी जवळ पेट्रोमॅक्स उलटला व मोठा भडका उडाला. माधवीच्या किंकाळयानी वरातीतील लोक सैरभैर झाले, काहींनी त्वरित आगीतून माधवीला बाजूला काढले व आग विझवण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरु केला. पाटलांनी ताबडतोब फोन वरून फायरबिग्रेड, ॲम्बुलंस, पोलीस, यांना घटनेची माहिती दिली.

ही घटना बघताच माधवी काका शंकरराव चक्कर येऊन पडले व बेशुद्ध झाले. गावातील तरूण डॉक्टर तामंणकर यांनी त्वरित प्रथमोपचार करून त्यांना शुद्धीवर आणले. फायरबिग्रेड, ॲम्बुलंस, पोलीस घटना स्थळी पोहचले होते व स्थिती सामान्य करण्यास सुरुवात केली होती.

पाटलांनी त्वरित जळीत माधवीला व तिचे काका शंकररावांना ॲम्बुलंस मध्ये बसवून सोबत गावातील ३ समजदार, सुशिक्षीत लोकांना बसवून जिल्ह्यातील प्रसिद्ध डॉक्टर. राजन सुधाकर माने यांच्या हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी रवाना केले. वराडी मंडळींना, प्रतिष्ठित पाहुण्यांना शांततेचे आवाहन करून स्वतः लग्न मंडपाकडे कार्य निर्विघ्न पार पडण्यासाठी रवाना झाले.

शंकरराव व त्याचा सोबत आलेले गावातील लोक गणू, मधु, व तात्या इमरजन्सी वार्डाच्या काचेतून जळीत माधवी वर होत असलेल्या उपचारांकडे बघत होते. शंकररावाच्या डोळयातील अश्रू आटून गेले होते. खिडकीचा आधार घेऊन थरथर कापत उभे होते. माधवीला सफेद जाळीदार कपड्यात पोकळ आवरणा खाली ठेवण्यात आले होते. ऑपरेशन थेटरमध्ये नेण्याची सर्व स्टाफची लगबग चालू होती. इतक्यात डॉक्टर. राजन यांनी त्यांच्या केबिनमधे प्रवेश केला. केसची माहिती घेतल्यानंतर मोबोईल वरून मुंबईचे नावाजलेले डॉक्टर नरेन्द्र पोतनीस यांना विनंती करून बोलावून घेतले.

पहाटे २ वाजून ५० मिनिटांनी डॉक्टर राजन ऑपरेशन थियटरमधून बाहेर आले. थकलेले दिसत होते, धाडकन केबिनचा दरवाजा उघडून प्रवेश केला व आराम खुर्चीत बसून डोळे मिटून घेतले. दुर्दैवी माधवीचे जळीत शरीर डोळ्यासमोरून फिरत होते. माधवी ६८ % जळाली होती. प्रयत्नांची पराकाष्ठा करून माधवीचा श्वासोश्वास नियंत्रित झाल्यामुळे आशेचे किरण दिसत होते. डॉक्टरांनी शंकररावांना केबिन मध्ये बोलावून घेतले. थरथर कापत शंकररावांनी काठीचा आधार घेत प्रवेश केला.

डॉक्टरांनी शंकररावांना फ्रीज मधील गार पाणी पिण्यास दिले. शंकरराव थोडेसे सावरल्यावर डॉक्टरांनी गंभीर होत बोलण्यास सुरवात केली.

“काका दुर्दैवाने माधवी बरोबर झालेली जळीत घटना भयंकर आहे. पण डॉक्टर म्हणून मला तुम्हाला केस बाबत सविस्तर कल्पना देणे जरुरी आहे. माधवी ६८ % जळीत आहे. हृदय व मेंदू कडील रक्त पुरवठा अनियमित होत आहे. व्हेनटीलेटर ची व्यवस्था ताबडतोब केलेली आहे. कमरेखालचे शरीराचे बरेसचे स्कीन जळून बोन्सला चिकटलेले आहे. शरीरातील ब्लड सर्कूलेशनची व्यवस्था कोलमडली आहे. पण सर्व आशा संपली असे प्लीज समजू नका. मी प्रयत्न करणारच आहे. माझ्या प्रयत्नाना यश देण्यास दत्तगुरू समर्थ आहेतच. गावच्या लोकांनी त्वरित माधवीला हॉस्पिटल मध्ये आणण्यास जी मदत केली त्यामुळेच ताबडतोब उपचार चालू करता आले. मी मुंबईचे नावाजलेले डॉक्टर नरेन्द्र पोतनीस यांना विनंती करून बोलावून घेतले आहे. तरीपण अजून पुढचे ४८ तास फारच अवघड आहे. शरीराने उपचारांना साथ देणे गरजेचे आहे. त्यासाठी शान्तपणे देवाची प्रार्थना करा. मी येथेच केबिनमधे माधवीची देखभाल करण्यासाठी थांबणार आहे. या आता”.

शंकररावांनी बरोबर आलेल्या गणू, मधु, व तात्या बरोबर हॉस्पिटलच्या आवारातील झाडाखाली पथारी पसरली. कोंबडा आर्वायिला थोडाच वेळ बाकी होता. गणू, मधु, व तात्या यांनी घोरण्यास सुरवात केली. पण शंकरराव डोळे सताड उघडे ठेवून विचारात डुंबून गेले. माधवी त्याची पुतणी त्याच्या लहान भावाची लेक. पण लहान भाऊ गणपा व त्याची बायको सुनंदा ऐन उमेदीत हायवेवरून गण्पाच्या सासरी जात असतांना, मोटारसायकलला ट्रकने धडक

दिल्याने अपघात झाला होता व दोघांचाही जागेवरच मृत्यू झाला होता. साल आठवत नव्हते पण त्या घटनेला बरीच वर्ष झाली होती. माधवी तेव्हा ३ वर्षाची होती. शंकररावांनी व त्यांच्या पत्नीने मुलबाळ होण्यासाठी बरेच औषध-उपचार केले पण कूस उजवलीच नाही. तेव्हा दोघांनी ठरवले की माधवीलाच आपली मुलगी मानून तिचा सांभाळ करायचा, तिला शिकवायचे, मोठे करायचे व चांगले स्थळ बघून लग्न करून द्यायचे. परंतु माधवी नववित शिकत असताना शंकररावांच्या पत्नीचा कॅंसर रोग आटोक्याबाहेर गेला व तिचा अत्यंत हलाखीत मृत्यू झाला. एकुलता एक जीवन जगण्याचा आधार माधवी आता दुर्दैवाने मृत्यूशी झुंज देत होती.

सकाळी ११ वाजता मुंबईचे नावाजलेले डॉक्टर नरेन्द्र पोतनीस यांच्या पांढऱ्याशुभ्र इनोव्हा कारने हॉस्पिटलच्या आवारात प्रवेश केला. डॉक्टर नरेन्द्र पोतनीस व डॉक्टर राजन यांनी त्वरेने ऑपरेशन थियटरमधे प्रवेश केला बरोबर ३ जुनियर लेडी डॉक्टर व दोन नर्सेस होत्या. ऑपरेशन थिएटरचा दरवाजा बंद झाला. लाल लाईटच्या प्रकाशाने डोळे दिपत होते. शंकरराव, गणू, मधु, व तात्या बाहेरच्या बाकावर तहानभूक विसरून ऑपरेशन थियटरच्या बंद दरवाजाकडे टक लाऊन बघत बसले होते. सर्व डॉक्टरांची टीम दुपारी ३ वाजून ४० मिनिटांनी ऑपरेशन थियटरच्या बाहेर आली. डॉक्टर राजन यांच्या केबिनमधे बसल्यावर सर्वांना कोल्ड ड्रीक सर्व करण्यात आले. डॉक्टर पोतनीसांनी इग्लंडला असलेल्या त्याचा मित्र डॉक्टर जॉन्सन याच्या बरोबर माधवीच्या जळीत केस संदर्भात चर्चा करून पुढच्या ट्रीटमेंटची नोंद आपल्या डायरीत करून घेतली.

पुढचे १५ दिवस सर्व टीम दिवस रात्र माधवीला सर्व प्रकारची मेडिकल उपचार उपलब्ध करून आपापले नैपुण्य पणाला लाऊन माधवीच्या शरीरातील रक्तअभिसरणाचे कार्य सुरळीत चालू होण्यासाठी प्रयत्न करीत होते. माधवीने आतापर्यंतच्या उपचारांना ३० टक्के प्रतिसाद दिला होता. हृदय व मेंदू च्या कार्यात अनियमितता आढळून आली होती. माधवी कोमात गेली होती. नळीने पातळ द्रव पदार्थ अन्नाला पर्याय म्हणून देण्यात येत होते.

शंकररावांच्या बरोबर आलेली गावातील मंडळी गणू, मधु, व तात्या, त्यांच्या आग्रहाखातर गावाला निघून गेली होती. गावातील पाटलांनी त्यांचा नोकर हणमंत याला शंकररावांच्या बरोबर मदतीसाठी हॉस्पिटलमधे रहाण्यास पाठवले. झाडाखाली लाकडाच्या चुलीवर पिठलं भात/भाकरी करून दोघे दिवस काढत होते. हॉस्पिटलमधील नर्स कडून माधवीची प्रगती समजत होती आशेचे किरण मृगजळासारखे का होईना दिसत असल्यामुळे शंकररावांना या वयातसुद्धा जगण्याचे कारण मिळाले होते. शंकररावांनी गावच्या सावकाराकडे पाच पैकी दोन एकर जमीन माधवीच्या हॉस्पिटलमधील खर्चासाठी गहाण टाकली होती. दिवस उजाडत होता, मावळत होता. दिवस, महिने मागे पडत होते. हॉस्पिटलमधे माधवीला दाखल करून पाच महिने उलटले होते. शंकररावांचे जवळचे पैसे संपण्याच्या मार्गावर होते. माधवीने डोळे उघडले नसले तरी अस्पष्ट अडखळत बोलण्याइतकी प्रगती केली होती.

माधवीला आई, वडील आठवत नव्हते पण काका शंकररावांवर तिचे जीव की प्राण प्रेम होते. जगात त्याच्या शिवाय तिला कोणीस नातेबाईक नव्हते. अर्धा अंग जळीत शरीर वेदनेने तडफडत होते. सर्व शरीराशी संपर्क नसल्यासारखे वाटत होते. औषधांच्या परिणामांमुळे तीव्र वेदनेची नकळत जाणीव होत होती. माधवीचे मन मात्र विचार करू लागले. नशिबाला दोष देण्या खेरीज काहीच सुचत नव्हते. कोणीही मुद्दाम तिला जाळण्याचा प्रयत्न केला नव्हता. अचानक, अकल्पित घडलेले घटना. याचेच जास्त वाइट वाटत होते की काकांना या वयात आपल्या दुर्देवी अपघाताने दुःखाच्या खाइत लोटले होते. सगळयाच स्वप्नांचा चक्काचूर झाला होता. काकांचे उतारवयात त्यांची काळजी घेणारे सुद्धा कोणी नव्हते. आपल्या आजारपणामुळे काकांना होत असलेल्या तीव्र शाररीक, आर्थिक ओढाताणीची कल्पना माधवीला अस्वस्थ करीत होती. औषध उपचारांमुळे काही प्रमाणात आशेचे किरण दिसत असले तरी भविष्यात पूर्वीसारखे सर्वसाधारण आयुष्य जगणे अशक्य असणार आहे हा विचार माधवीच्या मनात पक्का होत होता. आत्महत्या करण्याचे विचार अधून मधून मनात येत होते पण हिम्मत होत नव्हती.

डॉक्टर राजन हॉस्पिटलच्या रोजच्या व्यापात बिझी झालेले दिसत असले तरी माधवीच्या केसचे विचार त्यांचा मनात सारखा पाठपुरावा करत होता. माधवी कधीच पूर्णपणे बरी होऊ शकणार नाही याची त्यांना पूर्ण कल्पना आलेली होती. उमळत असलेल्या कळीचे फुल

होण्याआधीच सुकून जावे तसेच माधवीचे तारुण्याच्या उंबरठ्यावर असतांनाच हे जग सोडून जाण्याची दुर्देवी वेळ नक्कीच येणार होती. फक्त ही घटना किती दिवसांनी, महिन्यांनी, अथवा वर्षांनी होईल याचा काहीच अंदाज लागणे शक्य नव्हते. त्याच बरोबर शंकररावांना वृद्धपकाळात कुठल्या कुठल्या दिव्यांना सामोरे जावे लागत असेल याची कल्पना डॉक्टरांना होती. समाजबांधलकी हा डॉक्टरी व्यवसायाचा अविभाज्य भाग डॉक्टर मानत आले होते.

डॉक्टरांनी तीन किलोमीटर वरील आपल्या बंगल्याच्या आवारातील औटहाउस नोकरांकडून स्वच्छ करून घेतले. दोन बेड, वीज पाणी व सर्व सोइंनी युक्त हॉल होता. एके दिवशी सकाळी डॉक्टर स्वतः शंकररावांना त्यांची समजूत काढून औटहाउसमधे घेऊन आले. त्यांना आराम करण्यास सांगून माधवीला दोन तासात इथे शिफ्ट करीत असल्याचे सागितले व हॉस्पिटलकडे निघून गेले. अचानक होत असलेल्या बदलांमुळे शंकररावांना काहीच समजेनासे झाले होते. डॉक्टरावरील विश्वास व माधवी उपचारांना देत असलेला रीस्पोंस समोर दिसत असतांना डॉक्टरांनी आपल्याला व माधवीला इथे का शिफ्ट केले असावे हे

शंकररावांना समजत नव्हते. हॉस्पिटलमधील आय. सी. यु. पेक्षा ही जागा फारच आरामदायक व सुखसोईनी युक्त होती. घडत असलेल्या घटना कोणाजवळ तरी बोलून मन हलके करावे असे त्यांना मनापासून वाटत होते. पण तशी जिवाभावाची कोणीच व्यक्ती आयुष्यात आता उरली नव्हती. प्रत्येक क्षणाला समोर आलेल्या प्रसंगाला सामोरे जाण्याशिवाय पर्याय उरला नव्हता.

दुपार टळून सूर्य माळवायला थोडाच अवधी बाकी असतांना हॉस्पिटलची ॲम्बुलंस माधवीला घेऊन आली. बेशुद्ध माधवीला कॉटवर ठेऊन बाजूला सर्व लाईफ़ सरव्हायवलसाठी उपयुक्त उपकरण ठेवण्यात आली. बरोबर आलेल्या सहकारी डॉक्टरांनी मनासारखी व्यवस्था झाल्यावर नर्सला योग्य सूचना दिल्या व दुसरी नर्स येईपर्यंत माधवीच्या जवळपासच राहून तिची देखभाल करण्यास सांगीतले. कारण माधवी २४ तास ओब्जरवेशन खाली राहणार होती. शंकररावांना सर्व हालचाली निमुटपणे पहात राहण्यापलीकडे काही सुचत नव्हते. नर्सने खिडक्यांचे पडदे ओढून घेतले व फ़ॅनचा स्पीड कमी केला. बरोबर आणलेली चहाचे सामान काढून

जवळ असलेली उभ्याच्या ओट्यावर असलेली ग्यासची शेगडी चालू करून शंकररावांसाठी चहाचे आधण ठेवले.

शंकररावांचा रात्री कधी डोळा लागला समजलेच नाही. सकाळी डॉक्टरांनीच त्यांना उठवले. माधवीला तपासून डॉक्टर खुर्चीत बसले. शंकररावांच्या मलून चेहऱ्याकडे बघवत नव्हते. कशी व कुठून सुरवात करावी या विचारात डॉक्टर पडले होते. तुम्हाला मी काकाच बोलावणार आहे डॉक्टरांनी अधिकाराने शंकररावांचा हात हातात घेऊन गंभीरपणे बोलण्यास सुरवात केली. माधवी तुमची पुतणी. तुम्हाला दोघांना कोणीच नातेबाईक नाहीत याची मला कल्पना आहे. तुमची आर्थिक परिस्थिती हलाखीची नसली तरी सुस्थितीत आहे असे वाटत नाही कारण माधवीला प्रोलोंग उपचारांची आवश्यकता आहे. सध्या माधवी कोमात आहे. अश्या पेशंटची रिकव्हरी होतच नाही असे नाही पण त्याला किती वेळ लागेल याचा अंदाज नसतो. तुम्ही मन घट्ट करून सावरले पाहिजे. माधवीला होत असलेल्या यातनांचा विचार करणेसुद्धा अनुभवाखेरीज शक्य नाही. पण तुम्हाला माहित नसलेली एक गोष्ट जी मी दडवून ठेवली होती ती आता सांगावीच लागणार आहे. माधवीची ६८% भाजल्यामुळे उत्तमातील उत्तम उपचारानंतर सूद्धा पूर्णपणे बरी होण्याची शक्यता नसल्यात जमा आहे. दोन दिवसापूर्वी माधवीने उपचार चालू असतांना व थोडीशी बोलण्याच्या अवस्थेत असतांना मला अत्यंत अडखळत तिच्या मनातील एक इच्छा व्यक्त केली आहे. डॉक्टरांनी पुढे बोलण्याआधी जवळच्या ग्लास मधील दोन घोट पाणी पोटात ढकलले. पुढचे शब्द ओठांवर येण्यास तयार नव्हते. शंकरराव पूर्णपणे गर्भगळीत होऊन डॉक्टरांकडे बघत होते.

डॉक्टरांनी त्वरेने मधेच उठून माधवीला लावलेल्या सलाईनमधे एक ईनजक्शन इन्सर्ट केले, नर्सला लक्ष ठेवण्यास सांगून परत चेअरवर येऊन बसले. शंकरराव तुम्ही तुमचे मन घट्ट केले पाहिजे. मी तुम्हाला घाबरण्यासाठी काहीही सांगत नसून असलेल्या परिस्थितीवर काही मार्ग निघणार आहे का यावर तुमचे विचार कळण्यासाठी तुमच्या बरोबर चर्चा टाळू शकत नाही. माधवीने अत्यंत करुणपणे मला सांगितले की तिला मृत्यू हवा आहे. सहन करण्यापलीकडे असलेल्या वेदनांपासून कायमची सुटका पाहिजे आहे. माझ्या काकांना मी उरलेले आयुष्य वेदनेने तळमळत काढणे कधीच आवडणार नाही. ज्याप्रमाणे कोणाचाही जीव वाचवणे हे फार मोठे पुण्य

मानले जाते त्याच प्रमाणे एखाद्याला नॉर्मल जीवन जगणे अशक्य असल्यास त्यास समाजाने मृत्यूला कवटाळण्याची परवानगी देऊन त्याप्रमाणे कृती करावी अशी माझी विनंती आहे. याचा अर्थ मी कुठल्याही वाईट कृत्याला घाबरून आत्महत्या करण्याची परवानगी मागत आहे असे नाही तर माझ्यावर कीव करून होत असलेले हाल व भविष्यात होणार असलेल्या दुबळया, असहाय्य शरीराची तडफड बघवणार नसेल तर जीवनातून, मला सगळयाच्या सम्मतिने मृत्यची भिक द्यावी अशी नम्र विनंती..... पुढचे शब्द बोलण्याचे त्राण माधवी सहन करू शकली नाही. माझीही मनस्थिती बधीर झाली होती. नर्सला माधवीकडे लक्ष ठेवण्यास सांगून मी केबिनमधे जाऊन बसलो. डोळयातून येणारे अश्रू आवरत नव्हते.

शंकररावांना आपण कुठलेतरी वाईट स्वप्न पहात आहोत असे वाटत होते. कानांवर विश्वासच बसत नव्हता. डॉक्टरांबद्दल असलेली आदर भावना जाऊन अत्यंत क्रोध येत होता. असे अविचार माधवीच्या मनात कसे येतात याचे त्यांना आचर्य वाटत होते. माझ्या जगण्याचे एकमेव कारण फक्त माधवीच्या सुखातच आहे ह्याची माधवीला कल्पना नसणे शक्यच नव्हते. डॉक्टरांनी हलवल्यावर शंकरराव वर्तमान काळात आले. अविश्वासाने, हतबल होऊन, त्यांनी डॉक्टरांच्या मांडीवर डोके धेऊन धायमोकलून रडू लागले. शंकररावांना शांत करणे डॉक्टरांना शक्य होते पण त्यांनी तसे न करता शंकररावांना मानसिक ताणातून नॉर्मल होऊ देण्याचा मार्ग स्वीकारला. बराचवेळ शंकररावांचे हुंदके देणे चालूच होते. नर्सने पाण्याचा ग्लास त्यांच्या हातात दिला व डॉक्टरांनी दिलेल्या इशाऱ्या प्रमाणे चहा बनवण्यास सुरवात केली. शंकरराव थोडेसे सावरल्यावर डॉक्टरांनी परत सावधपणे बोलण्यास सुरवात केली. शंकरराव तुम्ही सांगा मनुष्याचा जीवन जगण्याचा उद्देश काय असतो. जीवनात आनंद असणे. जीवनात आनंद असणे यात दोन गोष्टी आल्या एक आपण स्वतः जीवनात आनंदी असणे त्याच बरोबर आपण दुसऱ्याच्या जीवनात आनंद निर्माण करण्यास कारणीभूत असणे. स्वतःचे जीवन कसे आनंदात जाईल असा प्रयत्न सगळेच कसोसीने करतांना दिसतील, त्यातच जीवनाचे सार्थक मानताना दिसतील. पण कधी दुसऱ्याच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास असा अनुभव येईल की आपल्याला अपरिमित आनंद नक्कीच मिळतो व दुसऱ्याला झालेल्या आनंदाच्या अनुभूतीने आपला स्वतःचा आनंद द्विगुणित होतो.

आता आपण दुसऱ्याला कसा आनंद देऊ शकतो, हे त्या वेळेच्या परिस्थितीवर अवलंबुन असू शकते. कधी कधी आपण दुसऱ्यापासून दूर गेल्याने त्यांना आनंद मिळू शकतो. यालाच आपण सॅक्रीफाईस म्हणतो. आपल्याला अत्यंत प्रिय, आवश्यक असलेली गोष्ट दुसऱ्याच्या आनंदासाठी सोडून देणे, आपण त्या गोष्टीचा त्याग करणे, त्यासाठी स्वतःचे मन मारणे हेच सॅक्रीफाईस आहे. म्हणून एखाद्याने स्वतःला दुखःतून कायमची मुक्तता मिळणार असेल तर मृत्यूची मागणी केल्यास व त्यातच त्याचा असणार आहे याची खात्री पटल्यास आपण सर्वांनी माणुसकीला जागून त्याला मदत करावयास नको का? हे सर्व बोलणे शंकररावांच्या डोक्यावरून जात होते. परिस्थितीने त्यांना कोंडीत पकडले होते. आताच्या परिस्थितीत काय बरोबर काय चूक हे समजणे शक्य नव्हते. डोक्यात विचारांचे थैमान होते.

माधवीला व शंकररावांना औटहाउस राहून आज एक वर्ष दोन महिने पूर्ण झाले होते. माधवी कोमातच होती. अन्नपाणी नळीवाटे देण्यात येत होते. दिवस उजाडत होता मावळत होता. शंकरराव थकलेले दिसत होते. जेवणावरची वासना उडून गेली होती. मृत्यू आता आपल्याला कधीही गाठू शकतो या विचारांनी बोटावर दिवस मोजत होते. डॉक्टर नरेन्द्र पोतनीस यांची आज डॉक्टर राजन यांच्या हॉस्पिटला व्हिजीट होती. दुपारी १२. ३० वाजता डॉक्टर नरेन्द्र यांचे आगमन झाले. सर्व वार्डातून रुटीन व्हिजीट झाल्यावर त्यांची डॉक्टर राजन यांच्या बरोबर त्यांचाच केबिनमधे भेट झाली. कुशल मंगल ची सुरवात होऊन दोघेही नेहमीच्या पेशंटच्या जगातील अनुभव शेअर करू लागले. डॉक्टर नरेन्द्रनी सांगितले की मुंबईला त्यांच्या नर्सिगहोममधे एक लोकल ट्रेनमुळे झालेल्या अपघाताची केस आली. ३५ वर्षाचा नरोत्तम नावाचा माणूस रल्वे रूळ क्रोस करत होता. हा त्याचा नक्कीच अपराध होता याची त्याला जाणीव पण होती परंतु वडिलांना छातीत प्रचंड वेदना झाल्यामुळे दवाखान्यात दाखल केले होते व त्यांनाच भेटण्यास नरोत्तम घाईघाईने ऑफिसमध्ये रजा टाकून दवाखान्याकडे चालला होता.

दुर्देवाने समोरून कल्याणला जाणारी फास्ट लोकल आली व क्षणार्धात नरोत्तम लोकल खाली सापडला. त्याचे दोन्ही पाय गुडघ्या खाली तुटून वेगळे झाले होते. दवाखान्यात आणे पर्यंत त्याची जगण्याची आशा काहीच नव्हती. परंतु सुदैवाने देवाच्या कृपेने व सर्व डॉक्टरांनी घेतलेल्या अथक परिश्रमाने त्याचे प्राण वाचले. पण आत्ताच त्याची दुखाची खरी सुरवात झाली होती.

वडिलांचा दवाखान्यात मृत्यू झाला होता. पत्नी व एकुलती एक १० वर्षाची मुलगी उषाजवळ बसून होते. नरोत्तम कोमातच होता. मोठा भाऊ व त्याचा परिवार नासिकला रहात होते. बाकी नातेबाईक असून नसल्यासारखे होते. नरोत्तम अजूनही आय. सी. यु. मधेच आहे.

सर्व घटना डॉक्टर राजन यांनी सविस्तर पणे ऐंकून घेतल्यावर मोठ्ठा श्वास घेतला. माधवीची व नरोत्तमची केस एका समान पातळीवर येऊन थांबली होती. डॉक्टर राजन यांनी, डॉक्टर नरेन्द्र यांचे लक्ष वेधून घेत बोलण्यास सुरवात केली. सर मर्सी डेथ ही कल्पना परदेशात मान्य आहे. काही देशात ही कल्पना मान्यतेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. याबाबत भारतात अजून बरीच विचारांची प्रगल्भता अपेक्षीत आहे. मर्सी डेथचे सर्वसाधारणपणे दोन प्रकार मानतात. **ईच्छा मरण जे एखाद्या व्यक्तीने होत असलेल्या मरणप्राय यातनातून कायमसाठीची मुक्त होण्याची समाजाला, कायद्याला केलेली विनंती.** त्याच प्रकारे **एखाद्या व्यक्तीस मरणप्राय यातना होत असतील व त्या कोणाजवळही व्यक्त करण्यास असमर्थ असेल पण त्याची जाणीव इतरांना होत असेल तर, समाजाने, कायद्याने मिळून त्या व्यक्तीची मरणप्राय यातनानमधून सहमतीने कायद्याने कायमची मुक्तता करणे म्हणजे दया मरण**, हे दोन्ही विचार भारतात रुजायला अजून अनेक वर्ष लागू शकतील.

आपण आत्ता चर्चा करीत असलेले दोन्ही मुद्दे फारच गंभीर व संवेदनशील आहेत. मर्सी डेथचा प्रयोग भारतात करणे फारच रिस्की आहे, त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता फारच आहे. एखाद्याची संपत्ती मिळवण्यासाठी किंवा एखाद्याबद्दल वैयक्तिक दुश्मनी असेल तर अशा प्रकारच्या कायद्याचा समाजकंटकांकडून दुरुपयोग होऊ शकतो. पण असा कायदा झाल्यास फक्त सर्व नातेबाईकांच्या सहमतीनेच नाही तर अशी ईच्छा मरणाची मागणी करणारी व्यक्तीची ईच्छा, वरिष्ठ पोलीस अधिकारी, सरकारी वकील, न्यायाधीश, सरकार मान्य डॉक्टर व समाजातील आवश्यक मान्यवर यांच्या चमूसमोर सार्वजनिकरित्या सगळयासमोर पूर्ण केली पाहिजे. अशा व्यक्तीला सगळयांसमोर, ठरलेल्या वेळी, सगळयाच्या उपस्थितीत योग्य डॉक्टरांकडून स्लो पोईझनचे इंजक्शन देण्यात येते. कुठल्याही प्रकारच्या यातना न होता ती व्यक्ती मृत होते. अशीच प्रक्रिया दया मरणाच्या बाबतीत करणे जरुरी आहे. अशा परिस्थितीत संबंधित व्यक्ती कुठलेही पापात सहभागी आहेत अशी भावना मनात येणे चूक आहे. एखाद्या व्यक्तीची भयंकर यातनांमधून सुटका करणे फार मोठे पुण्याचे काम आहे हे विसरून चालणार नाही.

खूपच गंभीर विषयावर चर्चा होत असल्याने डॉक्टर नरेन्द्र यांना कॉफी पिण्याची गरज वाटली. त्यांनी डॉक्टर राजन यांना कॉफीची व्यवस्था करण्यास सांगितले. बराच वेळ कॉल बेलला नर्सने प्रतिसाद न दिल्याने डॉक्टर स्वतः उठून पॅसेजमधे आले, तेव्हड्यात समोरून माधवीला जिथे ठेवले होते त्या औटहाउसचा वार्डबॉय सायकल उभी करून अतिशय वेगाने येतांना दिसला. डॉक्टरांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. वार्डबॉयने निरोप आणला की माधवीची प्रकृती गंभीर झाली आहे. डोळे पांढरे करीत आहे. तिच्या जवळ असलेल्या नर्स माधवीला सावध करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. क्षणाचाही विलंब न करता डॉक्टर राजन, डॉक्टर नरेन्द्र यांच्या कारमधे बसून औटहाउसकडे रवाना झाले.

दोन्ही डॉक्टर घाईघाईने औटहाउसच्या आवारात कारमधून उतरले. बाहेरची गर्दी मधून वाट काढून माधवीच्या रूमकडे धावले. नर्स कोपऱ्यात खाली मान घालून उभी होती. सगळे संपले होते. तरीपण दोन्ही डॉक्टरांनी माधवीला परत तपासले. उघडे डोळे बंद केले, तोंडावर चादर ओढून, लढाइत हारलेल्या सैनिकासारखे रूम मधून बाहेर पडले, न बोलता कारमध्ये बसून निघून गेले.

काळ कोणासाठीच थांबत नसतो. तीन आठवडे उलटले असतील डॉक्टर राजन यांना डॉक्टर नरेन्द्र यांचा मुंबईहून फोन आला. उत्सुकतेने डॉक्टर राजन यांनी फोन उचलला, डॉक्टर नरेन्द्र यांनी त्यांना मुंबईला एका केस संदर्भात बोलवले, आणि एक खुशखबर पण सांगितली की, नरोत्तमला मागच्या आठवड्यात दोन्ही आर्टिफ़िशिअल पायांचे रोपण करण्यात आले आहे व त्याचा नुसता जीवच वाचला नाही तर प्रकृती झपाट्याने सुधारत आहे.

# प्रारब्ध

बाळू एकटाच भरकटत होता. रात्रीचे १० वाजून गेले होते. समोर मारुतीचे मंदिर दिसत होते. बाळूचे पाय मंदिराकडे वळले. मुर्तीजवळ समईचा मंद उजेड होता. झिरोच्या बल्बचा मिणमिणता प्रकाश बाहेरच्या ओट्यावर झिरपत होता. गाभाराचे जाळीचे दर बंद होते. बाळू ओट्यावर विसावला. अतिश्रमाने डोळयाच्या पापण्या जड झाल्या होत्या. विचारचक्र मात्र चालू होते. घरी अठराविश्व दारिद्र होते. घरी वडील वय ६५ वर्ष, आई ६० वर्ष, बहीण तिसऱ्या बाळंतपणाला आलेली बरोबर दोन लहान मुली. बाळू एस. एस. सी. झाला होता. कॉलेजला जायची इछा असूनही परिस्थितीमुळे पुढील शिक्षण शक्य नव्हते. एका लौंड्रीत मामुली पगारावर काम मिळाले होते. त्यातच घर खर्च चालत होता. वडील बापूराव प्राथमिक शाळेत शिक्षक होते. निवृत्त झाल्यावर पेन्शन नव्हती. दर महिन्याला ८०० रुपये पगारावर सही करून हातात फक्त ३०० रुपये मिळत. थोडेफार शिकवण्या करून मिळत. त्यावर आमचा शिक्षण खर्च, घर खर्च चालत असे. आता बापूरावांना नोकरी नव्हती त्यामुळे सर्व खर्चाचा भार बाळू वरच होता. त्यात बाळंतपणाला आलेल्या एकुलत्या एक बहिणीचा तिच्या दोन लहान मुलींसाठी लागणारा खर्च होताच.

मधुने दुरूनच बाळूला मारुती मंदिराच्या पारावर पेंगत असल्याचे बघीतले. झपझप चलत तो बाळू जवळ पोहचला. त्याला वाईट वाटले. मधु आणि बाळू लहानपणपासूनचे मित्र. मधूची आर्थिक परस्थिती बाळू पेक्षा चांगली नव्हती. मधु त्याच्या घरमालकाची रिक्षा चालवत होता व आई वडिलांचा सांभाळ करीत होता. मधूने बाळूला हलवून जागे केले. बाळू खडबडून जागा झाला. आपण मारुती मंदिराच्या पारावर असल्याचे लक्षात आले. आईने त्याला रवा आणि साखर आणायला सांगितले होते कारण जीजू म्हणजे ताईचे मिस्टर येणार होते. बाळूच्या खिशात फक्त १० रुपयेच होते. जेवण न करताच तो आता काय सोय करायची या विचारात पारावर येऊन बसला होता. मधूने गोडीत त्याला काही अडचण आहे का विचारून घेतले. खिच्यातून ५० रुपये

काढून बाळूच्या खिचात कोंबले व त्याला किराणा दुकानात घेऊन गेला. बाळूने रवा साखर घेतली व मधु बरोबर घरी जाऊन आईच्या सुपूर्द केले.

रविवार उजाडला. सकाळी ७ वाजताच जीजू आले. ताईने, आईने त्यांचे स्वागत केले. दोन्ही भाच्यांनी पप्पा आले म्हणून घर डोक्यावर घेतले. बाळूने त्यांचे सामान घरात नेऊन ठेवले. बापूराव मंदिरात गेले होते. जीजू फोरेस्ट खात्यात गार्ड होते, सध्या पोस्टिंग ठाण्या जवळील उल्हासनगर येथे होती. बाळूच्या लक्षात आले जीजू चालतांना थोडे लंगडत होते. पायाला काही लागले असावे असे बाळूला वाटले. बाळू सकाळी ८ वाजताच जेवणाचा डबा घेऊन लौंड्रीत जात असे तो रात्री ९ वाजताच दुकान वाढवून दमून घरी येत असे. घरी आल्यावर आनंदाचा लवलेष ही नसे. कोणानाकोणाचे प्रॉब्लेम असतच. बापूरावानी पुस्तकात डोके खुपसलेले असे. आई स्वयंपाकात गर्क असे. ताईचे डोके दुखत असे. दोन्ही लहान भाच्या झोपी गेलेल्या असत. जीजू पायाच्या दुखण्याने त्रस्त दिसत. रोजच असेच वातावरण असे. घराची ओढ वाटावी असे बाळूला कधीच वाटले नाही.

महिना उलटून गेला तरीही जीजूचा पायाचे दुखणे बरे झाले नव्हते. बाळू एक दिवस सुटी काढून जीजुला दवाखान्यात घेऊन गेला. डॉक्टरांनी सांगितले की यांना नारू झाला आहे. आपल्या नासिक जिल्हात हा रोग सहसा आढळत नाही. नारुवरील औषधेही उपलब्ध नाहीत तेव्हा यांना सरकारी दवाखान्यात घेऊन जा. बाळू लगेचच त्यांना सरकारी दवाखान्यात घेऊन गेला. त्यांच्यावर उपचार चालू झाले. त्यांच्या गुढग्या जवळील फोडातून लांबलचक नारू बाहेर पडत असे त्याला जीजू काडीला गुंडाळत असत. पुढील दोन महिन्यात नारू रोगावर नियंत्रण मिळवण्यात जीजूंना यश मिळाले. जीजू परत कामावर हजर झाले. महिना भरातच ताईची डीलीव्हरी झाली. ताईला परत तिसरी मुलगीच झाली. असो. बाळूने परत लौंड्रीचे काम चालू ठेवत पुढील शिक्षण बाहेरून परीक्षा देत चालू ठेवले. बाळूचे आई बाबा आता थकलेले वाटत होते. बापूरावांना मधुमेहाने ग्रासलेले होते. आईला अस्थमाने घेर्रले होते. दिवसामागे दिवस सरत होते. ताईच्या बाळंतपणाला आता दोन महिने उलटून गेले होते.

बाळू आणि मधु च्या गाठीभेटी रोजच्याच होत्या. तेवढ्याच एका मैत्रीच्या आधारावर दोघांचे दिवस पार पडत होते. त्यातच परत एका संकटाने हळूच प्रवेश केला, त्यामुळे बाळू हादरून गेला. एक दिवस जीजू परत नासिकला आले. त्यांच्या सर्वांगाला खाज येत होती व पुरळ उठत होते. त्यांनी परत महिनाभर रजा काढली. झाले परत बाळू त्यांना घेऊन दवाखान्यात घेऊन गेला. डॉक्टर त्वंचारोग स्पेशालीस्ट होते. जीजुंच्या अनेक टेस्ट केल्यावर त्यांनी निदान केले की यांना कॉंग्रेस गवताची अलर्जी आहे. यांना फोरेस्ट मध्ये असल्याने जंगलात फिरावे लागते त्यामुळे कॉंग्रेस गवताची अलर्जी झाली आहे. ओषधे चालू करू पण बर होण्यास काही कालावधी लागू शकतो. जीजूंवर उपचार चालू झाले. अनेक दिवस उलटून गेले. उपचाराने काहीही फरक पडला नाही. मग लोक सुचवतील तसे बाबा, वैद्य यांचे उपचार सुरु झाले. एकाने सर्व अंगाला एक ठराविक ऑईल लावण्यास सांगितले. ते ऑईल मुंबईला जाऊन आणावे लागे. दर १५ दिवसांनी मुंबईला जाण्याची जबाबदारी बाळूवर आली. खर्च वाढतच होता. जबाबदाऱ्या टाळणे बाळूला शक्यही नव्हते.

परिणाम स्वरूप परिस्थितीने बाळू गांगरला होता, खचला होता. मोठे भाऊ असूनही वेगळे रहात असल्याने कोणाचीही मदत नव्हती. नातेबाईक नावालाच गंमत बघायला होते. बहिणीच्या लग्नाला फक्त तीन नंबर भावाने मदत केली होती. त्यापेक्षा मोठे दोन भाऊ तर लग्नाला पण आले नव्हते. आर्थिक मदत करणे दूरच. बाळूला नाईलाजाने शिक्षण अर्ध्यावर सोडून लौंड्रीत नोकरी करावी लागत होती. घरभाडे देणे अशक्य झाल्याने नाइलाजाने १० बाय १० ची खोली भाड्याने घेऊन त्यात शिफ्ट व्हावे लागले. आता ताई जीजू व लहान तिन्ही भाच्या उल्हासनगरला परत गेले. बाळूने बाहेरून परीक्षा देत असल्याने अभ्यासात लक्ष देण्याचे ठरवले. त्यासाठी एका मित्राच्या रूम वर रोज अभ्यासाला जमायचे ठरले. रूम वर अजून चार मित्र अभ्यासाला जमत. बाळू रोज लौंड्रीतून रात्री ९ वाजता घरी आल्यावर जेवण करून रूम वर जात असे.

रूमवर रात्री दहा पर्यंत सगळे मित्र जमत. सुरवातीला गप्पागोष्टी, जोक्स, ताज्या घडामोडी वर चर्चा होत असे. त्यानंतर सगळे सिरय्सली अभ्यासात गुंग होत ते पहाटे पाच वाजे पर्यंत. त्यानंतर सगळे चहा प्यायला सी. बी. एस. कॅन्टीनला जात. घरी जाऊन आंघोळ करून दुसरा दिवस सुरु होई. बाळूला फक्त एकच शर्ट व प्यान्ट होती. दर रविवारी धुऊन, वाळऊन तेच परत

आठवडाभर वापरावे लागे. काही दिवसात ही गोष्ट मित्रांच्या लक्षात आली. बाळूने दररोज एकाचा ड्रेस वापरायचा असे ठरवले. यामुळे बाळूच्या अंगावर रोज नवीन ड्रेस असे. बाळूला गरीबीची लाज कधीच वाटली नाही, तसेच कष्ट कार्याची पण लाज कधी वाटली नाही. मित्र करीत असलेल्या मदतीमुळे बाळूला जास्त अभ्यास करण्याचा हुरूप आला. मित्रांचीपण बाळूला नेहमी मदत करून उपकाराची भावना कधीच नव्हती.

सर्व मित्रांचे पदवी पर्यंत शिक्षण पूर्ण झाले. ११वि पर्यंत मराठीत शिकलेल्या सर्वमित्रांना कॉलेजला गेल्यावर इंग्रजी भाषेत शिकत असल्यामुळे चेष्टेचा विषय झाले. इंग्रजीत शिकून काय मोठे दिवे लावणार आहेत असे त्यांना वाटे. त्यातल्यात्यात आर्टस मध्ये सर्व विषय इंग्रजीत शिकणे खरोखरच अवघड होते, परंतु पदवी मिळाल्यावर आय. ए. एस. परीक्षा पास करण्याचे ध्येय आमचे होते. आता पदवी मिळाल्यामुळे आर्धी लढाई जीकल्याचे समाधान होते. जसे ठरवतो तसे कधी होत नाही म्हणतात. तसेच झाले पुढील वर्षभरात सर्व मित्र पांगले गेले. राजनला ए. जी. ऑफिस मुंबई येथे auditor पदावर वडिलांच्या जागेवर नोकरी लागली. रवी आणि उल्हासला इन्स्पेक्टर पदावर सेल्स टैक्स मुंबईला नोकरी लागली. ज्ञानेश्वरला MICO कंपनीमधे नोकरी लागली. बाळूच्या नशिबाने येथे ही मार खाल्ला.

बाळूच्या घरच्या परिस्थितीत काहीही सुधारणा झाली नव्हती. आर्थिक ओढाताणीत वाढच झाली होती. बापुरावांनी बिकट होत जाणाऱ्या परिस्थिती पुढे हात टेकले होते. मोठी तिन्ही मुले आपल्या संसारात मग्न होती. मुलीची लग्ना नंतरची परिस्थिती जेमतेमच होती. बाळू दिवसरात्र मेहनत करून परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करत होता. समाधानाची गोष्ट म्हणजे तो पदवी परीक्षा पास होऊन बी. ए. झाला होता. चांगली नोकरी लागण्याची आशा होती. एक दिवस खरोखरच बाळूला नोकरीचा कॉल आला. एका केंद्र सरकारच्या कंपनीत ५ रुपये रोजावर क्लर्क पदावर बाळूला नोकरी मिळाली. बाळूने दिवसरात्र मेहनत करण्याचे ठरवले. सकाळी ९ वाजता बाळूला कामावर जावे लागे. रात्री ८ वाजे पर्यंत बाळू कामात मग्न असे. परिणाम स्वरूप बाळूची मेहनत, कामाची एकाग्रता, साहेबांच्या नजरेस आली. बाळूने जेमतेम

चारच महिने काम केले तेवढ्यात साहेबांची बदली मुंबईला झाली. बाळूला खूप वाईट वाटले. आता परत कुठे नोकरी शोधणार असा यक्ष प्रश्न त्याच्यापुढे होता. पण दैव बाळूला साथ देणार होते. साहेबांना बाळूचे काम आवडल्यामुळे त्यांनी दिल्ली ऑफिसशी पत्रव्यवहार करून बाळूची बदली मुंबई ऑफिसमधे करून घेतली. आता मुंबइत गेल्यावर बाळूचा पगार पाच रुपये रोज पगारावरून आठ रुपये रोज झाला. बाळूला आनंद झाला. काही दिवसांनी याच ऑफिसमधे कायमस्वरूपी नोकरी मिळण्याची आशा वाढली. ते १९७४ साल होते. महिन्याला २४०/- रुपये बाळूच्या हातात पडत. त्यात १०० रुपये बाळू घरी आई वडिलांना पाठवी व १४०/- रुपयात महिना काढे.

त्याही काळात मुंबई सारख्या ठिकाणी महिना रुपये. २४०/- पगारात दिवस काढणे सोपे नव्हते. बाळूने एका उडपी हॉटेलमधे उधारी खाते चालू केले. राईस प्लेट महाग असल्याने दुपारी १२ वाजता आणि रात्री ८ वाजता फक्त मिसळ पाव खायला सुरवात केली. दिवस सरत होते. बाळूला स्वतंत्र रूम घेणे शक्यच नव्हते त्यामुळे त्याचा मुक्काम ऑफिसमधेच होता. साहेबांनी त्याला ऑफिसमधे रहायला परवानगी दिली होती. सकाळी नऊ वाजेपासून इतर स्टाफ यायला सुरवात होत असे. सगळया स्टाफची चांगली मैत्री झाल्याने बाळूचे दिवस बरे जात होते. बाळूची ओळख जाधव नावाच्या एका रेशनिंग अधिकाऱ्याची झाली. त्यांचा बांद्राला दो रूम किचन चा फ्लॅट होता. एकतेच रहात होते. बाळूचा स्वभाव आवडल्याने त्यांनी बाळूला आपल्या घरी रहायला बोलावले. सकाळी दोघे घरीच नाश्ता बनवत व बरोबरच ऑफिसला जात असे. असे चार महिने आनंदात गेले. पण नशिबात काही वेगळेच लिहिले होते. एकेदिवशी जाधव साहेबांनी त्यांचे लग्न ठरल्याची बातमी दिली. झाले आठ दिवसात बाळूला आपला गाशा गुंडाळायला लागला. परत ऑफिसमधे रहायची बाळूची इच्छा झाली नाही.

अखेर रॉय नावाच्या एका ऑफिसमधील मित्राने मदत केली. तो वडाळाच्या झोपडपट्टीत रहात होता. एकच खोली होती. त्यात आधीच ऑफिसचे चार जण रहात होते. बाळूची त्यात भर पडली. सकाळी उठल्यावर लांबचलांब रांगेत टमरेल घेऊन ताटकळत उभे राहण्याची सवय

बाळूला लाऊन घ्यावी लागली. दोन्ही वेळेचे जेवण घरीच बनवले जाई. खोलीच्या भाड्यासहित जेवण्याच्या किराणा सामानासाठी रॉयकडे प्रत्येकाने १०० रुपये गोळा करीत होते. जेवण बनवण्याची जबाबदारी सर्वांनी वाटून घेतली होती. राम बिहारचा होता. त्याला चपाती फार चांगली बनवता येत असे. परातीत कणीक घेतल्यावर तो दोन्ही गुढग्यावर बसत असे. बरोबर कळशी भरून पाणी घेत असे. दोन्ही हाताच्या मुठीने कणीक मळत असे. कळशीभर पाणी कणकेत मुरून जात असे. चपाती मात्र एकदम मुलायम बनत असे. रॉय सकाळचा व बाळू संध्याकाळचा चहा बनवत असे. दिवस चांगले जात असले तरी दैवाने बाळूची पाठ कधीच सोडली नव्हती. झोपडीच्या मालकाला झोपडी विकायची होती. सगळ्यानीच झोपडीला रामराम ठोकला.

बाळूच्या ऑफिसमधे व्हर्गीस नावाचे सिविल इंजिनियर बदलून आले होते ते सेना निवृत्त अधिकारी होते. बाळूने त्यांना बोलताबोलता आपल्या राहण्याचा प्रॉब्लेम सांगितला. ते पण रूम शोधत होते. त्यांची पत्नी दिल्लीला एका हॉस्पिटलमधे हेड नर्स होती. एकटेच मुंबईला राहणार होते. त्यांनी रूम घेऊन बाळूला पार्टनर करून घेण्याचे ठरवले. बांद्रे येथील सी. जी. एस. वसाहतीत त्यांना एक रूम किचन चा फ्लॅट मिळाला. एक वर्षाचा करार करावा लागला. ११०० रुपये एडव्हान्स द्यावा लागला. १०० रुपये महीन्याचे भाडे त्यातून वजा होत असे. पैसे व्हार्गीस यांनीच भरले. ब्रोकरला १०० रुपये द्यावे लागले. दोघेही रहायला आले.

घरमालकाला सकाळी उठल्यापासून दारू पिण्याची सवय होती. दोघांना दुसरा पर्याय नसल्याने तिथेच रहावयाचे ठरवले. परत दिवस चांगले जात होते. बाळू खुश होता. तीन महिने झाले. अचानक एक दिवस फ्लॅटमधील लाईट गेले. मुंबईला पंखा चालत नसेल तर किती उकडत याचा अनुभव मुंबईकरांना असतो. तीन दिवस झाले तरी लाईट चालू झाले नाहीत. घर मालकाला विचारले तर दोन दिवसात चालू करतो सांगितले. नंतर १५ दिवस, एक महिना झाला तरी लाईट आले नाहीत. परत दोघांनी भेटून चौकशी केली. तेव्हा घरमालकांनी सांगितले की सहा महिन्या पासून लाईट बिल न भरल्याने लाईट कट झाले होते. घरमालक निवृत्त असल्याने पैशाची अडचण होती. व्हार्गीस यांनी ८०० रुपये लाईट बिलाची थकबाकी भरण्यासाठी घरमालकांना दिले. आता

लौकरच प्रॉब्लेम दूर होईल असे दोघांना वाटले. ऑफिसमधून येतांना मेणबत्ती व दुधाची पिशवी आणण्याचे काम बाळूचे होते. १५ दिवस उलटून गेले तरी लाईट चा पत्ता नव्हता. चिडूनच दोघे घरमालकाला भेटायला ब्रोकरला घेऊन गेले. पण काही उपयोग झाला नाही. निर्लज्जपणाचा कळस झाला. घरमालक म्हणाले तुम्ही दिलेले ८०० रुपये खर्च झाले आता परत मला ८०० रुपये द्या मी उद्याच पैसे भरतो. घरमालकाने दारू पिण्यासाठी पैसे खर्च केले होते. ब्रोकरने दुसरा फ्लॅट घेऊन दिला. बाळूच्या जीवात जीव आला. आता सर्व व्यवस्थित होते. ब्रोकर कडून दोन वेळेचा बाळूचा जेवणाचा डबा रूमवर येत होता. व्हार्गीस दोन्ही वेळेस हॉटेलमधे जेवत होते. व्हार्गीसला जेव्हाजेव्हा ट्रेनने दिल्लीला जावे लागे त्यात्या वेळेस बाळूची मदत अत्यावशक झाली. रिझर्व्हेशन असले तरी सुटकेस घेऊन गर्दीतून ट्रेनमधे प्रवेश करून सीट पर्यंत व्हार्गीसला पोचवण्याचे काम बाळूचे असे. ट्रेन मधून बाहेर पडतांना बाळूच्या शर्टची बटने तुटलेली असत.

ऑफिसच्या कामात बाळूचा दिवस जात असे. सकाळी व्हार्गीस बाळूला झोपेतून उठवत असे. सकाळचा चहा बनवणे, झाडून काढणे, पिण्याचे पाणी भरून ठेवणे हे सर्व कामे बाळूला करावे लागे. व्हर्गीस वयस्कर असल्याने बाळू सर्व कामे करीत असे. दर रविवारी बाळूला स्वतःचे आणि व्हार्गीसचेपण कपडे धुवावे लागत. बाळूला या सर्व कामाचा राग यायचा. पण नाईलाज होता. बाळूला आई वडिलांची आठवण रोज येत होती. दोघेही थकलेले होते. आपण दर महिन्याला पाठवलेले १०० रुपये त्यांना पुरे पडत नसतील अशी खात्री बाळूला होती. एकदिवस बाळूला अंगात ताप असल्याचे जाणवले. दोन दिवस बाळूने अंगावर ताप काढला. एक दिवस ब्रोकरचा मुलगा बाळूला डॉक्टरकडे घेऊन गेला. डॉक्टरने बाळूला पिवळा ताप असल्याचे सांगितले. बाळूने आजारपणाची रजा काठली. बाळू अंथरुणावर खिळला. डोळे खोल गेले होते. खूप अशक्तपणा जाणवत होता.

दिवसभर पडून बाळूला कंटाळा आला होता. रविवारचा दिवस होता. बाळूला सकाळी उशिरा बाथरूममधील कपडे धुण्याच्या आवाजाने जाग आली. बाथरूममध्ये व्हर्गीस कपडे धूत होता त्याने बाळूचेही कपडे घुटले होते. दुपारी जेवण झाल्यावर बाळूला डुलकी लागली होती. कोणाच्या तरी आवाजाने त्याला जाग आली. दरवाजा बाहेर व्हार्गीस ब्रोकरशी बोलत होता. “बाळू बिमार है उसका ख्याल रखना रोज अच्छा खाना देना, वो मेरे लडके जैसा है” हे बोलणे

ऐकल्यावर बाळूला खूप गहिवरून आले. व्हार्गीस बद्दलचा गैरसमज दूर झाला. अजून काही दिवस गेले पण आजार बरा होत नव्हता. बाळूने नासिकला जायचे ठरवले. त्याआधी त्याच ऑफिसमधे बाळूला परमनंट केल्याचे पत्र आले होते. बाळूचा पगार वाढला होता. नासिक ऑफिसला बदली साठी बाळूने विनंती अर्ज दिला. बाळूची नासिक ऑफिसला बदली झाली. नासिकला बदली झाल्यामुळे बाळूला आनंद तर झालाच होता पण बापूराव व त्यांच्या पत्नीला आनंद गगनात मावेना. उतार वयात बाळूचा मोठा आधार मिळाला. बाळू मुंबईला असतांना त्यांनी खूप अडचणीत दिवस काढले होते. कधी कधी बाळूच्या आईला मावशीच्या घरी जाऊन गव्हाचे पीठ पदराआड लपवून आणवे लागे, बापुरावांना कळू नये म्हणून. अश्या गोष्टी बाळूला समजायला वेळ लागला नाही. यापुढे आईवडिलांची सेवा करण्याचा बाळूने निश्चय केला.

बाळू नासिकच्या ऑफिसमधे रुळला होता. सकाळी नऊ वाजताच बाळू घरून जेवणाचा डबा घेऊन ऑफिसला जात असे. घरी परत यायला रातीचे सात वाजून जात. ऑफिसमधे तीन क्लार्क मैनेजर, व बाळू असा स्टाफ होता. बाळू या कार्यालयात नवीन असल्याने इतरांनी त्याला लगेच सामाऊन घेतले नव्हते. बाळू एकटाच आपले दिलेले काम करत बसे. प्रामाणिकपणे, मेहनतीने केलेल्या कामाचे श्रेय दुसराच घेत असे. बाळूला याचे खूप वाईट वाटे. बाळूला जॉबचे समाधान नव्हते. मैनेजर व इतर स्टाफ यांचे बाळू नसतांना काहीतरी हळू आवाजात बोलणे चालत असल्याचे बाळूच्या लक्षात आले होते. त्यांचे हितसंबंध असल्याचे जाणवत होते. छोट्याछोट्या कारणांवरून बाळूला अपमान सहन करावा लागे. त्यामुळे बाळूची घरी बाहेर सगळीकडेच चिडचिड होऊ लागली.

एकदिवस ऑफिस मधील सहकारी अनिलने बाळूला ऑफिस सुटल्यावर थांबवून घेतले. बाळूला थोडे आश्चर्य वाटले. दोघे घरी जायला निघाले. अनिलने आईबाबांच्या प्रकृतीची शिताफीने चौकशी केली, बाळू त्यांची सेवा करीत असल्याबद्दल कौतुक केले. बाळू सरळमार्गी होता. बाळूला त्याच्या बद्दल लगेच आदर वाटायला लागला. रोज ऑफिस सुटल्यावर दोघांची भेट होऊ लागली. एका सायंकाळी अनिलने बाळूला फिरायला बाहेर काढले. एक तासानंतर एका बार जवळ दोघे थांबले. अनिलने बाळूला जबरदस्तीने बारमध्ये घेऊन गेला. एक बियरची ऑर्डर दिली. बाळूने नाही नाही म्हणून सुद्धा थोडी बियर घ्यायला लावली. दोन घोटातच बाळूला हवेत उडत असल्या सारखे वाटले. सर्व टेन्शन दूर झाल्यासारखे वाटले. बाळू त्या रात्री घरी आला. जेवण झाल्यावर लगेच झोप लागली. सकाळी उठून नेहमीप्रमाणे ऑफिसला गेला. आता बाळूला

अनिल खूपच जवळचा मित्र वाटायला लागले होते. अधून मधून दोघांच्या बैठकी होऊ लागल्या. नंतर नंतर दोघे रोजच भेटू लागले. बाळू जास्त धीट झाला. आई वडिलांना किती वाईट वाटेल याचा विचार त्याने केला नाही. पण ही गोष्ट आईच्या लक्षात आल्यावर तिने बाळूच्या कानामागे जाळ काढला. दोन दिवस बाळू आईशी बोलत नव्हता. बापुरावांनी आणि आईने त्याचे लग्न लाऊन देण्याचे ठरवले.

बाळूचा एक मित्र अरुण बँकेत कामाला होता. त्याची बहीण बाळूला सांगून आली. बाळूच्या सर्व मित्रांना खूप आनंद झाला. अरुणला आईवडील नव्हते. तो नोकरी करून आपल्या बहिणीचा संभाळ करीत होता. बहिणीच्या लग्नाची त्यालाही खूप काळजी होती. अरुण बाळूच्या सर्व कुटुंबाला ओळखत होता. बाळूशी आपल्या बहिणीचे लग्न झाले तर ती नक्कीच सुखी होईल याची खात्री अरुणला होती. बापुरावांनी अरुणकडे त्याच्या बहिणीची पत्रिका मागितली. अरुणने लगेच आणून दिली. बाळूचे रोजचे नित्य व्यवहार चालू होते. ऑफिस मधून आल्यावर बाळू एकटाच फिरायला असे. त्याने आता अनिलला टाळायला सुरवात केली होती. अनिलची संगत चांगली नाही हे त्याला पटले होते. ऑफिसमधे कामापुरतेच दोघांचे बोलणे होत असे. ही गोष्ट अनिलच्या लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. काही दिवसात ऑफिसमधे परत बाळूला एकटे पाडण्यास सुरवात झाली. ही गोष्ट बाळूला खूप खटकली. ऑफिसमधे होत असलेला अन्याय सहन करण्याशिवाय काही पर्याय बाळूपुढे नव्हता.

बाळूच्या मित्रांनी त्याला आता लौकरच लग्न होणार म्हणून चिडवायला सुरवात केली होती. अरुणने त्याला जीजू हाकमारायला सुरवात केली होती. एक महिना उलटून गेला तरी बापूराव कडून बाळूच्या लग्नाबाबत पुढची पावले पडत नव्हती. मित्रांकडून रेटा चालूच होता. एक दिवस बाळूने आईला धीर करून याबाबत विचारले. आईने बाळूला जे सांगितले ते ऐकून बाळूला धक्का बसला. बाळूची व अरुणच्या बहिणीची पत्रिका जुळत नव्हती. जोतिष्यांनी सांगितले मुलीच्या पत्रिकेत मृत्युखडास्टक योग आहे. म्हणजे लग्न झाल्यास पतीपत्नी पैकी एकाचा मृत्यु होईल. बाळूचा भविष्यावर विश्वास नव्हता. संध्याकाळी मित्रमंडळी कट्ट्यावर जमली होती. मित्रांनी लग्नाचा विषय काढल्यावर बाळूला पत्रिकेचा विषय सांगावाच लागला. कोणाचाही विश्वास बसत नव्हता. सगळयांच्या मते एकतर अरुणच्या बहिणीची पत्रिका चुकीची असावी किंवा जोतिष्यांचा

पुरेसा अभ्यास नसावा. सगळयांनी एक रिक्षा केली शहरातील नामवंत चार जोतिष्यांकडे दोघांच्या पत्रिका दाखवल्या परंतु सगळयांच्या मते मुलीच्या पत्रिकेत मृत्युखडास्टक योग असून लग्न झाल्यास पतीपत्नी पैकी एकाचा मृत्यु होईल. नाईलाज झाल्याने सगळयांनी अरुणला समजून सांगण्याचे अवघड काम केले. अरुण रडू आवरत नव्हते. बाळूचा विश्वास जोतिष्यांच्या भविष्यावर मुळीच नव्हता हे अरुणला माहित होते म्हणून त्याला जास्त वाईट वाटले. बाळूने अरुणची समजूत काढली. विषाची परीक्षा का बघायची? लग्नानंतर तुझी बहीण किवा माझा अचानक मृत्यू झाल्यास फक्त दोघांचे आयुष्य नाहीतर दोन कुटुंब उध्वस्त होतील. तरीही तू तयार असल्यास मी लग्न करण्यास तयार आहे. बाळूच्या या स्पष्ट बोलण्याने अरुण खाली मान घालून तिथून निघून गेला. बाळूचा लग्नाचा विषय आतापुरता थांबला होता.

दिवसामागून दिवस जात होते. बाळू रोज नियमितपणे ऑफिसला जात होता. संध्याकाळी घरी आल्यावर आईला काय पाहिजे नको ते बघून चहा घेतल्यावर बाहेर पडत असे. फिरण्याची नक्की अशी जागा नव्हती. मनाला वाटेल तसे भरकटत असे. बहुदा नदी किनारी जाऊन बसे. नदी प्रवाहाकडे तासनतास बघत बसे. ऑफिसमधील वातावरण दिवसेंदिवस बिघडत चालले होते. रोज होत असलेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे बाळूला ऑफिसला जाण्याची इच्छा होत नसे. त्याच्या एकटे राहण्याच्या सवईमुळे त्याला कोणी मित्र राहिला नव्हता. एकेदिवशी संध्याकाळी अनिल त्याला परत भेटला. अनिलने त्याला बारमध्ये जाण्याचे सुचवले. बाळू लगेच तयार झाला. त्यादिवशी बाळूने मनसोक्त बियर घेतली. सगळया दुख्खापासून मुक्ती मिळाल्याचा भास त्याला झाला. बाळू आणि अनिलची बैठक सुरवातीला महिन्यातून एकदा, नंतर पंधरा दिवसांनी एकदा नंतर आठवड्यातून एकदा आतातर रोजच बसू लागली. बाळूचा महिन्याचा खर्चाचा ताळमेळ बसत नव्हता. उधारी वाढायला लागली. आता बाळू दारू पीत नव्हता दारूच त्याला पीत होती. आईवडिलांकडे दुर्लक्ष होणे क्रमप्राप्त होते. म्हणता म्हणता दोन वर्ष सरली. बापूराव व त्यांच्या पत्नीला बाळूची स्थिती पाहून वृद्धावस्थेत अतोनात दु:ख झाले. बाळूपेक्षा चार मोठी मुले होती, परंतु सगळे आपापल्या संसारात मग्न होते. आता दोघांना व बाळूला कोणाचाच आधार राहिला नव्हता. दिवसेंदिवस बाळू डिप्रेशनमधे जात असल्याचे बापूरावांना जाणवत होते. बाळूला या परिस्थितीतून बाहेर काढणे अत्यंत आवश्क होते.

बाळूचे लग्न ठरवण्यासाठी बापुरावांनी प्रयत्न सुरु केले. आप्पासाहेब निवृत्त शिक्षक औरंगाबाद यांची मुलगी रजनीचे स्थळ बाळूसाठी आले. मुलगी पहाण्याचा कार्यक्रम झाला. रजनीला पाहताच बाळूला पसंद पडली. मुला मुलीची पसंदी झाली. बैठकी झाल्या. बाळूचे लग्न रजनी बरोबर पक्के ठरले. दोन महिन्यानी लग्न पार पडले. बाळूने दोन रूम किचनचा फ्लॅट भाड्याने घेतला. बाळू, बापूराव, आई एकत्र राहायला लागले. बाळूच्या लग्नाला कोणत्याही मोठ्या भावांनी हजेरी लावली नव्हती. रजनीने लक्ष्मीच्या रुपाने घरात पाउल टाकले होते. रजनी आईवडिलांची मनापासून सेवा करीत होती. सकाळी आठ वाजताच बाळूचा डबा तयार असे. गरमगरम पोह्याच्या नास्ता झाल्यावर बाळू डबा घेऊन ऑफिसला जात असे. रोज ऑफिस मधून बाळू घरी आल्यावर दोघे नियमित फिरायला जाऊ लागले. बाळूने आता बारला कायमचा रामराम ठोकला होता. ऑफिसमधील वातावरण हळूहळू बदलत होते कारण पहिल्या साहेबची बदली होऊन नवीन साहेब रुजू झाले होते.

बाळू रजनीचा संसार आनंदाने भहरला होता. बापूराव, आई आता सुख अनुभवत होते.. लौकरच आजोबा आजी होण्याचे स्वप्न पहात होते. दोन वर्ष उलटली. एकेदिवशी सकाळी बापूरावांनी बाळूला चांदवडला देवीच्या दर्शनासाठी आईला घेऊन जाणार असल्याचे सांगितले. बाळूने त्यांना आनंदाने रिक्षा करून दिली. रजनीला पण बरोबर नेल्याचे ठरले. पण रजनीचा भाऊ खूप दिवसांनी दुपारी जेवायला येणार असल्याने तिचा नाईलाज झाला होता. बापुरावांनी पण मग जास्त आग्रह केला नाही. रजनीने पटकन बाळूला डबा करून दिला. नाष्ट्यासाठी गरमगरम उपमा केला होता. बाळूने नाश्ता केला व डबा घेऊन ऑफिसला निघाला. निघतांना बाळूने रजनीला तिच्या भावाला संध्याकाळी जेवणास थांबविण्यास सांगितले व येतांना बाजारातून आंबे आणणार असल्याचे सांगितले.

बाळू ऑफिसला पोहचला. आज सर्व पेंडिंग काम संपवुन नवीन साहेबाची शाबासकी मिळवायची असे त्याने ठरवले होते. दुपारी एक वाजता सगळयांनी जेवणाचे डबे उघडले आता जेवायला सुरवात करणार एवढ्यात बाळूच्या मोबिईल वर रिंगटोन येत होती. बाळूने बघीतले

नंबर नवीन होता. समोरून कोणी पोलिस बोलत होता. त्याने बाळूला नाव व पत्ता विचरला. पुढचे बोलणे बाळू ऐकू शकला नाही तो चक्कर येऊन खुर्चीवर पडला. अनिल व त्याच्या दोन सहकाऱ्यांनी बाळूला सावरण्या चा प्रयत्न केला. अनिलने पडलेला मोबाईल बघितला तो बंद झाला नव्हता. अनिलने बोलणे पुढे चालू ठेवले. अत्यंत धक्कादायक बातमी होती. ज्या रिक्षातून बापूराव, बाळूची आई चांदवडला देवीच्या दर्शनाला जात होते त्या रिक्षाचा अपघात झाला होता. एका कंटेनरला ओव्हरटेक करीत असतांना समोरून येणाऱ्या रिकाम्या ट्रकची धडक रिक्षाला बसली होती. धडक इतकी प्रचंड होती की रिक्षा ३० फुट ओढली जाऊन एका अतिविशाल झाडात घुसली होती. जागीच रिक्षा चालकासह दोघांचा मृत्यू झाला होता. सगळयांचे मृत देहाचे अनेक तुकडे रस्त्यावर विखुरले होते. बाळूच्या ऑफिस मधील साहेब व सर्व सहकाऱ्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने पाऊले उचली. बाळूला ताबडतोब घरी पोहचवले. रजनीला अपघाताची कल्पना दिली. दु:ख आवरून विचलित न जाता बाळूला सावरण्यास सांगितले. बाळूला अपघात स्थळी न नेण्याचे ठरले. साहेब व अनिल अपघात स्थळी गेले. पोलीस पंचनामा झाला होता. दोन ॲम्बुलंस उभ्या होत्या. कोणाचे कोणते अवयव ओळखण्याच्या पलीकडचे होते. विखरलेले अवयव गोळा करून जमलेल्या गावकऱ्यांनी दिलेल्या कापडात गुंडाळण्यात आले. दोन्ही ॲम्बुलंस तातडीने सरकारी दवाखान्यात पोस्टमार्टेम साठी नेण्यात आल्या. बरोबर साहेबाच्या कारमधे अनिल व एक पोलीस बसले होते. सर्व सोपस्कार आटपायला चार तास लागले.

इकडे बाळू धक्यातून पुरता सावरला नव्हता. कॉलनितील लोक जमायला सुरवात झाली होती. बाळूचे चारही मोठे भाऊ, बहीण, सहपरिवार जमले होते. कुठेतरी रक्ताचे नाते आडवे येत होते. ॲम्बुलंस मधून बापूराव व आई चे निर्जीव शव आणले गेले. रिक्षा चालकाची बॉडी त्याच्या घरी पाठवली गेली. बाळूच्या घरासमोर मोठा जमाव जमला होता. दु:खाचे सावट पसरले होते. हुंदके, आक्रोशाने वातावरण गंभीर झाले होते. तिरडीवरील पांढऱ्याशुभ्र कापडात गुंडाळलेले दोन दुर्दैवी मृत बघितल्यावर जमलेल्या सर्वच लोकांचे हृदय हेलकावले. श्मशान वैराग्य काय असते याचा प्रत्येकाने अनुभव घेतला. बाळूच्या कुटुंबाचे सांत्वन करायला कोणाकडेही शब्द नव्हते. बाळूचे मित्र, ऑफिसचे सहकारी यांनी निशब्द होऊन सर्व तयारी केली होते. स्मशानभूमीत दोघांना अग्नी संस्कार दिले गेले. बाळू व त्याचे चारही भाऊ कितीतरी वेळ चितेच्या ज्वालाकडे बघत बसले होते. घरी परत आल्यावर सर्व भाऊ निर्जीव पणे हौलमधे कोसळले. बाळूला सर्वांनी

जवळ घेतले. त्यात मिठीत बाळूला खूप आधार वाटला. आईवडिलांच्या अचानक अपघाती मृत्यू नंतर आपण निराधार होऊ असे बाळूला वाटत होते. परंतु भावांचे स्पर्श भविष्यात आश्वासक आधार ठरणार होते. सर्व भाऊ बहिणीने एकत्र झाल्याचे दृश्य बघण्याचे भाग्य आई व बापूरावांच्या नशिबात नव्हते.

दिवसामागून दिवस, वर्षामागून वर्ष सरत होते. बाळू रोजचे सामान्य जीवन जगत होता. ऑफिसचे वातावरण आता आनंदी असायचे. साहेब व सहकारी बाळूला मान देत होते. त्यातच बाळूचे प्रमोशन झाले. पगार वाढला होता. बाळूने लौकरच लोन काढून मारुती-८०० कार घेतली. बाळू व रजनीच्या संसारात काही कमी नव्हते. कमी फक्त बाळाची होती. रजनीची कूस अजून उजवली नव्हती. डॉक्टर, दवाखाने, वैद्य, नवस, सगळे करून झाले. कशाचाही उपयोग होत नव्हता. आता बाळू ३६ व रजनी ३० ची होती. अजूनही दोघानाही आशा होती. रजनीने महिला मंडळात मन रमून घेतले. बाळू एक चांगला कवी होता. त्याने एक कविता संग्रह प्रसिद्ध केला. बाळू रिकाम्या वेळेत कविता लिहित बसे.

बाळूला आज लौकर ओफिसला जायचे होते. नाश्ता करायला वेळ नाही फक्त मला पटकन चहा दे असे त्याने रजनीला सांगितले. रजनीने चहाचा मग टेबलावर ठेवला आणि गैस वर दुध ठेवल्याने पटकन किचनमधे गेली. इतक्यात बाळूचा ओरडण्याचा मोठा आवाज आला, बघते तर चहाचा मग बाळूच्या हातातून निसटून खाली पडला होता. बाळूने ऑफिसला जाण्यासाठी घातलेल्या कपड्यांवर चहा सांडला होता. उजव्या हातावर गरम चहा पडल्याने भाजला होता. रजनीने त्याला पटकन दुसरा ड्रेस काढून दिला. तुटलेला मग किचनमधे ठेऊन कपाटातून बरनालची ट्यूब काढून बाळूच्या हाताला लाऊन दिली. फरशी साफ केली. घटना किरकोळ होती. थोड्याच वेळेत दोघेही विसरून गेले. बाळूची आज क्लायन्ट बरोबर मीटिंग होती. ११ वाजता मिटिंग चालू झाली. आपल्या युनिट ची माहिती देण्यासाठी बाळू उभाराहीला. त्याने सलग २० मिनिटे सविस्तर माहिती दिली. काही विचारायचे असल्यास विचारावे असे बाळूला बोलायचे होते पण अचानक बाळू खुर्चीवर कोसळला. कोणालाही काही समजायच्या आत बाळूने स्वतःला सावरून घेतले. थोडी चक्कर आल्याने पडलो असे समाधान त्याने करून धेतले. ऑफिसच्या सहकाऱ्यानी मात्र त्याला रिक्षा करून घरी पोहचवले. बाळू खुपच विचारात पडला. बाळूने

रजनीला सांगितले नव्हते पण त्याला आजकाल पायऱ्या चढतांना धाप लागत होती. उजव्या हाताचे कंपन वाढले होते. रात्री निवांत झोप लागत नव्हती. छोट्या छोट्या गोष्टीचे विस्मरण होत होते. तरीही त्याच्या दिनक्रमात काही फरक पडला नव्हता.

रजनी दाखवत नसली तरी बाळूच्या प्रकृतीची तिला काळजी वाटायला लागली. त्याची अस्वतता वागण्यातील फरक जाणवत होता. कधीकधी त्याचे बोलणे कळेनासे झाले. अडखळत अस्पष्ट बोलत होता. काहीतरी गंभीर गडबड जाणवत होती. कोणाजवळ दु:ख व्यक्त करावे अशी विश्वासातील व्यक्ती कोण असावी असा विचार करू लागली. योगायोगाने एकदिवस दुपारी आईवडील भेटायला आले. बाळू ऑफिसला गेला होता. रजनीला खूप बरे वाटले. दुपारची जेवणे झाल्यावर सगळे टीव्ही वरील बातम्या बघत होते. रजनीचा बातम्यात रस नव्हता. बाळूच्या प्रकृतीचा विषय कसा काढायचा या विचारात ती होती. एवढ्यात तिच्या मोबाईलची रिंग वाजली. बाळूचाच फोन होता. आज घरी यायला थोडा उशीर होईल असे त्याने रजनीला सांगितले. रजनीने आईवडील घरी आल्याचे सांगितले. बाळूने मोबाईल बाबांकडे देण्यास सांगितले. बाळूने त्यांना दोन दिवस मुक्काम करायची विनंती केली. बाबांनी हो म्हणून मोबाईल बंद केला, पण चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह दिसत होते. आईने विच्यारून सुद्धा बाबा गप्प बसले. रजनीच्या मनात शंका आली. जावईबापूंना बोलण्यात काही त्रास होत आहे का? या प्रश्नाचे उत्तर कसे द्यावे याचा रजनी विचार करू लागली. विषय निघालाच आहे तर आपले मन मोकळे करण्याचा निर्णय तिने घेतला. बाळूच्या प्रकृतीची काळजी तिने आईबाबांना सांगितले. बाबा विचारात पडले. गंभीर झाले. दोन दिवस मुक्काम करण्याची विनंती बाळूने केलीच होती, त्यानुसार दोनदिवस राहून बाळूला डॉक्टरकडे घेऊन जायचे त्यांनी ठरवले.

बाळूला दवाखान्यात जायचे नव्हते. रजनीचा त्याला राग आला होता. आपल्याला काहीही गंभीर आजार झालेला नाही अशी त्याची खात्री होती. पण बाबांच्या आग्रहापुढे त्याचा नाईलाज झाला. त्याने डॉक्टर गुप्ते यांच्या क्लिनिकमधे संध्याकाळचा नंबर लावला. आईबाबा, रजनी व बाळू सहा वाजताच पोहचले. त्यांच्या आधी तीन नंबर होते. सातच्या सुमारास बाळूचा नंबर लागला. डॉक्टरांनी बाळूला तपासले. रजनी व आईवडिलांना बाहेर बसायला सांगितले. डॉक्टरांनी बाळूकडून कायकाय त्रास होतो कधी होतो व आता काही उपचार चालू आहेत का

याची चौकशी केली. गंभीरपणे लेटरहेडवर काही टेस्ट लिहिल्या व बाळूला टेस्ट रिपोर्ट दोन दिवसात घेऊन यायला सांगितले. बाळूने बाहेर येऊन रजनीच्या हातात तो कागद दिला. रजनी परत डॉक्टरांच्या केबिनमधे गेली. काही गंभीर आजार बाळूला झाला आहे का असे डॉक्टरांना विचारले. डॉक्टरांनी आताच काही सांगता येणार नाही, टेस्ट रिपोर्ट लौकर घेऊन या मग बघू असे सांगून परत दुसऱ्या पेशंटला बोलवण्यासाठी बेल वाजवली. सर्व घरी परत आले. दुसऱ्या दिवशी बाबा बाळूला टेस्ट करायला घेऊन गेले. टेस्ट रिपोर्ट दुसऱ्या दिवशी संघ्याकाळी मिळणार होते. बाळू ऑफिसला निघून गेला, जातांना त्याने रजनीला सांगितले की संघ्याकाळी श्रीखंड पुरीचा बेत करू, येतांना मी बुधाकडून श्रीखंड घेऊन येतो.

दुसऱ्या दिवशी परत डॉक्टर गुप्तेकडे नंबर लावला. सगळे क्लिनिकला पोहचले. आज खूपच उशिरा रात्री नऊ वाजता नंबर लागला. टेस्ट रिपोर्ट बरोबर घेतले होते. डॉक्टरांनी टेस्ट रिपोर्ट तपासायला २० मिनिटे घेतली. रजनीच्या छातीत धडधड व्हायला लागली. डॉक्टरांनी आईबाबा व रजनीला पण केबिनमधे बोलून घेतले. वातावरण गंभीर झाले होते. डॉक्टरांच्या चेहऱ्यावर मात्र आश्वासक हास्य होते. त्यांनी टेस्ट रिपोर्ट बाजूला ठेऊन दिले. बाळूच्या कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेतली. बाळूच्या घराण्यातील आजाराची हिस्टरी विचारून घेतली. दीर्घ श्वास घेतला. आता त्यांनी बाळूला बाहेर बसायला सांगितले. तिघेजण केबिनमध्येच होते. डॉक्टरांनी बोलायला सुरवात केली.

" मी आता जे काही सांगणार आहे ते प्रत्येकाने धीराने ऐकायचे आहे. घाबरून जायचे कारण नाही. आजकाल सायन्स खूप पुढे गेले आहे. बाळूच्या टेस्ट रिपोर्ट वरून व हिस्टरी वरून असे वाटले की बाळूला पार्किन्सन हा आजार झालेला आहे. या आजाराची सुरवात खूपच हळूहळू होते. बरेच महिन्यानंतर काही कारणांनी दवाखान्यात गेल्यास याचे निदान होते. या आजाराची सुरवात शरीरातील अवयवांच्या कंपनाने होते. असा माणूस आरामात असतांना जर हात टेबलावर ठेवले असतील, किंवा गुढग्यावर, जमिनीवर वा खुर्चीवर ठेवले असतील तर कंपन जाणवते. छोटे छोटे काम जसे लिहिणे, शर्टला बटन लावणे, दाढी करतांना, सुईमधे दोरा ओवणे अशी कामे सुलभतेने करू शकत नाही. पुढे पुढे चालतांना एक पाय घसरून चालले जाते, हा पाय हळू व उशिरा उचलला जातो, परंतु पूर्णपणे उचलला जात नाही. सगळ्या अवयवांच्या हालचालीत जडपणा जाणवतो. चपळता कमी होते. ताठपणे चालता येत नाही. पुढच्या बाजूला झुकून चालावे लागते. मोठी पावले टाकली जात नाही. चालतांना पडण्याची शक्यता वाढते. चालतांना होणारी खांद्याची हालचाल मंदावते. चेहऱ्याचे हावभाव बदलायला लागतात भावनाशुन्य चेहरा वाटतो. पापण्यांची उघडझाप कमी होते. डोळे मोठे भासतात. जनरली ही

लक्षणे प्रत्येक माणसात वृद्धावस्थेत दिसून येतात. पण या रोगात ती तरूणपणात दिसतात. घास गिळायला त्रास होतो, गळयात अडकतो. तोंडातून लाळ येते. खातांना ठसका लागतो. हळूहळू हालचाल कमी होऊन हिंडणे फिरणे कमी होते. दैनदिन कामात कोणाची तरी मदत लागते. हळूहळू संवाद कमी होत जातो. उदास होतो, चिडचिडेपणा वाढतो. स्मृती कमी होते. थोडक्यात मानसिक स्वास्थ संपून जाते. या आजारात माणसाच्या मेंदुतील रसायन बनवणाऱ्या नसा हळू हळू नष्ट व्हायला लागतात.

डॉक्टरांनी व्हीलचेअरवरून उठून गार पाणी घेतले. वाशबेसिन वरील न्यापकीनने तोंड पुसले. कुठलाही गंभीर आजार मी पेशंटच्या नातेबाईकांपासून कधीही लपवून ठेवत नाही त्यामुळे त्यांची व इनडारेक्ट्ली पेशंटची आजाराला तोंड देण्याची मानसिक तयारी होते. वाईट वाटून घेऊ नका, घाबरून तर मुळीच जाऊ नका, प्रारब्ध कुणाला कधीच चुकलेले नाही. बाळू समोर तुमची अगतिकता कधीच व्यक्त होऊ देऊ नका, अवघड आहे पण नाईलाज आहे असे समजा. तुम्ही बाळूची लहान मुलासारखी काळजी घेतली पाहिजे. मी ओषधे लिहून देतो ती लगेच चालू करायची. रोज काय व्यायाम करायचा ते पण लिहून देणार आहे. सगळयांचे लक्ष रजनीकडे गेले. ती खुर्चीवर मान टाकून बेशुद्ध पडली होती. बाबा आई काळजीत पडले. डॉक्टरांनी प्रयत्न करून रजनीला शुद्धीवर आणले. डॉक्टर आतल्या रूममधे निघून गेले. बाहेर आल्यावर रजनीने पाहिले बाळू क्लानिकच्या बाहेर साहेबांशी मोबाईल वरून काहीतरी बोलत होता. सगळयांच्या गंभीर चेहऱ्याकडे बाळूचे लक्ष गेले नाही कारण त्याला साहेबांनी उद्याच ऑफिसच्या कामासाठी नागपूरला जाण्यास सांगितले होते. संध्याकाळी बाळूने श्रीखंड पुरीचा आस्वाद घेतला. चेहऱ्यावर कसलीही प्रतिक्रिया दिसणार नाही याची कसरत आईबाबांना घ्यावी लागत होती. रजनी मात्र अतिशय गंभीरपणे जेवण करत होती. रात्री रजनीला झोपच लागली नाही.

पहाटे लौकर उठून बाळू नागपूरला जायच्या तयारीला लागला. रजनीने त्याला चहा करून दिला. एका डब्यात आईने आणलेले चार डिंकाचे लाडू रजनीने बाळूचा ब्रीफकेसमधे ठेवले. प्रवासात काळजी घेण्यास सांगितले. बाळूने रजनीला जवळ घेतले व तुला कालपासून बरे वाटत नाही का विचारले. रजनी रडायला लागली. काय बोलावे बाळूला उमजत नव्हते. त्याला वाटले आपण नागपूरला जात आहोत म्हणून तीला काळजी वाटत असावी. तू म्हणशील तर मी नाही जात नागपूरला, काहीतरी कारण सांगेन साहेबांना. पण रजनीने त्याला थांबवले. नागपूरला

जायलाच पाहिजे फक्त तुमच्या प्रकृतीची काळजी घ्या. बाळूने आईबाबांना नमस्कार केला व नागपूरला जाण्यासाठी निघाला.

आईबाबा दुसऱ्या दिवशी गावी निघून गेले. जाण्यापूर्वी त्यांनी रजनीला बाळूच्या आजाराची पूर्ण कल्पना दिली. काय काळजी घ्यायची ते सांगितले. रजनीची आता देव परीक्षाच बघणार होता. बाळूला त्याच्या आजाराची पुसटशी सुद्धा कल्पना येऊ न देण्याचे आश्वासन रजनीने आईबाबांना दिले. त्यांना बसस्टाप सोडून रजनी घरी आली व बेडवर जाऊन कोसळली. अतीप्रचंड संकट डोळयापुढे ऑ वासून उभे होते. कष्टाने रोकलेला बांध आता फुटला होता. रजनी ओक्साबोक्सी रडू लागली. भान विसरून आक्रोश करून दु:खाला वाट करून देत होती. बाळू आल्यावर तिला स्वतःला आनंदी भासवायचे होते. अभिनयाचे गंध माहित नसतांना देवाने तिच्यावर जीवनातील मोठ्या अभिनयाची जबाबदारी टाकली होती. पोटी मुलबाळ नसल्याचे दु:ख कमी होते की काय आता पतीच्या गंभीर आजारपणाचे दु:ख पदरी आले होते.

नागपूरहून आल्या नंतर बाळूचा नियमित दिनक्रम चालू झाला. सकाळी ऑफिसला गेल्यावर संध्याकाळी घरी परत यायला थोडा होत असे. रजनीच्या वागण्यातील फरक बाळूच्या नजरेतून सुटला नव्हता. डॉक्टरांना टेस्ट रिपोर्ट दाखवून आल्यानंतर रजनीशी काहीच बोलणे झाले नव्हते. आपल्याला काहीतरी गंभीर आजार झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यामुळे रजनी काहीतरी ओझ्याखाली वावरत असल्याचा बाळूचा कयास होता. बाळूने पण गप्प बसण्याचे ठरवले. एक दिवस बाळू एकटाच डॉक्टरांना भेटायला गेला. रजनीच्या दु:खाचे रहस्य त्याला जाणून घ्यायची तीव्र इच्छा होती. सुदैवाने क्लिनिक मधे गर्दी नव्हती. बाळूचा दुसराच नंबर लागला. डॉक्टरांनी त्याचे स्वागत केले. त्यांच्या लगेच परिस्थिती लक्षात आली. बाळूला त्याच्या आजाराचा सुगावा लागला असण्याची शक्यता होती. तसेच झाले होते. बाळूने आपले मन डॉक्टरांकडे मोकळे केले. खूप मोठे स्पष्टीकरण देऊन डॉक्टरांनी त्याला त्याच्या आजाराची कल्पना दिली. सहानुभूती व्यक्त करण्याची ही वेळ नव्हती. खंबीरपणे आजाराला तोंड देणे गरजेचे होते. बाळूने खाली मान घालून सर्व ऐकून घेतले. डोळयातील अश्रू त्याला थांबवणे शक्य नव्हते. डॉक्टरांच्या टेबलावर डोके ठेऊन बाळू ओक्साबोक्सी रडू लागला. डॉक्टरांनी त्याच्या डोक्यावर प्रेमळ हात फिरवून त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. बाळू तू समजदार आहेस. प्रारब्धा पुढे माणसाचे काही चालत नाही त्या पुढे झुकावेच लागते. ही अगतिकता म्हण. पण मन दगडासारखे कर. प्रत्येकाला एक ना एक दिवस हे जग सोडून जायचे आहे हेच केवळ अंतिम सत्य आहे. फक्त

जाण्याच्या तारीख व वेळेविषयी तो अनभिज्ञ असतो. मनुष्य जन्म झाल्यावर तो जगरहाटीत अनेक मोहपाशात गुंतत जातो. या मोहपाशातून मुक्ती मिळवणे त्याला शक्य नसते. कितीही इच्छा असली तरी त्याला एक दिवस सगळयांचा निरोप घ्यावाच लागतो. त्यामुळे मरणाला घाबरू नकोस. परंतु निधड्या छातीने आजाराला तोंड दे. तुझावर रजनी जीवापाड प्रेम करते. तिला दु:ख होईल असे वागू नको. तिलापण विश्वासात घे. दोघांनी मिळून आजारावर विजय मिळवा. गलीतमात्र न होता आजाराला कसे हरवता येईल हेच एकमात्र ध्येय ठेवा. आता तुमच्या दोघांपुरतेच जग सीमित करा. बाळूला समजावून सांगतांना डॉक्टरांचे स्वतःचे डोळे कधी भरून आले समजलेच नाही. बाळूने काहीश्या निर्धाराने डॉक्टरांचा निरोप घेतला.

बाळूने घरी येतांना मिठाईच्या दुकानातून रजनीच्या आवडीच्या गरम गरम कचोऱ्या घेतल्या. रजनी त्याची वाट बघतच बसली होती. उशीर झाल्या बद्दल नाराजी होती. बाळूने आणलेल्या गरम गरम कचोऱ्या पाहून तिला आनंद झाला. तिने पण बाळूच्या आवडीचा चांगल्या तुपातील शिरा केला होता. दोघांनीही न आवडणाऱ्या विषयावर न बोलण्याचे जसे ठरवून टाकले होते. आज खूप दिवसात दोघांनी आनंदाने जेवण केले. बेडवर गेल्यावर दिवसभर थकल्याने रजनीला लगेच झोप लागली. बाळू मात्र भविष्यात काय वाढून ठेवले असेल याचा विचार करीत होता. पहाटे चारच्या दरम्यान बाळूला डुलकी लागली.

पार्किन्सन आजार झाल्याची कल्पना येऊन वर्ष उलटून गेले होते. डॉक्टरांचे औषधे नियमित चालू होती. नियमितपणे महिन्यातून एक दिवस डॉक्टरांकडे व्हीजीट होती. फ़िजिओथेरपीस्ट रोज येत होता. तो रोज दोन तास मसाज करीत होता. बाळू अजून ऑफिसमधे नियमित जात होता. ऑफिसच्या सहकाऱ्यांना बाळूच्या आजाराची कल्पना आली होती. त्याच्या प्रकृतीला झेपेल एव्हडेच काम त्याला दिले होते. नवीन आलेले साहेब बाळूला त्रास होणार नाही याची काळजी घेत. त्याच्यावर वेळेचे कुठलेही बंधन ठेवले नव्हते. त्याला जास्त कॉम्पुटरचे काम दिले होते कारण उजव्या हाताला व बोटांना कंप होत असल्याने बाळू पेन हातात धरू शकत नव्हता. प्रयत्न करून सुद्धा अक्षरे कागदावर निट उमटत नव्हते. सगळयांबरोबर बाळू दुपारी डबा काढून जेवायला बसे. सगळयांचे जेवण होऊन जात असे बाळूचे मात्र हळूहळू जेवण चाले. कारण घास गिळायला बाळूला त्रास होत असे. चालतांना उजवा पाय लौकर उचलला जात नव्हता.

उचलला गेला तर लौकर खाली ठेऊ शकत नव्हता. उजवा पाय जमिनीवर घसरून त्याला चालावे लागे. वाचायला त्याला त्रास होत असल्याने डोळयावर जाड भिंगाचा चष्मा आला होता. अनिल त्याला रोज स्कूटरवरून ऑफिसमधे आणत होता व संध्याकाळी घरी सोडून देत होता.

हालचाली संथ झाल्याचे बाळूच्या लक्षात आले. नसा आखडल्यामुळे चपळता राहिली नव्हती. दाढी करणे, भांग पाडणे, प्यांट अथवा पायजमा घालणे सारख्या कामासाठी रजनीच्या मदतीची गरज पडू लागली. रजनीने घरच्या घरी लोणचे, पापड, मसाले तयार करून विकण्याचे काम सुरु केले. कमी रेट, चांगला दर्जा व मनमिळाऊ स्वभावामुळे थोड्या दिवसात कॉलनीत चांगली विक्री होत होती. चार पैसे मिळाल्याने संसारात मदत होत होती. बाळूचे ऑफिसला जाणे अनियमित झाले होते. ऑफिसची काहीही तक्रार नव्हती. एकदोन दिवस बाळू ऑफिसला जाऊ शकला नाही तरी त्याच्याकडे रजेचा अर्ज मागितला जात नव्हता. उठणे व बसणे या क्रिया करतांना बाळूला त्रास व्हायला लागला. बरेचदा बाळू काय बोलत आहे हे फक्त रजनी शिवाय दुसरे कोणी समजू शकत नव्हते. रजेचा अर्ज न देता रजा उपभोगणे बाळूच्या स्वभावाला मानवत नव्हते. त्याने एक महिन्याची सिक लिव्ह काढली. रजनी त्याची लहान मुला सारखी काळजी घेत होती.

सहा महिने झाले बाळूला रजा वाढवावीच लागली. कारण कोणाच्याही मदती शिवाय एकटे वावरणे बाळूला शक्य होत नव्हते. दिवसेंदिवस बाळूची खालवत जाणारी प्रकृती रजनी उघड्या डोळयांनी बघत होती. कधीतरी वेळ मिळेल तशी बेडरूममध्ये जाऊन रडून दु:खाला वाट करून देत होती. बाळू समोर आपल्या चेहऱ्यावर कुठलाही तणाव दिसणार नाही असा प्रयत्न कसोशीने करत होती. आई बाबा नियमित येत होते. रजनीला काय पाहिजे नको बघत होते. बाबांनी काही दिवस आईला रजनीकडे मदतीसाठी पाठवले होते. रजनीला आईचा मोठा आधार वाटत होता. बाळूला छोट्या छोट्या गोष्टींचे विस्मरण व्हायला लागले. एक दिवस बाळू बाथरूम मधून आंघोळ करून बाहेर येत असतांना घसरून पडला जवळ असलेल्या वाशबेसिनवर डोके आपटल्याने जखम झाली, रक्त यायला लागले. पडल्याचा आवाज ऐकून रजनी व आई धावत आल्या. बाळूला धरून बेडवर निजवले. आईने पटकन हळद आणून कपाळावरील जखमेत भरली.

रजनीने डॉक्टरांना फोन केला. डॉक्टरांनी बाळूला काही दिवस हॉस्पिटलमधे एडमिट करायला सांगितले. लगेच फोन करून अम्बुलन्स, हॉस्पिटलमधे सूचना दिल्या.

बाळूला पुढचे दोन महिने हॉस्पिटलमधे काढावे लागले. आपल्याला काय झाले होते म्हणून एडमिट केले हे काही केल्या बाळूला आठवत नव्हते. ऑफिस चे सहकारी, मित्रमंडळी, कॉलनितील शेजारी बाळूला बघायला दवाखान्यात येऊन गेले. डॉक्टरांच्या सांगण्यावरून बाळूला घरी आणले गेले. रजनीची होत असलेली धावपळ, कष्ट, ओढाताण बाळूला बघवत नव्हता. बाळूला आता देवाने लौकर बोलावून घ्यावे असे वाटायला लागले. रजनीला आपण कधीच सुखात ठेऊ शकलो नाही याचे त्याला दु:ख होते किंबहुना आपला आजार हाच या सर्व दु:खाचे मूळ असल्याची त्याची खात्री झाली होती. कोणापाशीही मनातील भावना तो व्यक्त करू शकत नव्हता. सगळीकडून कोंडी झाल्यासारखे वाटत होते. बेडवर पडून कंटाळा आला होता. अगतिकतेचा कळस झाला होता. लहानपण आठवत होते. थोडे आजारी असलो तरी आई किती काळजी घेत होती. अंगात ताप असला तर लगेच मिठाच्या पाण्याच्या घड्या कपाळावर ठेवत असे. थोडेसे खरचटले तरी लगेच हळद लावीत असे. आई च्या मिठीत शिरून किती मोठा आधार मिळत होता. कितीही मोठे झालो तरी संकट आल्यास आई च्या मिठी शिवाय सुरक्षित जागा दुसरी नव्हती. आईच्या आठवणीने बाळू सद्गतीत झाला. डोळे भरून आले. आई आता असती तर, बाळ तुला बरे वाटत नाही का? काही दुखते आहे का? डोके चेपून देऊ का, विचारले असते. खोबराच्या तेलानी डोक्याची मालिश करून दिली असती. झोप लागे पर्यंत थोपटीत बसली असती.

पुढचे काही महिने बाळूच्या आजारपणाचा तणाव कायम राहिला. रजनी आता बाळूच्या आईच्या भूमिकेत होती. एखादी आई बाळाची काळजी घेते तशी ती बाळूची काळजी घेत होती. घरातील जबाबदारी आई पार पडत होती. मोठा आधार होता आईचा. बाबा वरचेवर येत होते. बाळूची हालचाल बेड ते आरामखुर्ची व परत बेड अशी सीमित झाली होती. बाळूला आपले भविष्य दिसत होते. आपण काही दिवसांचे सोबती आहोत हे त्याला जाणवले होते. काही गोष्टी लवकर करण्याचे त्याने ठरवले. त्याने अनिलला फोन करून बोलावून घेतले. अनिलकडून

उदयराजे वकिलांना बोलावून घेतले. वकील आल्यावर इच्छापत्र बनवण्यास सांगितले. इच्छापत्र बनवण्याचे खरे तर काही कारण नव्हते. पण आपल्या नंतर रजनीला आपले जे काही आहे ते सर्व बिनासायास मिळावे अशी त्याची इच्घा होती. त्यानुसार राहता फ्लॅट रजनीच्या नावावर केला. स्टेट बँकेत असलेले ५५ हजार रोख, महाराष्ट्र बँकेत असलेल्या तीन लाखाच्या फिक्स डीपोझीट, तसेच डीपार्टमेंट कडून त्याच्या मृत्यूनंतर मिळणारी सर्व रक्कम रजनीला मिळेल अशी व्यवस्था केली. त्याने घेतलेली मारुती-८०० कार कव्हरने झाकलेली होती. तसा कारचा उपयोग करण्याची वेळ फार कमी वेळा आली. त्याने कार पण रजनीच्या नावावर केली. वकिलांता निरोप देऊन त्याने समाधानाने डोळे मिटले.

पुढचे सहा महिने परिस्थितीत काही फारसा फरक पडला नाही. रजनीची आई बाळूला आपला मुलगा मानूनच त्याची सेवा करीत होती. एकदिवस सकाळी बाळूला जाग आली रूममधे कोणीच नव्हते. खूप प्रयत्नाने त्याने उठण्याचा प्रयत्न केला. उजवा पाय ताठ झाला होता तसेच घसरत चार पावले चालला. रूममधे मोठा आरसा होता. आपण कसे दिसत असू हे बघण्यासाठी तो आरशा समोर उभा राहिला. एकदम घाबरून गेला आरशातले प्रतिबिंब त्याचे नव्हतेच. समोर दुसराच कोणीतरी उभे असल्यासारखे वाटत होते. त्याने स्वःताहाला ओळखलेच नाही. डोळे खूप मोठे वाटत होते. शरीर कृश झाले होते. दोन्ही हात अविरत हालत होते. कमरेत झुकाव आला होता. जास्त वेळ त्याला आरशा समोर उभे राहता आले नाही कारण तो लगेच भोवळ येऊन तो खाली पडला. तेवढ्यात आलेल्या रजनीने आईला ओरडून बोलावले व दोघींनी त्याला परत बेडवर झोपवले.

रजनी संघ्याकाळी डॉक्टरांकडे गेली. तिने डॉक्टरांना बाळूच्या आजच्या परस्थितीशी अवगत केले. डॉक्टरांनी निर्विकारपणे सर्व ऐकून घेतले. रजनी पूर्वी मी बाळूवर एकदिवस अशी वेळ येणार हे सविस्तर सांगितले होते. थोडी अधिक माहिती आता देतो. या आजाराचा शोध इंग्रज डॉक्टर जेम्स पार्किन्सन यांनी लावला व त्यांचाच नावाने या रोगाचे नाव प्रसिद्ध झाले. लाखात एखादाच या रोगाचा बळी होतो. फार रेअर/दुर्मिळ असा रोग आहे. अशा रुग्णाची शेवट पर्यंत काळजी घेणे, त्याच्या यातना कमी होतील हा प्रयत्न करणे एवढेच आपल्या हातात असते. या रोगापासून पूर्णपणे बर होण्याचे औषधाचा शोध अजून लागला नाही. संशोघकांचे प्रयत्न चालूच आहेत. आजारी व्यक्तीला जेवढ्या वेदना होतात तेव्हडाच प्रमाणात मानसिक त्रास त्याची काळजी घेणाऱ्या व्यक्तीला होतात. हेच आपले प्रारब्ध समजून चालायचे.

घरी येऊन रजनी आईच्या कुशीत शिरली व ओक्साबोक्शी रडू लागली. आईने तिला रडु दिले. मनावरचे ओझे हलके होण्याचा तोच एक उत्तम मार्ग होता. सांत्वनाला शब्द नव्हते. अग मुली देवावर विश्वास ठेव. तो नक्कीच चांगले करील. काही गोष्टी मनुषाच्या हातात नसतात. देवाने सर्वांना आनंद, दु:ख कमी अधिक प्रमाणात दिले आहे. काही लोकांचे दु:ख सगळयांना दिसते जाणवते, पण काही लोकांचे दु:ख कोणालाही दिसत नाही, जाणवत नाही, फक्त त्या व्यक्तीच्या ह्दयाला जाणवतात व दु:खाला वाच्या न फुटताच तसेच त्याला हे जग सोडून जावे लागते. तू फक्त कर्म करीत रहा. तू आमची एकुलतीएक मुलगी. तुला संसारिक सुख नाही हे मला व बाबांना समजून चुकले आहे.

आहे ते स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. दुसऱ्याचे दु:ख समजून घ्यायला फार मोठे मन असावे लागते ते फार विरळ लोकांमध्येच असते. तुझ्या नशिबात कायम दु:ख लिहिले आहे असे मी मुळीच म्हणणार नाही ते प्रारब्ध आहे. नशीब व प्रारब्ध यात अस्पष्ट रेषा आहे. प्रयत्नाने नशिबावर मात करता येते अशी उदाहरणे आहेत पण प्रारब्धात जे असते ते भोगावेच लागते त्याला पर्याय नाही.

दिवसेंदिवस बाळूची प्रकृती खालावत होती. घरच्यांना त्याच्या यातनांची कल्पना होती पण सगळे अगतिक होते. बाबा पण आता रजनी बरोबर रहायला आले होते. सहा महिने अजून गेले. बाळूला बेडवरच जेवण, चहा, पॉट द्यावा लागे. त्याच्या चारही मोठ्या भावांना बाबांनी बाळू अत्यंत सिरीयस असून भेटायला यावे अस निरोप दिला. चौघांकडून काहीही प्रतिक्रिया आली नाही, भेटायला येणे दूरच राहिले. भाऊबंदकी पहायला मिळते जिथे वाडवडीलांनी अमाप संपत्ती मागे ठेवली असते. पण जिथे वाडवडीलांनी शेती, घर, सोनेनाणेच काय पण फुटकी कौडीही सोडली नाही ते भाऊ सुद्धा एकमेकांचे तोंड पहायला तयार नसतात हे नवलच. याला इंग्रजीत **“personality crisis “** म्हणतात. काहीही कारण नसतांना मी दुसऱ्यापेक्षा कसा श्रेष्ठ

आहे ही त्यांची मानसिकता कधीही/कशाही प्रकारे दूर होत नाही. असे लोक संपून जातात पण या स्वतःच बनवलेल्या मानसिक कोशातून बाहेर पडत नाहीत.

गेले तीन दिवस बाळूने काहीही खाल्ले नव्हते. सगळयांना काळजी वाटायला लागली. बाबांनी डॉक्टरांना फोने केला. डॉक्टरांनी बाळूला ताबडतोब दवाखान्यात एडमिट करायला सांगितले. हॉस्पिटलची ॲम्बुलंस लगेच पाठून दिली. तिसऱ्या मजल्यावरील साय. सी. यु. मधे बाळूला एडमिट केले होते. हॉस्पिटल अत्यंत स्वच्छ होते. अनेक गंभीर रोगी असतांना सुद्धा वातावरणात कुठेही गंभीरता दिसत नव्हती. तिसऱ्या मजल्यावर यायला लिफ्ट होती. दोन दिवसांच्या प्रयत्ना नंतर बाळूची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले.

अतिदक्षता विभागातून बाळूला जनरल वार्डमधे हलवले गेले. एक दिवस निरीक्षणाखाली ठेऊन परवा डीसचार्ज देणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. फक्त त्याला पेज, फळांचा रस असे पातळ पदार्थच द्या. सगळयांनचा जीव भांड्यात पडला. रजनीला वाटले आता धोका टळला आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी बाबांनी हॉस्पिटल दुकानातून सफरचंदाचा जूस बाळूसाठी खास आणला. कारण तो जेवत नव्हता व तकवा राहणे गरजेचे होते. डॉक्टरांनी बाळूला जूस देण्याची परवानगी दिलीच होती. एका काचेच्या बाउलमधे जूस घेऊन चमच्याने रजनी बाळूला जूस भरवत होती. सगळे कॉट भोवती जमा झाले होते. तीन चमचे जूस बाळूने सावकाश घेतला. अजून दोन चमचे जूस तोंडात सोडला गेला, त्याबरोबर बाळूला मोठा ठसका लागला. तोंडातील जूस बाहेर पडला. ठसका थांबत नव्हता. सगळेच घाबरले. ताबडतोब डॉक्टर आले त्यांनी सर्वांना बाहेर जाण्यास सांगितले. परत अतिदक्षता विभागात हलवण्यात आले. फोन करून स्पेशालीस्ट डॉक्टरांना बोलावले गेले. चार तास उलटून गेले डॉक्टरांची टीम बाहेर आली नाही. रजनीला धडधड व्हायला लागले. सर्व तणावाखाली होते.

डॉक्टर बाहेर आले तेव्हा सर्वजण त्यांच्या भोवती जमा झाले. डॉक्टरांनी सांगितले की तूम्ही दिलेला जूस बाळूला निट गिळता आला नाही, ठसक्यामुळे जूस बाळूचा छातीत पसरला. त्यात त्याला माईल्ड ऐटक आला. तो आता कोमात गेला आहे. तरी आमचे प्रयत्न चालू आहेत काळजीचे कारण नाही. त्याचा स्वासोस्वास नियमित चालण्यासाठी त्याला व्हेनटीलेटरवर ठेवले आहे. प्रकृतीत सुधारणा झाल्यावर व्हेनटीलेटर काढले जाईल. कोणालाही काहीच सुचत नव्हते.

सगळे पांगून गेले. रजनी व तिची आई आय. सी. यु. मधील बाळूच्या समोरील रिकाम्या कॉट वर बाळूकडे केविलवाणे बघत बसल्या. इतक्यात नर्सने त्यांना बाहेर बसायला सांगिलते. बाबांना रजनी जवळ बसवून आई घरी आंघोळ व स्वयंपाक करायला निघून गेली. पुढचे महिनाभर बाळूजवळ एकजण थाबुन बाकीचे घरी जाऊन आवरून येत. बाळूचा जेवणाचा डबा आणायला डॉक्टरांनी नाही सांगितले होते. बाळू अजून कोमातच होता. बाळूला फक्त लीक्वीड फूड नाकावाटे दिले जात होते. नातेबाइकांना सुद्धा फक्त ठराविक वेळी थोडाच वेळ बाळूला बघण्याची परवानगी होती. बाळूला व्हेनटीलेटर लावलेले होते. स्वासोस्वास व छातीची हालचाल होतांना दिसत होती. डोळे बंदच होते. बाकी काहीही हालचाल दिसत नव्हती.

अजून एक महिना झाला. परिस्थितीत काहीही बदल दिसत नव्हता. दुपारी दोन वाजता डॉक्टर व्हिजिटला आले. बाबा, आई व रजनी दवाखान्यातच होते. डॉक्टरांनी तिघांना केबिनमधे येण्यास सांगितले. आता काय वाढून ठेवले असेल या दडपणाखाली तिघे केबिनमधे गेले. डॉक्टर चेअरवर बसले होते. समोर बाळूची फाईल टेबलावर होती. तिघांना बसायला सांगून डॉक्टरांनी रूमालाला चष्मा पुसून निर्विकारपणे बोलायला सुरवात केली. तुम्हाला कल्पना नसेल कदाचित पण सांगणे माझे कर्त्यव्य आहे. बाळूला आपण व्हेनटीलेटरवर ठेवले असल्याने स्वासोस्वास चालू आहे, छातीची कंपन दिसते. पण हे नैसर्गिक नाही या क्रिया व्हेनटीलेटरमुळे जाणवत आहेत. काही तासात बाळूचे ब्रेन डेड होईल म्हणजे त्याचा मेंदू काम करेनासा होईल म्हणजे मृत होईल. व्हेनटीलेटरवर असल्याने त्याचा स्वासोस्वास चालू राहील छातीची कंपन दिसत राहील पण ते कृत्रिम असेल. व्हेनटीलेटर काठले तर तो एक तासात मृत पावेल. मनाचे खोटे समाधान व दवाखान्याचे प्रचंड बिल आपण थांबवले पाहिजे. बाळूचे व्हेनटीलेटर काढण्यास तुमच्या परवांगीची गरज लागेल. त्याला यातनांपासून मुक्ती दिली पाहिजे. मनाविरुद्ध कठोर निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. भावनांना बाजूला ठेऊन सारासार विचार केला पाहिजे. एक तासात आहे तुमचा निर्णय मला कळवा म्हणजे पुढची तयारी करायला.

तिघेही बाहेर आले. रजनी सुन्न झाली होती. काय चालले आहे तिच्या डोक्यावरून जात होते. बाबांनाच पुढाकार घेणे भाग होते. बाबांनी लगेच बाळूच्या चारही भाऊ, ऑफिसचे साहेब, कॉलनीतील तात्या व वकिलांना तातडीने या असा फोन वरून निरोप दिला. तासभरात सगळे जमले. डॉक्टरांनी जे सांगितले होते ते सर्व बाबांनी सर्वांना सविस्तर सांगितले. सगळयांनी मान्यता दिली. तसा निरोप डॉक्टरांना दिला गेला. डॉक्टरांनी तातडीने सर्वांना बाबा, आई,

रजनी सहित परत एकदा केबिनमधे बोलावले. रजनी स्तब्ध झाली होती जशी या जगात नव्हती. डॉक्टरांनी बोलायला सुरवात केली. तुम्हाला सर्वांना अजून एक पुण्य कर्म करण्याची विनंती करण्याची आहे. निर्णय रजनीलाच घ्यायचा आहे. नंतर त्यांनी शरीराच्या अवयवांच्या दानाचे महत्व समजून सांगितले. फक्त ब्रेन डेड व्यक्तीलाच असे अवयव दान करता येते. बाळूने काही इच्छा व्यक्त केलेली नसल्यास त्याची पत्नी हा निर्णय घेऊ शकते. मृत झाल्यावर काही कालावधी साठी काही अवयव दान केल्यास ज्यांना गरज आहे अशा पेशंटला देता येतात. जसे, किडनी, डोळे, लिव्हर, स्कीन, बोन, हार्ट वाल्व्ह, ईयर ड्रम, ईयर बोन. यातील जे अवयव चांगल्या स्थितीत आहेत त्यांचेच फक्त दान करता येते. पंधरा मिनिटात मला तुमचा निर्णय कळवा. रजनीच्या डोळया समोरून लग्न झाल्यापासूनचा चित्रपट फिरला. नेहमी दुसऱ्यांच्या मदतीला धावून जाणारा बाळू आठवला. मृत्यूनंतर सुद्धा आपले अवयव कोणाच्या तरी उपयोगी पडणार असतील तर बाळूच्या आत्म्याला नक्कीच आवडेल. रजनीने क्षणाचाही वेळ न दवडता डॉक्टरांनी दिलेला फार्म भरून दिला व आवेगाने आईच्या कुशीत येऊन मोठ्याने हंबरडा फोडला.

पुढची तयारी करायला अनिल दोन मित्रांना घेऊन रजनीच्या घरी गेला. आई पण रजनीला घेऊन घरी गेली. दीड तासांनी बाळूचे पांढऱ्या शुभ्र चादरीत गुंडाळलेले शव स्टेचरवर आणले गले. जमलेला जमावाच्या डोळयातून अविरत अश्रू वाहत होते. हॉस्पीटलचा सर्व स्टाफ गदगदून गेला होता. बाबा व बाळूचे ऑफिसचे सहकारी यांनी बाळूचे शव अम्बुल्न्चसमधे ठेऊन घरी आणले. बाळूचे चारही भाऊ, आईबाबा, रजनी, ऑफिसमधील साहेब, सहकारी, कॉलोनीमधील लोक असा मोठा जमाव जमला होता. सगळयांच्या डोळयातून गंगाजमुना वाहत होत्या. परंतु रजनीच्या डोळयातून एक टिपूसही पडत नव्हता. भकास डोळयांनी रजनी सर्व निर्जीव पणे बघत होती. तिरडीवर शव ठेवण्यात आले. बाहेर एका मडक्यात भात शिजत ठेवला होता. आंघोळ घालणे शक्य नव्हते. सगळा परिसर स्तब्ध झाला होता. तिरडीवरील शवास सुतळीने बाधण्यास सुरवात झाली. शवाच्या नाकात कापूस ठेवला. शव एका पांढऱ्या कपड्याने झाकले गेले. अंगावर गुलाल टाकण्यात आला. रांगेने येऊन सर्वांनी हार घालून नमस्कार केला. आयुष्यभर ज्या भावांनी दुश्स्वास केला त्यांच्याच खांद्यावर बाळूच्या शवाचा शेवटचा प्रवास होणार होता ! रजनीच्या तोंडातून शब्दही निघत नव्हता. जमलेल्या बाईकानी तिला रडवण्याचा खूप प्रयत्न केला. रडून व्यक्त न झाल्यास रजनीला त्रास होण्याची शक्यता होती. जशी तिरडी उचलली गेली तसे रजनीने मोठा हंबरडा फोडला व कोसळून खाली पडली.

# तुझे ते माझे

केविलवाणेपणानं ओरडण्याचा, आक्रोश, प्रचंड गोंधळाच्या आवाजाने आता मला असहाय्य झाले. मला गोंधळ, आवाज अजिबात सहन होत नाही हे सगळ्यांना माहिती आहे. आजकाल वयोमानामुळे कोणीच माझे ऐकेनासे झाले आहे. सगळेच नातेबाईक सभोवती गोळा झालेले दिसत होते. माझा बहुतेक मृत्यू झाला असावा, कारण मला तिरडीवर झोपवण्यात आलेले होते. मला चार मुले व तीन मुली. मोठा बाळ, दुसरा उमेश, तिसरा अनिमेश आणि चौथा बाबा सर्वांचे लग्न झालेले. मोठी मुलगी नीशा, दुसरी कला, तिसरी माया. परिवारातील सर्वच सदस्य शोक करतांना दिसत होते. शरीर हालचाल करत नसले तरी मन विचार करण्यास समर्थ होते. माझ्या मृत शरीराला स्मशानभूमीत नेण्यात आले. सरण रचून माझ्या शरीराला अग्नी देण्यात आला. शरीराची सरणावर अग्नीमुळे जळून राख झालेली असली व माझे अस्तित्व इतरांना जाणवत नसले तरी मला जाणवत होते. कदाचित माझे शरीर नष्ट झाले असले तरी अतृप्त आत्मा भरकटत असावा. माझा भूतकाळ मला स्वच्छ दिसत होता. आता माझा परिचय मीच मृत्यू नंतर देणे खरे दुदैवीच पण नाईलाजाने देत आहे.

मी शंकरराव रामराव भानोसे, वय वर्ष ७१, व्यवसाय भिक्षुकी, गाव गोदावरी नदी काठी वसलेले नयनरम्य त्रेम्बकेश्वर.

नदीपात्राच्या जवळच भव्य चारमजली पेशवे कालीन जुना भव्य वाडा दिमाखात उभा आहे. पहाटेच्या मंगल प्रसन्न वेळेत वाड्यातील सुमधुर वेदमंत्रोचाराचे आवाजाने परिसरातील वातावरण मंत्रमुग्ध होत असे. पूर्वजांकडून मिळालेल्या माझ्या मालकीच्या या वाड्याचा मला खूप अभिमान आहे. जिवंतपणी जाणवणाऱ्या यातनांची आता जाणीव होत नव्हती असे नाही पण जवळ जवळ सगळया जाणिवाच संपल्या होत्या. सगळया नातेबाईकांची माझ्या मृत्यूमुळे झालेल्या दु:खाचे प्रदर्शन करण्याची स्पर्धा जाणवत आहे. सुरवातीपासून जीवनाचा चित्रपट स्मृतीत उफाळून आल्यासारखा वाटत आहे. माझ्या कुटुंबाने जसे भरभरून आनंद सुख माझ्या पदरी टाकले तसेच हृदयाला छिद्र पाडणारे आत्यंतिक दुःख पण भोगावे लागले. जिवंतपणी माझ्या जीवनपटाचा विचार करण्यास सुद्धा कधी अवसर मिळाला नाही. आता माझ्या मृत आत्त्माला मृत्यु लोकातुन गती मिळणे पर्यंत म्हणजे मृत्यू नंतर आकराव्या दिवसांपर्यंत मी माझ्या

जीवनपटातील एकएक पदर कुठलाही आडपडदा न ठेवता मनमोकळेपणे तुमच्या समोर उलगणार आहे, कुणाचीही तमा न बाळगता, आत्म्याला पुढील गती मिळण्या आधी उरावरचे ओझे कमी करण्याचा प्रयत्न करणार आहे त्यामुळे कदाचित सद्गती नक्कीच मिळेल ! एक वेडी आशा.

तरूणपणी भरपूर व्यायाम करण्याची व आखाड्यातील मातीत कुस्ती खेळण्याची खूप आवड होती. चांगले कमावलेले शरीर होते. गोविंद माझा भाऊ माझ्या पेक्षा वयाने लहान पण सगळया बाबतीत तरबेज होता. आजोबांच्या देखरेखीखाली दोघेही आमच्या रामाच्या मंदिरातच वेद मंत्रपठण, षोडशोपचार पूजा, मौन्जीबंधन, लग्नविधी, शांतीपाठ इत्यादी विधी बरोबरच स्मशानभूमीतील विधी, मृतक दहन विधी, काक स्पर्श, अस्थिविसर्जन, १०वा, ११वा, व १२ राव्या दिवसांचे इत्यादी विधी करण्यात तरबेज झालो. आजोबांची मेहनत आमच्या दोघांची साथ बरोबर मंदिरातील रामाचे आशीर्वाद होतेच त्यामु आमच्या कुटुंबाची आर्थिक भरभराट होत राहिली. सामाजिक प्रतिष्ठा आर्थिक संपन्नता कुलस्वामिनी कृपेने दिवसेंदिवस वाढतच होती. आमच्या तिन्ही बहिणींचे लग्न थाटामाटात करून दिल्यानंतर वडिलांनी आम्हा दोन्ही भावांचे लग्न करण्याचे मनावर घेतले. त्या काळात घरचे वडीलधारीच वर/वधू संशोधन करीत व त्यांच्या पसंतीवरच लग्न ठरत असे. त्याप्रमाणे वणी गावाचे श्री. वणीकर यांची सुकन्या कुमारी. पार्वती हिने सौ. गिरजा शंकरराव भानोसे बनून आमच्या पारंपारिक वाड्याचा उंबरठा ओलांडून घरात प्रवेश केला. त्यानंतर गावात महिनाभर आनंदउत्सव साजरा होत होता. पंगती वर पंगती उठत होत्या.

साधारण दीड वर्षाच्या कालावधी नंतर गोविंदाचे लग्न सिन्नर चे श्री. देशपांडे यांची सुकन्या कुमारी. माया हिने, सौ. उज्वला गोविंद भानोसे बनून गृहप्रवेश केला. दोघांचे ही नवीन संसार आनंदाने फुलत गेले. त्याचबरोबर आमच्या पुरातन वाड्यासमोरील मोकळया जागेत चार मजली घराचे बांधकाम पण पूर्ण झाले. त्याचा उपयोग बाहेरगावाहून आलेल्या यात्रस्थींना राहण्यासाठी, धार्मिक विधी व वेद पठन/ अध्ययन करण्यासाठी तसेच योगाभ्यास करण्यासाठी उपयोग झाला. कालांतराने मला चार मुले व तीन मुली अशी अपत्य झाली. मोठा बाळ, दुसरा उमेश, तिसरा

अहनमेश आणि चौथा बाबा अशी मुले व निशा, कला, माया अशा तीन मुली झाल्या. गोविंदाला पण दोन मुले व दोन मुली झाल्या.

सर्व सुरळीत चालू असतांना कलीने आमच्या घरात चोरून प्रवेश कधी केला समजलेच नाही. कर्ता म्हणून कुटुंबाची सर्व जबाबदारी मी योग्य प्रकारे पार पाडीतच होतो. माझी चारी मुले व तिन्ही मुली लहानपणापासून मला भिक्षुकी व्यवसायात चोवीस तास मदत करीत होती. त्यात माझ्या सौ. चा सिहाचा वाटा होता. घरात नेहमी पाहुण्यांचा म्हणजे यात्रस्थांचा राबता असे. त्यांच्या साठी चहापाणी, नाष्टा, दोन्ही वेळेचे जेवण, भांड्याचा उपसा, कपडे धुणे इत्यादी सर्वच जबाबदारी माझी पत्नी आनंदाने पार पाडीतच होती. गोविंदा व त्याचे सर्वच कुटुंब या सर्व जबाबदारी पासून दूर होते. माझ्या पत्नी बद्दलची असूया गोविंदाच्या पत्नीच्या मनात दिवसेंदिवस वाढतच होती. पर्यायाने माझे व गोविंदा मध्ये वितुष्ट निर्माण होऊन मतभेद चालू झाले. धुसफूस वाढतच जाऊन नाइलाजाने शेवट चुली वेगळे होण्यात गेला. नवीन चारमजली घर गोविंदाच्या कुटुंबाला देऊन मी आमच्या वडिलोपार्जीत जुन्या वाड्यातच राम मंदिरा जवळ कुटुंबासह राहू लागलो. माझी मुले कर्तीसवरती झाली होती. तिन्ही मुली उपवर झाल्या होत्या. भिक्शुकीच्या व्यवसायामुळे मुलांच्या शिक्षणाकडे योग्य लक्ष देण्यात मी अपयशी ठरलो. आर्थिक सुबत्ता घरात नांदत असली तरी सरस्वतीचे वास्तव्य घरात कमीच होते असे म्हणता येणार नाही कारण शाळेच्या अभ्यासात मुले कमी पड्त असली तरी पाठशाळेत जाऊन वेदपारंगत झाली होती. संस्कृतचे श्लोक तोंडीपाठ होते. त्यातल्या त्यात उमेश व धाकटा बाबा स्वतंत्र पणे भिक्षुकी व्यवसायात पारंगत झाले होते. गोकुळाप्रमाणे आमचे घर नेहमी उत्साही व आनंदी असायचे. माझ्या तिन्ही मुलींचे कौतुक करावे तेवढे थोडेच होते. माझ्या सुवर्ण यशामध्ये माझ्या पत्नीच्या बरोबरीने कष्ट उपसणाऱ्या तिन्ही मुली मला भाग्यानेच लाभल्या होत्या. मोठा बाळ व तिसरा अहनमेश यांना भिक्शुकीच्या व्यवसायात कधीच गती नव्हती.

एक दिवशी सायंकाळी ६ वाजता नेहमीप्रमाणे मी नदीकिनारी फिरावयास गेलो होतो. मी मोफत पाठशाळां घेत असे व तरुणांना वेद अभ्यास व संस्कृतचे श्लोक तोंडीपाठ करून घेत असे. त्यामुळे घरची ओढ लागली होती व जरा झपझप चालत घराकडे येण्यास निघालो होतो.

तिन्हीसांजेची वेळ होती, अचानक पाठीमागून एक दगड जोरात येऊन माझ्या उजव्या खांद्याला लागला. मी वळून बहघतले तर चार अनोळखी आडदांड माणसे हातात काठ्या घेऊन माझ्या अंगावर चालून आली होती.

त्या चारीही गुंडांना तोंड देण्यास मी असमर्थ होतो. पण तेवढ्यात एकाचा काठीचा फटका माझ्या उजव्या डोळयावर बसला. डोळयातून रक्त येऊ लागले. मी कोसळलो. त्यानंतर माझ्या दोन्ही पायांवर काठ्यांचा पाऊस पड्त होता. धोतराची शुद्ध राहिली नव्हती. तोंडातून शब्दही बाहेर येत नव्हता. कमरे पासून खालचे अंग बधीर झाले होते. समोरून कसलातरी वाहनाचा उजेड जवळ जवळ येत होता. तसे चारही गुंड पसार झाले. रिक्षातून आमचे भाडेकरू श्री. गुजराथी स्टेशनवर चालले होते. कसे बसे मला रिक्षात कोंबून मला दवाखान्यात दाखल केले. घरच्यांना निरोप दिला. डॉक्टरांच्या

अथक प्रयत्नानंतर तीन तासांनी मला शुद्ध आली. सभोवती बायको मुलांचे केविलवाणे रडणे चालूच होते. डॉक्टरांनी सर्वांना शांतता पाळण्याचे सांगून बाहेरच्या हॉल मध्ये नेले. या दुदैवी घटने नंतर मी सहा महिने अंथरूणावर खिळून होतो. अनेक प्रदीर्घ उपचारा नंतर माझ्या पायात घरातल् या घरात फिरण्याचे बळ आले. परमेश्वराचे मनोमन आभार मानले.

रविवारचा दिवस असल्याने घरची मंडळीं निवांत होती. एवढ्यात मुलगी कलाने पळत पळत येऊन मला सांगितले की कोणीतरी माणूस तुम्हाला भेटण्यास आला आहे, त्याला मी वर येऊन तुम्हाला भेटण्यास सांगितले पण त्याने तुम्हालाच खाली बोलावले आहे. पायांना झालेल्या दुखापतीमुळे मी काठीचा आधार घेऊन खाली आलो. मला आश्चर्याचा धक्काच बसला. त्या माणसाच्या दोन्ही डोळयातून अश्रूंची धार लागली होती. समोर गेल्यावर त्याने माझ्या पायांवर लोटांगण घातले. मला काहीच कळेना.

गुरुजी तो सांगू लागला, तुम्ही मला ओळखणार नाही, पण सहा महिन्या पूर्वी मी व माझ्या तीन मित्रांनी तुमच्या सारख्या देव माणसाला बेदम मारहाण केली होती. मला क्षमा करा. तुम्हाला मारण्याची सुपारी मिळाली होती. पैशाच्या लालचेने मी काम स्वीकारले. पण देवकृपेने तुमचा जीव वाचला पण नंतर माझ्या एकुलत्या एक मुलाला साप चावून त्याचा मृत्यू झाला. अरे बाबा मला तुझे नाव माहित नाही, तुझी ओळख पण नाही, मी तुझे काय नुकसान केले म्हणून तू

माझ्या जीवावर उठलास. गुरुजी माझी मती मारली गेली होती. कमी वेळेत, जास्ती पैसे मिळवण्या साठी मी तुम्हाला मारण्याची सुपारी स्वीकारली. अरे मुर्खा पण माझी कोणाशीच दुष्मनी नाही, माझा कोणी वैरी नाही. मी माझा प्रपंच, व्यवसाय प्रामाणिकपणे समाजसेवा समजून सर्वांशी मित्रत्वाचे स्नेह संबंध ठेऊन सरळ मागावनेच करीत आहे.

गुरुजी तुम्ही म्हणता ते खरेच आहे. समाजात तुमची खूप मोठी प्रतिष्ठा आहे पण तुमचे जवळचेच तुमचे वैरी बनले आहेत. मी त्यांचे नाव सांगू शकत नाही.

परंतु तुमच्या सर्वच कुटुंबाने यापुढे सावध रहावे म्हणून मी आपल्या चरणासी विनंती करावयास आलो आहे. मुलाच्या अचानक मृत्यूने देवाने शिक्षा दिलीच आहे, तरी पण तुम्ही द्याल ती शिक्षा मी भोगावयास तयार आहे. मी कोण बाबा शिक्षा देणारा? जो तो आपआपल्या कर्माचे चे भोग भोगतो. आपण जे काही पाप पुण्य करतो ते परमेश्वरा जवळ रुजू असते, मी त्याला सांगितले. माझ्या जवळचे कोण असु शकेल जो माझ्या मरणावर टपला आहे? सगळेच नातलग माझ्या कुटुंबावर माया करतात, तसेच माझे कुटुंबीय पण सर्वांशी आदराने, प्रेमाने वागतात. मी कुणाचे वाईट केलेले नाही. तुला तुझ्या कुटुंबाची शप्पत आहे, तुला माझ्यावर मारेकरी पाठवणाऱ्याचे नाव सांगावेच लागेल.

गुरुजी तुम्ही देवमाणूस आहात. तुमची शप्पत मला मोडता येणार नाही. तुमचा सख्या भावानेच मला तुम्हाला मारण्याची सुपारी दिली होती. काम पूर्ण झाले नाही म्हणून ठरलेले पैसे पण दिले नाहीत. आता मला माफ करा, अजून काही सांगण्यास मी असमर्थ आहे.

सगळे कुटुंबीय माझ्या भोवती जमा झाले. कोण अनोळखी माणूस आला होता? त्याने तुम्हाला असे काय सांगितले की तुम्ही एवढे अस्वस्थ झाले आहात? प्रश्नांचा भडीमार होत होता. माझे डोके काम करेनासे झाले. काय विचित्र विधिलिखित असू शकते नाही?. रक्ताचे नाते ही फक्त मानवी कल्पनाच असेल काय? सगळयांना शांत रहावयास सांगून आपापल्या कामात लक्ष देण्यास सांगितले. माडीवर जाऊन मी कॉट वर पहूडलो. डोके अनंत विचारांच्या खाइत ऊचंबळत

होते. वैयस्त्तक स्वार्थ आणि लाभापुढे पाप पुंण्याच्या सर्व सीमारेषा माणसांनी ओलांडल्या याचे अनुभवास आले होते. भाऊबंदकी इतकी टोकाची असू शकते? मानवी जीवनात सर्वच काही इथेच ठेवून सरणावर जावे लागते नाही का? तिरडी पण काढून घेतली जाते. आईच्या पोटातून बाहेरच्या जगात प्रवेश करण्याच्या अवस्थेतच मृत्यू नंतर याजगाचा निरोप घ्यावा लागतो. पैसा-अडका, स्थावर, जंगम, मालमत्ता, मान, अपमान सर्व काही ईथेच सोडून देणे भाग असते.

पण कालचक्र कधीच थांबत नाही. दिवसां मागून दिवस, वर्ष सरत होते. मुलामुलींची लग्न कर्तव्य पार पाडायचे होते. मोठा बाळला ओळखीने एका खाजगी कंपनीत लागून दोन वर्ष झाली होती. खांनदेशातील एका गरीब कुटुंबातील मुलगी पाहून थाटामाटात लग्न उरकून टाकले. असे म्हणतात सून करावी गरीबाघरची आणि मुलगी द्यावी श्रीमंता घरी. असा विचार मुलांच्या सुखी भविष्यासाठी पूर्वजांनी केला होता. पण दुदैवाने माझा हा निर्णय भविष्यात चुकीचा ठरणार होता याची मी कधी कल्पनाही केली नव्हती. दुसरा मुलगा उमेशचे लग्न पण थाटामाटात करण्यासाठी सौ. चे आणि माझे एकमत झाले. परंतु लग्नाच्या गाठी स्वर्गातच बांधल्या जातात याचे प्रत्यंतर आम्हाला लौकरच आले. मागच्या गल्लीत राहणारे श्री. भुजंग त्यांची मुलगी वनिता हिचाशी त्याचे सुत कधी जमले कोणालाच समजले नाही. मागील तीन वर्ष तो रोज देवपूजेला त्यांच्या घरी होता. श्री. भुजंग कुटुंबाला या प्रकरणाची नुसती कल्पनाच नाही तर त्यांची या प्रकरणाला संमतीही असण्याची दाट शक्यता नक्कीच होती. प्रकरण हाताबाहेर गेल्याचे समजल्यावर आमच्या पुढे दोघांचे लग्न करून देण्याशिवाय दुसरा पर्यायच राहिला नाही. जवळपासच्या सर्व ईस्टआत्पेष्टांना बोलून सांग्रसंगीत त्याचे लग्न थाटामाटात उरकून घेतले. सर्वच आनंदात होते. आता तिन्ही मुलींची लग्नाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर होते. मोठी मुलगी नीशा एका निमसरकारी ऑफिसमध्ये क्लार्क म्हणून कामास लागली होती. दादर मुंबई मध्ये राहणारे श्री. उध्दव उपासनी सेल्स डिपार्टमेंट मध्ये अधिकारी होते. मुलाला वडील नव्हते बहिणींनी लहानपणासून वाढवले शिकवले व नोकरीला लाऊन दिले होते. मुलगा सालस, मनमिळाऊ होता.

मुलामुलीच्या पसंदीसाठी आम्ही सहकुटुंब दादरला गेलो. उद्धवरावांनी निशाला लगेच पसंद केल्यामुळे सर्वच आनंदात होते. दोन दिवस मुक्काम वाढवून लगेच साखरपुडा उरकून परत आलो. सौ. समाधानी होती. एका मुलीची काळजी कमी झाली होती. एक उत्तम मुहूर्त बघून थाटामाटात लग्न पार पाडले. कुमारी. निशा आता सौ. उद्धव उपासनी झाली. पाच वर्षा नंतर उत्तम योग जूळन आले. कु. कला व मायाचे भाग्य अचानक उजळले. दोघींसाठी चांगल्या

सोयरिकी सांगून आल्या. फक्त एक दिवसाच्या अंतराने एकाच मांडवात सूमुहूर्तावर मोठ्या थाटामाटात लग्नाचा बार ऊडवून दिला.

कुटुंबात आनंदाला पारावार नव्हता. कलेला अभय चांदोरकर यांचे गावातील उत्तम स्थळ मिळाले. घरची गरिबी होती. मुलगा होतकरू होता. सरकारी नोकरी होती. आईवडील वृद्ध होते. निवृत्त शिक्षक होते. मुलाचे भविष्य उजव्वल होते. कलेची पसंदी होती. तसेच कु. मायला मुंबईच्या अंधेरीतील माधव जोशी यांचे स्थळ सांगून आले. मुलगा मुंबईला एका बँकेत अकौंटंट होता, स्वताचे घर होते. आर्थिक संपन्नता होती. मुलामुलीची पसंदी झाली होती. परमेश्वराची कृपा होती. तिन्ही मुली चांगल्या घरात गेल्या होत्या. कोणाचीच काळजी नव्हती. वर्षभर तिन्ही जावयांचे सणवार कौतुकात आनंदात साजरे झाले.

शनिवारचा दिवस होता. सकाळची नेहमीची धावपळ सुरु होती. अनेक लोक मला भेटण्यास पुढच्या हॉलमध्ये तिष्ठत बसले होते. मी कुठल्याही सल्ल्याचे पैसे कधीच स्वीकारत नसल्याने भेटण्यास आलेले लोक फळ, मीठाई, नारळ इत्यादी भेटी देत असत. लोक दुरदुरच्या गावाहून येत असल्यामुळे त्यांची प्रत्येकाशी वैयक्तिक ओळख नसायची. सवयीप्रमाणे रामाच्या फोटोला नमस्कार करून मी एकेकाशी बोलण्यास सुरुवात केली. गृह शांती, लग्न/मौंजी मुहूर्त काढून दिले. एका इसमास मुलीची कुन्डली बनवून घ्यायची होती. त्याची टिपणे घेतली. तो पर्यंत घरात पाहुण्यांना चहा पाठवण्यास सांगितले. मुलीला घेऊन एक इसम मुलीचे लग्न जुळत नाही म्हणून सल्ला मागायला आला होता. मुलीची मंगळाची कुंडली होती त्यावर मी उपाय सांगत होतोच इतक्यात एक माणूस घाईघाइत आला. समोर पेठ्याचा बॉक्स ठेऊन सासटांग नमस्कार केला. डोळयातून अश्रू वाहत होते. गुरुजी तुम्ही सांगितलेल्या उपायांमु ळे मला लग्नानंतर बारा वर्षा नंतर मुलगा झाला. घराला वारस मिळाला. मी तुमचे उपकार कधीच विसरणार नाही. असे सांगून तो घाईघाइत निघून गेला. नंतर मी मंगळाच्या मुलीच्या वडिलांना मंगळ उपवर मुलांची यादी दिली. दुपारचे नैवैद्य व आरती साठी मी रामाच्या मंदिरात जातो असे सांगून व मिळालेल्या भेटवस्तू घरात दिल्या, पेढ्यांचा आकर्षक बॉक्स मधील पेढे खाण्यास न विसरण्याचे सांगून मी निघालो.

मंदिरात लोकांची गदी होतीच. नैवैद्य व आरतीमोठ्या उत्सवाने पारपडली. मंत्रपुष्पांजली अजून संपली नव्हती तेव्हड्यात शेजारचा केशव मंदिरात धावतधावत आला. त्याने मला ताबडतोब नुसते घरी जाण्यास सांगितले नाही तर ओढतच घरी घेऊन निघाला. अरे मुर्खा काय घाई करतो आहेस. मंत्रपुष्पांजली अजून पूर्ण झाली नाही, लोक काय म्हणतील? आहो काका अनर्थ झाला आहे. घरातील सगळ्यांनाच उलटी, जुलाब सतत होत आहेत. मी डॉक्टरांना बोलावले आहे. सगळे घाबरले आहेत. काहीतरी संकट आले आहे. घरी पोहचे पर्यंत डॉक्टर आले होते. घरातील अवस्था पहावत नव्हती. घरातील सर्वच सदस्य अत्यावस्थेत होते. मी गर्भगळीत होऊन खाली कोसळलो. मंदिरातील लोक आमच्या मागे अचानक काय झाले बघायला आले होते.

मला लोकांनी खुर्चीत बसवले. डॉक्टरांनी सर्वांना दोन सतरंजीवर झोपवले होते. इंजक्शन देऊन आता पाण्याबरोबर दोनदोन गोळ्या देत होते, डॉक्टर माझ्या शेजारी बसले व मला शांत रहाण्यास सांगितले. गुरुजी अत्यंत संयमाने ऐका, त्यांनी खाल्लेल्या पेढ्यातून विष बाधा झाल्याचे दिसत आहे. मी नमूने तपासणेसाठी पाठवले आहेत. रिपोर्ट आल्यावर नक्की कळेल. वेळ पडल्यास दवाखान्यात दाखल करू. आता धोका टळला आहे तुम्ही मात्र धीराने राहा. सगळयांची काळजी घ्या. काही वाटल्यास मला फोन करा. असे सांगून डॉक्टर निघून गेले. मला कहीही सुचेनासे झाले होते. डोळे बंद करून सुन्न होऊन मी बसलो होतो. मंदिरातून आलेल्या बायका मंडळींनी घराचा ताबा घेतला होता. मदतीला रक्ताचे कोणीच नाते बाईक नव्हते. घरात अद्भुत शांता होती. आलटून पालटून उलट्या जु लाब सुरूच होते. दोन तासानंतर डॉक्टर परत आले. बरोबर रिपोर्ट आणला होता. पेढा खाण्यामुळेच विष बाधा झाल्याचे सिद्ध झाले होते. डॉक्टरांनी परत सगळयांना तपासले. त्यांचा चेहरा गंभीर होता. गुरुजी माझ्याजवळ येऊन खांद्यावर हात ठेवून डॉक्टर म्हणाले, काळजीचे कारण नाही परंतु सगळयांना दवाखान्यात दाखल करणेच योग्य ठरेल. तुम्ही घरी एकटेच आहात. दवाखान्यात सर्व उपचार उपलब्ध असतात, वार्ड-बोय, नर्सेस असतात. २४ तास निरीक्षणाखाली राहतील. येतांनाच मी चार अम्बुलन्स बोलावल्या आहेत. तुम्ही कशाचीही काळजी करू नका. खर्च करावाच लागणार आहे. सर्वांचे प्राण वाचवणे महत्वाचे आहे. गोपू माझा लहानपणापासूनचा सगळयात जवळचा, मित्र त्याने मला अशा संकट काळात आधार दिला.

दवाखान्यात १० दिवस मुक्काम होता. गोपूच्या घरूनच माझ्यासाठी दोन्ही वेळेचे जेवण येत होते. पेशंट साठी द्वाखान्यातुनच चहा, नाश्ता, व दोन्ही वेळेचे जेवण देत होते. डॉक्टरांनी खूपच मनापासून प्रयत्न केल्यामुळे सगळयांचा जीव नुसता वाचलाच नव्हता तर प्रकृती झपाट्याने सुधारत होती. आज सर्वांना डिसचार्ज मिळणार होता. डोळयातील अश्रू सुकले होते पण डोक्यात विचारांची सुनामी आली होती. घरी जाऊन सगळे स्थिरस्थावर होई पर्यंत बाळू बरोबरच होता. सगळयांसाठी सौ. ने पिठलं भात बनवायला मोठ्या सूनबाईना सांगितले व लहान सूनबाईना लगेच सगळयांसाठी चहा पाठवण्यास सांगितले. अत्यंत वाईट स्वप्नातून जाग आल्यावर होते तसे सगळयांचे डोके बधीर झाले होते. चहा नंतर जेवण झाल्यावर सर्व आपापल्या खोलीत विश्रांती साठी निघून गेले. राहिलो फक्त मी, सौ. आणि माझा मित्र गोपू, मुल त्याला गोपू काका म्हणायचे म्हणून सगळेच त्यांना गोपूकाका म्हणायचे. तसेच गुरुजी असे माझे नावच रुढ झाले होते. सौ. च्या डोळयात भीती व भविष्याबद्दलची चिंता सतावतांना उघडपणे दिसत होती. तिचे सात्वन करणे मलाही शक्य नव्हते. मी गोपूच्या मदतीसाठी त्यांना नजरेनेच इशारा केला. ते ओळखून गोपू काकांनी मोठ्याने ढेकर दिला व म्हणाले वहिनी आतां मी येतो, घरी जावयास पाहिजे, पण लौकरच मी तुमच्या हातचे गरम गरम जीलीबीचे व बरोबर गरम गरम साधा भात वरण व त्यावर गाईच्या तुपाची धार असा बेत जेवण्यास येणार आहे. तुमच्या कुटुंबावर कोसळलेली आत्ताची दुर्घटना म्हणजे भोग असतात ते भोगल्या शिवाय गत्यंतरच नाही. गुरुजी तुमच्या मागे रामाचे आशीर्वाद व पूर्वजांची पुण्याई आहे म्हणून तुम्ही अगदी जिवावरच्या संकटातून सुद्धा तारून जात आहेत.. अहो भावजी पण आम्ही काय कोणाचे घोडे मारले आहे म्हणून आम्हाला अशी जीवघेणी शिक्षा?

सौ. नी चचेत उडी घेतली, माझ्या वडिलांची शेती होती. ह्यांचा प्रामाणिकपणा, मनमोकळा पण कष्टाळू स्वभाव व मुलगी खात्यापित्या घरात सुखी राहील असा विचार करून माझे लग्न लाऊन दिले होते. माझ्या पायगुणामुळे आमच्या कुटुंबाची प्रगती नजर लागावी अशी होत राहिली. पण कुटुंब स्वास्थ कधीच मिळाले नाही. माझे सासरे फारच जहाल होते. थोडीशीही चूक झालेली त्याना खपत नव्हती. गोविंद भावजी त्यांचे फार लाडके होते. कुटुंबासाठी ह्यांनी कितीही जीवतोडून चांगले काम केले तरी त्याचे श्रेय गोविंद भावजीनाच मिळायचे. गोपूकाका मी माझ्या संसारात भरभरून पावले आहे परंतु ह्यांना पटणार नसले तरी सांगते, ह्यांचे घराणे शापीत असावे. दोन पुरुषां मधील संवाद फक्त कामापुरताच असतो काय? त्यात आपलेपणा

शोधूनही सापडत नाही फक्त भरपूर संपत्ती कमवली म्हणजे कुटुंब सुखी होते का? अजून काही कुटुंबाच्या जबाबदाऱ्या नसतातच का?

अहो वहिनी किती बोलता आहात. पण असो मन मोकळे होणे आवश्यक असल्याने तुम्ही बोला. गुरुजीचा स्वभाव लहानपणापासूनच अबोल, तुम्हाला कल्पना असणारच. पण वहिनी गुरुजींच्या घरातील भाऊबंदकी काय सगळ्या गावकीला माहिती नाही का? पण तुमच्या दोघांचे मुलानंवरचे संस्कार काही वाया जाणार नाहीत. परमेश्वरकृपेने यापुढे असे काहीही होणार नाही. असो, गुरुजी तुमचे काय म्हणणे आहे या बाबतीत.

अरे गोपू ही म्हणते ते सर्वच खरच आहे. मी कोणाला बोललो नाही पण मी इन्स्पेक्टर जाधव यांना भेटलो होतो. विषबाधेच्या सर्व केसेस दवाखान्याला कंपल्सरी पोलीस स्टेशनला कळवाव्याच लागतात. त्याप्रमाणे आपल्या सुद्धा केसची पोलीस स्टेशनला त्याची रीतसर नोंद झाली. इन्स्पेक्टर जाधव यांनी चौकशी करून ज्या माणसाने विष घातलेले पेढ्यांचा बॉक्स होता दिला त्या माणसाला ताब्यात घेतले होते. थर्ड डिग्री वापरल्यावर त्याने कबूल केले की एका व्यक्ती कडून त्याला दहा हजार रुपये मिळाले होते व काम झाल्यावर अजून दहा हजार रुपये मिळणार होते. गुरुजी लौकर सांग बाबा पुढे काय झाले? मारेकऱ्याने नाव सांगितले का? अरे गोपू त्यामाणसाचे नाव मला कळल्यावर मी बेशुद्धच झालो होतो. इन्स्पेक्टर जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी मला सांभाळले, पिण्यास पाणी दिले. ते नाव जिभेवर आणण्यास मला लाज तर वाटतेच पण त्यापेक्षा जास्त हृदय पिळवटून निघते. देव मला मृत्यू का देत नाही? कुठल्या जन्माच्या कुठल्या पापाची शिक्षा मला या जन्मी भोगावयास लागत आहे कळत नाही? बोलण्याचा सिरीयस विषय ओळखून सौ. माझ्या जवळ येऊन डोक्यावरून हात फिरवून मला आधार देऊ लागली. गोपू चे डोळे भरून आले होते. त्याने त्या व्यक्तीचे नाव ओळखले होते. सगळयांच्या तोंडातून एकदमच शब्द बाहेर पडला गोविंद !!!.

इन्स्पेक्टर जाधव यांनी गोविंदाला पकडायला दोन कॉन्सस्टेबल बरोबर वारंट घेऊन त्याच्या घरी पाठवले होते. तीन दिवस गोविंदाला पकडण्यात पोलिसांना यश आले नाही. अखेर चौथ्या दिवशी रात्री ९ वाजता नासिकरोड रेल्वे स्टेशनवर त्याला पकडून पोलीस स्टेशनला

आणले गेले. मला निरोप मिळाल्याबरोबर मी बाळू काका यांना बरोबर घेऊन पोलीस स्टेशनला पोहचलो. गोविंदाला पायावर नीट उभे पण राहता येत नव्हते. गर्भगळीत झाला होता. मला पाहून रडायला लागला, पाया पडू लागला, माफी मागू लागला. आईची शप्पत घेऊन परत असे करणार नाही असे सांगू लागला.

गोपूने त्याच्या दोन कानाखाली लगावल्या. अरे मूर्ख माणसा तुझ्या कडून इतकी हीन अपेक्षा नव्हती. कुठे फेडशील ही पापे. तुमच्या दोघांचे वडील प्रसिद्ध उपाध्ये होते; समाजात त्यांना खूप मान होता. शंकर व त्याच्या कुटुंबीयांनी तुझे काय घोड मारले आहे म्हणून तू त्यांच्या जीवावर उठला आहेस? गोविंदाचा नाटकी स्वभाव लहानपणापासू न होता. त्याची कणव घेऊन माफ करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.

क्षणभर डोळ्यासमोरून घरातील सगळयांचे केविलवाणे चेहरे फिरले. कुटुंबातील प्रत्येकाने जीवाच्या आकांताने मृत्यूशी झुंज देताना दवाखान्यात पाहिले होते. खुनाचा प्रयत्न करण्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला. दोघांवर कोर्टात खटला चालला.

आत्म्याला शरीर नसतांना सुद्धा यातना होत असतील का? असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. मी सांगतो मला शरीर राहिले नव्हते, पण दु:खी विचारांनी हृदयात कालवाकालव होत असलेले जाणवत होते. कदाचित कल्पनेतील वेदना असतील. इकडे गंधमुक्तीचा घरात विधी चालु झाला होता. माझ्या विचारांचे वलय आता हळू हळू विरळ होत चालले होते. मला मनुष्य योनीतून मुक्ती मिळणार होती.

पण प्रेत योनीतून कधी मुक्तता मिळणार हे सर्व भावभावनांच्या पाशातून कधी मुक्तता मिळणार यावर अवलंबून होते.

कालचक्र फिरतच होते. पाच वर्षाचा कालावधी कधी मागे पडला समजलेच नाही. ग. भा. गिरीजा शंकरराव भानोसे सुटकेस भरण्यात मग्न होत्या. त्यांना कलेच्या दुसऱ्या डिलिव्हरी साठी औरंगाबाद जवळच्या खुलताबादला जायचे होते. जावई सध्या खुलताबादला बदलीवर होते. कलेचा पहिला मुलगा अभय खूपच हुशार होता. इंग्रजी शाळेत ७ वी इयत्ता शिकत होता. मोठ्या

बाळला एक मुलगा एक मुलगी होती. उमेशला तीन मुली एक मुलगा होता. अनिमेशला अजून अपत्य नव्हते. लहान बाबास दोन मुलेच होती. मोठे जावई, निशाच्या पतीचे अचानक निधन झाले होते. तीन वर्षाच्या मुलाला मागे ठेवून संसार अर्धवट ठेऊन गेले. मोठ्या जबाबदारीतून निशाला जावे लागणार होते. माया मात्र सुखात होती फक्त देवाने त्यांना एखादे अपत्य द्यावे अशी सगळयांची अपेक्षा होती. कलेच्या घरची पररस्थथती बेताचीच होती. पहिल्या मुला नंतर बऱ्याच अंतराने दिवस गेले होते. कलेचा मुलगा फार भाग्यशाली निघणार हे भविष्य ह्यांनी जाण्या आधीच वर्तवले होते.

कलेच्या घरी खुलताबादला जायचे खरे तर माझ्या फार जीवावर आले होते. प्रकृती साथ देत नव्हती शिवाय ह्यांच्या नंतर घरचे सर्व व्यवहाराकडे रोजच्यारोज लक्ष देणे गरजेचे होते. गोपू काका एक दिवस दुपारी आले. चहा घेतांना सांगितले की गुरुजी नंतर तुमच्याकडे घराचे करते पण आले. येवढा पसारा सांभाळणे काही तोंडचा खेळ नाही. तुमच्या काळजीमुळे तुमची चारी मुले माझ्या घरी एक दिवस आली होती. विषय सरळ तुमच्याकडे काढणे त्यांना प्रशस्त वाटले नसावे म्हणून माझ्याजवळ विषय काढला. भाऊजी असा कोणता गंभीर विषय असू शकतो? काही नाही वहिनी, गुरुजी नंतर मुलांना स्वतःच्या पायावर उभे राहून कर्तुत्ववान बनून दाखवायचे आहे. भाऊजी मग त्याला माझी काय हरकत असणार आहे? चांगलेच आहे. देवाने बुद्धी दिली असावी. तसे नव्हे वहिनी, वेगवेगळया चुली मांडून वेगळे राहण्याला प्रत्येकाचा विरोधच आहे. मग काय उरले भाऊजी? आता तर तसेच रहात आहोत. नाही वहिनी, सगळे एकत्रच राहतील, पण गुरुजीचे वेगवेगळया बँकेत खाते होते असे बाळ म्हणाला. ती रक्कम एकत्र करून चारी भावांना सारखी वाटून मिळावी अशी त्यांची साधी सरळ अपेक्षा आहे.

भाऊजी तुम्हाला आमच्या घरातीलच एक सदस्य मानत आलो आहे नाही का? वेळप्रसंगी तुम्ही तातडीने धावत येऊन आमच्या कुटुंबाला मदत केली आहे, ती आम्ही कधीच विसरणार नाही. पण लक्षात घ्या, मनात काही तरी काळे बेरे असल्या शिवाय का बाळूने हा गंभीर विषय मला वगळून तुमच्या जवळ काढला. गुरुजी व मी एकमताने पैशाचे व्यवहार बघत होतो. मी कमी शिकलेली असले तरी व्यवहारात निपुण आहे. मी कोणावरच अन्याय होऊ देणार नाही. सगळी

माझीच लेकर नाहीत का? पण भाऊजी तिन्ही मुली पण माझीच लेकरे आहेत, त्यांचा हिस्सा देण्याचा विषय मुलांनी काढला का? नाहीच काढणार, मी ओळखला आहे त्यांचा कावेबाजपणा. चारी मुले, व तिन्ही मुलींना सारखा वाटा मिळेल, पण माझ्यासाठी जगण्यापुरते पैसे वेगळे काढून ठेवल्या नंतरच. आधी मी कलेकडे बाळंतपणाला जाऊन येते. मग बघू काय करावयाचे ते. भाऊजी कधी निरोप घेऊन गेले कळलेच नाही.

पाच तास एसटीचा प्रवास करून मी कलेकडे पोहचले. बस स्थानकावर जावई व कला घ्यायला आले होते. रिक्षाने घरी पोहचलो. कलेला व जावईबापूंना खूप आनंद झाला. सगळयात जास्त आनंद अमेयला माझ्या आवडत्या नातवाला झाला. मायेला मी दादरहून कलेच्या बाळंतपणात मदत म्हणून बोलवून घेतले होते. सायंकाळच्या रेल्वेने मायाला जावईबापू नी कलेच्या घरी पोहचवले. खूप दिवसांनी एकत्र भेटल्यामुळे सगळयाना खूप आनंद झाला होता. रात्रभर दोन्ही बहिणींच्या गप्पा चालूच होत्या. सकाळी निरोप घेऊन माईला जपून रहावयाचे सांगून जावईबापू दादरला रेल्वेने निघून गेले. कले ची मी व माया मनापासू न काळजी घेत होतो.

कले च्या दोन डिलिव्हरीमधे जास्त अंतर असल्याने डॉक्टरांनी जास्त काळजी घेण्यास सांगितले होते.

येवून आता आठ दिवस झाले होते. सगळेच आनंदात होते. लहान भाऊ येणार म्हणून अमेय आनंदात होता. शाळेतल्या सर्वच मित्रांना बातमी सांगून मोकळा झाला होता. रात्री १२ वाजता मी जावई बापूंना दवाखान्यात जाण्यासाठी रिक्षा आणण्यास सांगितले. त्यांनी वेळ ओळखून लगेच गल्लीच्या कोपऱ्या वरून रिक्षा बोलावली. रात्री एकवाजता डॉक्टर आले. मी, माया, व जावईबापूं दवाखान्याच्या वेटिंग रूम मध्ये बसलो होतो. अमेयला घरमालकांच्या घरी झोपवले होते. पेशंटची गर्दी बरीच होती. मधून मधून ऑपरेशन थीयटर मधून जगात नवीन प्रवेश करणाऱ्या बाळांचा कलकलाट ऐकुयेत होता. दोन वाजू न पाच मिनिटांनी मला आवाजावरून जाणवले कला बाळंत झाली. जावईबापूं द्या पेढे. सगळयांना आश्चर्य वाटले पण मी अनुभवाने आवाजावरूनच ओळखले होते. मग काय आनंदी आनंद झाला. सकाळी लौकरच जावईबापूं

अमेयला घेऊन आले. अमेय तर नाचतच होता. त्याने छोट्या भावासाठी बिस्किटचा पुडाच आणला होता. बाळ काहीच खात नाही म्हणून नाराज झाला.

पुढचे १५ दिवस कसे आनंदात गेले कळलेच नाही. घरी त्रंबकेश्वरला जाण्याची ओढ लागली होती. मुलांच्या मनातील पैशाच्या वाटणी बद्दल कळल्यापासून मी काळजीत होते, पण कोणालाही काहीही सांगू शकत नव्हते, माझी उलघाल कलाने ओळखली होती. मायला घेऊन जाण्यासाठी फोन केला, जावईबापूंना रविवारी मला त्रेम्बकेश्वरला घरी पोहचून येण्यास सांगितले. मी घरी गेल्यावर कलेला काहीही त्रास होणार नाही याची व्यवस्था करण्यास मी सुरुवात केली. जावईबापूंनी काळजीपूर्वक मला रेल्वेने नंतर रिक्षाने घरी आणून सोडले. माझे कोणीही विचारपूस केली नाही याचे मला काही वाटले नाही परंतु कलाच्या बाळंतपण कसे झाले, बाळ बाळंतीण कसे आहेत, बाळाची प्रकृती कशी आहे याबद्दल सुध्धा उदासीनता दाखवल्यामुळे मी नाराज झाले. माझ्या खोलीत जाऊन कॉट वर लवंडले. जेवण न केल्याने असेलं कदाचित पण अस्वस्थ वाटत होते. रात्री दोन वाजता बाबा पाणी पिण्यासाठी उठला, आईच्या खोलीतील लाईट चालू पाहून थांबला. खोलीत लाईटचे बटन बंद करण्यासाठी गेला. बघतो तर आई झोपलेली दिसत होती, जवळ ठेवलेला पाण्याचा भरलेला पेला उपडा झालेला होता. जवळ जाऊन बघीतले तर आईचे डोळे उघडेच होते. आरडाओरड करून बाबाने सगळयांना झोपेतून उठवले. बाळने लगेच डॉक्टरांना फोन करून बोलावले. डॉक्टरांनी तपासले, गंभीर चेहऱ्याने खोलीबाहेर आले. बाळला बाहेर येण्यास सांगितले. घरातील सर्वच मंडळी त्याच्या भोवती जमा झाली होती. डॉक्टरांनी सगळे संपल्याचे सांगून पुढची तयारी करण्यास सांगितले. आई हृदयक्रिया बंद पडून देवाघरी गेली होती. एकच रडारड चालू झाली. शेजारील, गल्लीतले सगळे कुटुंब लगेच जमायला सुरवात झाली होती.

मृत्यूनंतरचे जीवन असते का नाही हा वादाचा विषय असू शकतो. मृत्यूनंतरचे जीवनाचा अनुभव घेतल्या शिवाय यावर विश्वास बसणे शक्य नाही तसा आग्रह पण कोणी करू नये. मी शंकरराव भानोसे अजूनही मृत्यू लोकातच भरकटत होतो. कारणे शोधण्या इतकी विचारशक्तीची पातळी राहिली नाही हे खरे. काही कारणांनी गती न मिळालेला माझा अतृप्त आत्मा गावाभोवती,

माझ्या घराभोवती अजूनही भरकटत आहे. घडत असलेल्या सर्व घटनांचा मी एक सहभाग नसलेला अदृश्य साक्षीदार आहे. घडणाऱ्या घटना मी बदलू शकत नव्हतो, पण त्याचा अचूक अंदाज व होणाऱ्या परिणामांचे आकलन मला होत होते. पत्नीचा मृत्यू व घरात घडत असलेल् या घटना मी बघत होतो. सुख, दु:ख यासारख्या भावनांच्या पलीकडची माझी अवस्था होती.

सौ. च्या दशक्रिया विधीची प्रक्रिया सुरु होती. एक यंत्रवत सर्व कुटुंबीय दशक्रिया विधीत मग्न होते. घडत असलेल् या घटना फक्त बघत बसणे एवढेच मी करू शकत होतो. माझा कुठलाही हस्तक्षेप इच्छा असू नही शक्य नव्हता. दहा दिवसांनी सौ. ची मानवी जीवनातून मुक्तता होऊन मृत्यू लोकात प्रवेश होणार होता. पुढची गती ईथे आल्यावरच ठरणार होती. मृत्युसमइची सौ. च्या मनातील वेदना मला समजली होती. जिवंतपणी मी स्थावर, जंगम मालमत्तेची सारखी वाटणी मुले /मुली यांच्यामध्ये होण्यासाठी इच्छापत्र करणे गरजे चे होते, ते नकेल्याची खंत होती. सौ. ला पण हीच खंत होती. प्रत्येक आईवहिलांचा आपली मुले समंजस असतील असा विश्वास असतो. पण तसे होणार नसल्याच्या शंकेची पाल मनात चुकचुकत होती.

तिसऱ्या दिवशी राख सावरायला जाऊन आल्यावर सगळे हॉल मध्ये बसले होते. मुलींच्या चेहऱ्यावर माहेर संपल्याचे दु:ख ओसंडून वाहतांना जाणवत होते. चारी मुले पुढे कसे होईल या दडपणाखाली दिसत होते. बाळू काकाचे अधूनमधून येणेजाणे होते. थकलेले दिसत होते. घरासमोरच्या झाडावर माझे बस्तान होते. माझ्या सारख्या अनेक अतृप्त आत्मे चेहरा, आकार विरहीत आजूबाजूस जाणवत होते. गांध्मुक्ती विधी नंतर सौ. तातडीने माझ्या जवळ आली, रागाने वेडिपीसी झाली होती.

मला एकटीला सोडून यायची काय घाई झाली होती हो? नातवंडामधे कसे दिवस सुखात जात होते. मुलांची काळजीच आहे, सगळे तुमच्या आजोबां वर पडले आहेत, तापट अन मतलबी. तुम्ही सुटलात. इस्टेटीच्या सारख्या प्रमाणात वाटण्या करून दिल्या असत्या तर बरं झालं असते. मुली त्याच्या संसारात सुखी असल्या तरी माहेर संपणार. माहेरची फुल नाही तर फुलाची पाकळी मिळाल्यावर सासरी मान मिळतो, सगळयांना आनंद होतो, पण त्यांच्या नशिबात हे सुख आहे का? तुम्ही असताना मुलांच्या न कळत तिन्ही मुलींना गुपचूप प्रत्येकी दोन लाख रुपये दिले होते

हे फार चांगले झाले. नाहीतर ते पण त्यांच्या वाट्याला आले नसते. आपले पोर इतके आप्पलपोटी असतील असे कधीच वाटले नव्हते.

सगळे नातेबाईक आपापल्या घरी गेल्यावर वाड्यावर शांतता पसरली.

चौघांचे ही तोंडे चार दिशेला. कामापुरते बोलणे होत होते. पहाटे ४ वाजता बाळने सेन्ट्रल बस स्थानक गाठले. दादरच्या गाडीत बसला व निशाच्या सासरी निघाला. निशा घरी एकटीच होती. बाळने मिठाईचा बॉक्स दिला. निशान पहिल्यांदाच भाऊ घरी आला म्हणून जेवायला श्रीखंड पुरीचा बेत के ला. गोविंदचे जेवण झाल्यामुळे बाळला डुलकी लागली. दोनतासांची वामकुक्षी झाल्यावर निशाने चहा ठेवून घरच्या सर्वांची ख्यलीखुशाली विचारली. बाळने सावकाश विषय काढला. आक्का आता आईबाबा राहिले नाहीत. घराची सर्व जबाबदारी माझ्यावरच आहे. आता बाबांच्या नंतर उत्पन्न पण खूप कमी झाली आहे. मी निवृत्तीच्या जवळ आलो आहे. आईबाबांनी तुम्हा तिन्ही बहिणींना प्रत्येकी दोन लाख रूपये माझ्याच सांगण्यावरून दिले होते. तुम्ही तिन्ही बहिणी नेहमी सुखी रहाव्यात अशी आमच्या चारी भावांची इच्छा आहे. तुम्ही तिघींनी दरवषी गणपती उत्सव, महालक्ष्मी पूजा, आणि दिवाळीत कुटुंबासहीत हक्काने माहेरपणाला घरी नक्की नक्की यायचे आहे, देवाच्या कृपेने आणि आईबाबांच्या आशीर्वादाने तुम्ही तिघी बहिणी आनंदात सुखात आहात. फक्त आमच्या सर्व भावांची विनंती तुझ्या व दाजींना आहे, ती म्हणजे वडिलोपार्जित वाडा किंवा घरामध्ये तीघींना हिस्सा स्वेच्छेने नको असे लिहून द्यावे लागेल. घर तुमच्या तिघींचे पण पहिल्यासारखेच रहाणार आहे, तुमचे नेहमीच स्वागत असेल. कागदोपत्री आवशक्यता असल्याने तुम्हाला स्वाक्षरी करावीच लागणार आहे. अरे दादा इतक्या स्पष्टीकरणाची काय गरज. आपण रक्ताचे भाऊबहिणी आहोत. माझी खात्री आहे तुम्ही आम्हा तिन्ही बहिणींना कधीच अंतर देणार नाही. माझे हे कधीच विरोध करणार नाही. सांग तुला पाहिजे तिथे मी सही करून देते. बाळने हळूच बैग मधून बरोबर आणलेले कागदाचे वेटोळे बाहेर काढले. चष्मा लाऊन निश्याच्या नावाचे मालमत्ता हक्क सोडत असल्याचे प्रतीज्ञापत्र व पेन देऊन म्हणाला आईबाबांच्या आशीर्वादाने तुला काही कमी पडणार नाही. निशाने सही केली. दाजी घरी सायंकाळी येण्याची वाटही न पहाता बाळ परतीच्या प्रवासाला निघाला.

जवळ जवळ उपरोक्त संभाषणासारखेच संभाषण करून बाळला उरलेल्या दोघींची सही घेण्यात काहीही अडचण आली नाही. चारी भाऊ, चारी जावा हॉलमध्ये गंभीरपणे बसले होते. कुटुंबप्रमुख नात्याने बाळने सूत्र आपल्या हाती घेतली. बाळ आपल्या पत्नी बरोबर गुरुजींच्या हिशोबाच्या नोंद वह्या घेऊन बसला व बोलायला सुरवात केली. वाड्याचा प्रश्न मी सोडवला आहे. आता आपण चारच वाटे करीत आहोत. निशा, कला, व माया यांनी वाड्यावरचा हक्क स्वखुशीने सोडला आहे. वेगवेगळया बैकेत बाबांनी आईच्या नावावर साधारण दहा लाख रुपये ठेवले होते. मी बाबांना सांगून त्यांच्या मृत्यूच्या आठ दिवस आधी सर्व रक्कम काढून घरातल्या तिजोरीत ठेवायला सांगितले होते. कारण त्यांना मी मुंबईला कल्याण मध्ये सगळयांसाठी चार प्लॉट घेऊन बंगले बांधायचे सुचवले होते. त्याप्रमाणे त्यांनी केले. ती रक्कम आपण सगळे सारखे वाटून घेणार आहोत. पण उमेश व बाबाने यात सुधारणा सुचवली की निशाताई, कलाताई व मायाताईला पण आपण या पैश्यात समान वाट देऊ. बाबाच्या बायकोने सगळयांच्या हातात चहाचा कप दिला. बाळने उसासा घेतला. अरे वेड्यांनो, तुम्हाला कोणालाच माहिती नसणार, आईबाबांनी त्यांना आधीच प्रत्येकी दोन लाख रुपये आपल्या सगळयांच्या नकळत दिले आहेत. आता त्यांना काहीही देण्याची गरज नाही. आपल्याला मिळालेल्या हिस्यातून प्रत्येकाने बहिणींना जरूर मदत करावी त्याला कोणाचेही आडकाठी बंधन नाही. सगळयांचा विरोध संपला होता. आता बाळच्या पत्नीने बोलायला सुरवात केली. सासऱ्यांनी त्यांच्या मृत्यूपूवी प्रत्येक मुलाच्या नावाने वेगवेगळया तारखांना पोष्टातून वेगवेगळया रकमांचे राष्टीय बचत पत्र काढून ठेवले आहेत. त्याची नोंद या वही मध्ये केलेली आहे. प्रत्येकाच्या नावाने अंदाजे दहा लाखांचे राष्टीय बचत पत्र आहेत ते या नोंदी प्रमाणे प्रत्येकाने आपल्या ताब्यात घ्या. राहिले घरातील सोन्याचे, चांदीचे दागिने, भांडे, ईत्यादीचे वाटप आता आपण करणार आहोत. उमेश व बाबा अचानक बैठकीतून उठले. बहिणींनी काय घोडे मारले आहे. आईबाबांचे सगळयांवर सारखेच प्रेम होते. घरासाठी तिघींनी जीवापाड कष्ट उपसल्याचे आम्ही डोळयांनी बघितले आहे. आईबाबां असते तर त्यांच्यावर अन्याय होऊ दीला नसता.

सोने, चांदी दागिने व भांडे यात तिन्ही बहिणींना समान हिस्सा द्यायला पाहिजे असे ठणकावून सांगत दोघांनी मंदिराकडे जाण्यास प्रारंभ केला.

कालचक्र अविरत फिरतच होते. माझ्या व सौ. च्या मृत्यू नंतरच्या अस्तित्वाला काही अंत नसावा. घडणाऱ्या सर्व घटनांची फक्त जाणीव होत होती. तिन्ही मुलीवर होत असलेल्या

अन्यायामुळे वेदना होत होत्या, उमेश व बाबाच्या बहिणींबददल च्या भावना समजून समाधान वाटले, तसेच बाळ व अनिमेशचे वागणे दु:खदायक होते. काळानुसार प्रत्येकजण वयाने वाढत होते. वय वाढते तसे मनोवृतीत चांगला बदल होईलच अशी खात्री नसते. मुलांच्या सुखासाठी आम्ही पतीपत्नीने किती कष्ट उपसले होते याची जाणीव तिन्ही मुली सोडून कोणालाच नव्हती याचे दु:ख होते.

एक दिवस सकाळी बाबा, सुनबाई, दोन्ही नातू रिक्षातून सप्तशंगी देवीच्या दर्शनाला वणीला चालले होते. समोरून एक रिकामा ट्रक जोरात आला, रिक्षाला जोरदार धडक बसली, रिक्षा ५० फुट फरफटत जाऊन मोठ्या चिंचेच्या झाडावर आदळली. सगळेच संपले होते. रिक्षा चालकासहीत चौघांचे मृतदेह असंख्य तुकडे होऊन रस्त्यावर विखुरले होते. रस्त्यावर वाहनांची वर्दळ कमीच होती. परंतु अपघाताची दखल घेण्याचे सौजन्य कोणीच दाखवले नाही. जवळच्या गावातील गावकरी जमले. पोलीस स्टेशनला फोन करून अपघाताची माहिती दिली. ट्रकचालक पळून गेला होता. पोलीस जमले. पंचनामा झाला. तीन ॲम्बुलंस तातडीने आल्या. मृतदेह घेऊन ॲम्बुलंस सायरन वाजवत घरापाशी आल्या. घरातील कुटुंबाच्या दु:खाला पारावर नव्हता.

गल्लीतील, गावातील सगळेच लोक जमले. एकाच वेळी एकाच कुटुंबातील चार अर्थी उचलल्या गेल्या. सगळया रहिवाशांनी एकोपा दाखवत सर्व स्मशान विधी शात्रोक्त करून घेतले.

आम्ही घरासमोरील झाडावर बसून सर्व प्रकार निर्विकारपणे बघत होतो. सुख, दु;खा सारख्या भावनांचा निचरा झाला होता. आनंद,, राग, वेदना, जाणवण्याची स्थिती राहिली नव्हती. गोपू काकांचे अस्तित्व बाजूच्या झाडावर विसावले होते. काशीला तीर्थयात्रेला गेले तेव्हा तिथेच त्यांचा अपघाती गंगेत बुडून मृत्यू झाला होता. आता आपल्या सांत्वनाला कोण येणार असा प्रश्नच नाही कारण तशी गरज पण नाही, गोपू काकाने जवळच्या फांदीवर येउन् बसत बोलायला सुरवात केली. मोक्ष पाप्ती, मृत्यूनंतरचे जीवन, पुनर्जन्म हा सगळा भंपकपणाच असावा असे मलाच नाही तर माझ्या अनेक मित्रान्नापण वाटत होते. गुरुजी तुला काय वाटते? हे सर्व खरे असले तर आता आपल्याला पुनर्जन्म मिळणार का? पुनर्जन्म न मिळालेले कितीतरी आत्मे आसपास फिरतांना जाणवतात. आत्ताचे बाबाच्या एकाच वेळी सर्व कुटुंबाच्या मृत्यूचे उदाहरण घे त्यांना पुनर्जन्म हमळणार, मृत्यू लोकात भटकणार की पुढची गती मिळणार? या अवस्था हे परिवर्तन कसे होते? सामान्य माणूस जन्मआणि मृत्यू या दोनच घटना शाश्वत मानतो, यामधील

अंतर हेच मानवी जीवन. यानंतर काय होत असेल या फंदात कोणी पड्त नाही. अनेकांचा यावर विश्वासच नाही.

आता मला सांग गोपू तुझा पण जीवितपणी या गोष्टीवर विश्वास नव्हताच ना? यासारख्या अनेक विषयांचे अभ्यासाचे ग्रंथ आजोबांच्या संग्रही होते. मी अनेक ग्रंथाचे वाचन केले आहे. जन्म कोणाच्या पोटी होईल, कधी होईल, कुठल्या गावात, राज्यात, अथवा देशात/परदेशात होईल, जन्मा नंतर कन्या असू वा पुत्र, अश्या अनेक गोष्टीवर जसे कोणाचेही कंट्रोल नाही त्याच प्रमाणे, मृत्यू वरपण कोणाचे ही कंट्रोल नाही. मृत्यू कुठल्या वयात येईल, कुठल्या कारणांनी येईल, कुठल्या जागी येईल याबद्दल मानव नेहमीच अंधारात असतो. आपला कधीतरी मृत्यू होणार आहे, हा विचार स्वप्नात सुद्धा करण्यास मानव घाबरत असतो, त्यामुळे मनुष्य जीवनात शाश्वत असणाऱ्या या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. हळू हळू मृत्यूला घाबरेनासा होतो. सुखी होण्याच्या हवसं म्हणजे मृगजळाच्या मागे लागतो. जास्तीतजास्त पैसे/धन/संपत्ती मिळवणे मग कुठल्याही मार्गांनी असो जीवनाचे अंतिम ध्येय समजतो, त्यासाठी नातीगोती विसरतो, व सत्याचे ज्ञान होण्यासाठी ७०/८० वर्षांचे वय कमी पडते. आता मी तुझ्या एकएका शंकेचे निरसन करतो.

मृत्यू लोकातील अस्तित्व हे थोड्याच काळापुरते मर्यादित असते. मानवी जीवनात अनेक गोष्टीमध्ये जीव अडकलेल्या असतो. जसे पत्नी मध्ये, मुलांचे शिक्षन, लग्नकार्य, स्थावर, जंगम मालमत्ता, नातवंडे, लग्न झालेल्या पण संसारात सुखीनसलेल्या मुली, स्वात:हाची अपूर्ण राहिलेली इच्छा, जसे खूप पैसे, शेतीवाडी, जमीनजुमला, बंगला, कार, नोकरीत प्रमोशन. तसेच तुम्हाला कोणी फसवले असेल अथवा तुम्ही कुणाला फसवले असेल तर ती शाश्वत वलये तुमच्या भोवती घुटमळत असतात. मनुष्य जीवनात कशावरही केलेले कुठल्याही कारणाने केलेले अति प्रेम, तसेच कोणाशीही कुठल्याही कारणांनी केलेली दुष्मनी हे अडचणीचे ठरते. या प्रकारच्या सर्व भावनां पासून मुक्त होत नाही तोपर्यंत मृत्यू लोकात भरकटावे लागते. थोडक्यात संसार करावा नेटका, असे म्हणतात. संसारातील सर्वच जबाबदाऱ्या जसे मुलांचे शिक्षण, नोकरी अथवा त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देणे, त्यांचे लग्नकार्य, कुटुंबाला अचानक उद्भवलेल्या संकटांना

तोंड देण्यास मदत करणे, भविष्यातील अनपेक्षित अडचणींसाठी पुरेशा पैश्याची तरतूद करून ठेवणे. त्यानंतर स्वत:हाला संसारिक जबाबदारीतून हळू हळू मुक्त करून घेणे गरजेचे आहे. अवघड असले तरी आवश्यक आहे. अचानक येणाऱ्या मृत्यूला सामोरे जाण्या आधी, कुठलीही अपूर्ण राहिलेली जबाबदारी, भावभावना, राग, लोभ, तीव्र स्वरुपाचे मतभेद, टोकाची दुष्मनी इत्यादी गोष्टीचा त्याग करण्यात यश मिळवलेच पाहिजे. संसारात राहून संसारापासून अलिप्तता ठेवता आली पाहिजे. यासाठी पूर्वी वानप्रस्थाश्रमाची कल्पना होती. आता वनात जाणे शक्य नसले तरी घरात राहून सर्व संसारिक व्यवहारापासून अलिप्त राहणे शक्य आहे. त्यानंतर संन्यास. संन्यास घेतेवेळी जे संस्कार करण्यात येतात्त त्यात व मृत शरीरावर करण्यात येणाऱ्या संस्कारात बरेच साम्य आहे. संन्यास घेतल्या नंतर ती व्यक्ती परिवारासाठी एकप्रकारे मृत घोषित केली जाते, त्या व्यक्तीने आपले उर्वरित जीवन आत्मज्ञानासाठी, समाजकल्याणासाठी व्यतीत करणे अपेक्षित आहे. यात यशस्वी झाले तर मृत्यू लोकात फार काळ भटकत रहावे लागत नाही. पुढची गती मिळण्यास अडचणी येत नाहीत. मनापासून केलेली देवपूजा, हरिनामाचा अखंड जप, तीर्थयात्रा करत राहिल्यास संसारात राहून अलिप्त रहाता येईल. पण यात एकाग्रता असली पाहिजे, अन्यथा आपण कीती धार्मिक वृत्तीचे आहोत हे लोकांना कळावे म्हणून याचा उपयोग करतात, जे निष्फळ ठरते. एकांतात बसून आसपास घडत असलेल्या घटनांना विसरून उलटसुलट मनात येत असलेल् या विचारांच्या प्रवाहाला भक्तीमध्ये परिवर्तीत केल्यासच उच्चतम साध्य मिळवण्यात यश मिळते.

आपल्या धर्मातचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. मृत्यू लोकातून पुढची गती लाभलेले भाग्यवानच. त्यांना पुनर्जन्माच्या फेऱ्यातून मुक्तता मिळते, परंतु अनंत काळ जे आत्मे मृत्यू लोकात भरकटत असतात त्यांना पुनर्जन्म मिळतो. याचे अनेक दाखले उपलब्ध आहेत. पुनर्जन्म मिळणे मनुष्य जीवनातील सुखदु:खाचे, अनुभव पुन्हा घेणे. जसे परीक्षेत नापास झाल्यावर परत त्याच यत्तेतील अभ्यास परत वर्षभर पुन्हा करणे. पुनर्जन्माच्या फेऱ्यातून मुक्तता मिळवण्यासाठी हिंदू धर्मात भक्ती मार्ग सांगितला आहे.

गुरुजी तुझा हिंदुधर्माचा खूपच गाढा अभ्यास आहे. गोपू काकांना गप्प बसवे ना. कर्ताकरविता परमेश्वरच असतो म्हणतातना, मग तो सगळयानकडून चांगलेच कार्य होईल अशी बुद्धी सर्वांना का देत नाही, तसे झाल्यास पाप, दुर्बुद्धी सारखे विकार मनुष्य जीवनात येणारच नाहीत. मृत्यूनंतरचे जीवन असणारच नाही. तुला काय वाटते गुरुजी या कल्पनेवर. वेळ काळाचे काहीही बंधन नसल्यामुळे, तसेच बोलून थकण्याचा प्रश्नच नसल्याने गुरुजींनी ऊत्साहाने

बोलण्यास सुरुवात केली. परमेश्वराने मानवाला जन्म दिला, आत्मा, शरीर दिले, बुद्धी दिली, पण त्याचा वापर कसा करावा हे मानवाच्याच अखत्यारीत ठेवले. मानवाचा मृत्यू होणे अटळ ठेवले. आता परमेश्वराने इतके काही दिले, पण बुद्धीचा वापर मानवाने योग्य प्रकारे केला नाही तर त्याचे परिणाम त्याला भोगावेच लागतात. सन्मार्गाने, तारतम्याने, सद्विवेकेने बुद्धीचा वापर करून मानवपुनर्जन्मा पासून मुक्ती मिळऊ शकतो, नव्हे ते त्याचे जीवनाचे अंतिम ध्येयच असायला पाहिजे, मोह, माया, ईरशा, या भावना बुद्धीवर वर्चस्व मिळवतात, हवी होतात, सारासार विचार करण्याची वृत्ती नष्ट होते, क्षणिक मोहाच्या मृगजळा मागे धावण्यात जीवन संपून जाते, दुसऱ्यावर कुरघोडी करण्यातच मृत्यू कधी गाठतो समजतच नाही.

कालचक्र आपल्या गतीने अखंड फिरतच होते. रोजची जन्म मृत्यूची प्रक्रिया चालूच होती. स्मशानात शव पोहचवले जात होते. जमलेले लोक स्मशानभूमीत स्मशानवैराग्याने क्षणभर मोहमाया पासून अलिप्त होत होते. घरी जाऊन आंघोळ केली की परत रोजच्या व्यावहारीक जगात बुडून जात होते. सुखाच्या प्रत्येकाच्या कल्पना आपापल्या सोईनुसार वेगवेगळया असतात. सुख हे प्रत्यक्षात न दिसणारी व अस्तित्वात नसलेली बरीसची काल्पनिक वैचारीक पातळी आहे. त्यापर्यंत कोणी कधीच पोहचलेला नाही पोहचण्याची शक्यताही नाही कारण ही काल्पनिक स्थिती आहे. माणूस विचार करतो उद्या माझाकडे रेडीओ असेल मग मी सुखी होईल, मोटारसायकल, टीव्ही, घरबंगला, चांगली बँक शिल्लक, चांगली बायको, घराण्याचे नाव काढणारे मुले /मुली, चारचाकी गाडी, घरात AC, मग मी सुखी होईल, तसेच मोठी लॉटरी लागली, मी मोठा अधिकारी झालो, डॉक्टर, वकील, झालो, किवा आमदार खासदार झालो, एकटाच वारस राहून सगळी संपत्ती फक्त मलाच हमळाली तर, असे अनेक जर, तर असतात. जे कधीच पूर्ण होत नाहीत, जरी सगळे मिळाले असे क्षणभर मानले, तरी कोठेतरी, काहीतरी राहूनच जाते अन सुखी होण्याचे स्वप्नच राहते. सुख हे मानण्यावरच अवलंबून असते. म्हणून माणसाने नेहमी अल्पसंतुष्ट रहावे का? तर निशितच नाही, आपापल्या व्यवसायात, नोकरीत, तन, मन, धन ओतून प्रामाणिकपणे नियोजित काम करावे. जीवित असे पर्यंत अविरत कर्म करीत राहणे ही पण उच्चतम परमेश्वर पूजाच आहे. सर्व योग साधनांमध्ये कर्मयोगाला सर्व श्रेष्ठ स्थान आहे. आपले कर्म अखंडीत प्रामाणिकपणे करीत राहणे हाच कर्मयोग. कर्मयोगात सुद्धा अडचणी येणारच, त्यावर मात केली पाहिजे. गायकाने तनमनाने गावे, कलाकाराने कलेत जीव ओतावा, शिक्षकाने,

डॉक्टरांनी तसेच समाजातील प्रत्येक घटकाने मनापासून समाजसेवा समजून काम करावे असे लोकांना वाटत असले तरी आज अनेक कारणांनी तसे होतांना दिसत नाही.

घरामोरील सर्वच झाडे सरकारने रस्ता रुंदीकरणासाठी काढून टाकले होते. मी, सौ. व गोपू समोरच्या उंच पाण्याच्या टाकीवर विसावलो होतो. पहाटे चार वाजता उमेश उठला कपडे केले, कोणालाही काहीही न सांगता एक सुटकेस बाहेर गेला तो घरी परत कधीच आला नाही. सगळीकडे शोधाशोध झाली. पोलीस स्टेशनला हरवला म्हणून नोंद झाली. काहीही उपयोग झाला नाही. कायद्याने ७ वर्षा नंतर मृत घोषित केले गेले. मुलांनी आता वयाची साठी पण ओलांडली होती. वाडा ओस पडला होता. राममंदिराकडे पूर्ण दुर्लक्ष झाले होते. मोठ्या मुलीला टी. बी., दुसऱ्या मुलीची ओपन हार्ट सर्जरी झाली होटी. तिसऱ्या मुलीला अर्धांगवायूचा झटका आला होता. वयाच्या साठी नंतर उतारवयात या संकटांना सामोरे जावेच लागते. अशा परिस्थितीत बाबाच्या सर्व कुटुंबाच्या मृतुच्या १२ रा वर्षानंतर एक दिवस तीनही मुलींना स्पीडपोस्टाने कोर्टाच्या नोटीसी मिळाल्या. बाबाच्या कुटुंबातील सर्वांचा अपघाती मृत्यू होऊन बारा वर्ष झाली होती. बारा वर्षा नंतर काहीतरी दुष्ट हेतूने आता आमचे मोठे बंधू यांनी बाबाच्या संपत्तीचे सर्व भाऊच फक्त कायेशीर वारसदार असून तसे कोर्टात वारसदार आदेशासाठी अजव केला होता.

बहीणीनी पूवीच हक्क सोडला असल्याचे पुरावे देऊन, त्यांचा आता बाबाच्या संपत्तीत काहीच हक्क नसल्याचे अर्जात लिहिले होते. सौ. च्या रागाला पारावारच राहिला नाही. मी जीवित असते तर मुलींवर कधीच अन्याय होऊ दिला नसता. तिन्ही मुली मृत्यूच्या दारात होत्या. कोणालाच आईबाबांच्या संपत्तीतून एक पैशाचीही अपेक्षा कधीच नव्हती. पण या वयात तिघींच्या कुटुंबाला मानसिक त्रास होत होता. माझे ते माझे आहेच पण तुझे ते पण माझेच आहे ही वृत्ती आमच्या मुलांची झाली होती. कोर्टाने रेकॉर्डवर तीन बहिणींची नोंद पाहून त्यांना समन्स काढले. मुलामुलींचा वडिलांच्या संपत्तीवर लग्न झाल्यावर सुद्धा समान अधिकार कायद्याने दिला आहे. भारतातील सर्वच कायदे नागररकांच्या हक्काच्या सौरक्षणासाठी, फायद्यासाठीच बनवले आहेत, पण त्याच्या अंबलबजावणी नीट होत आहे की नाही याचा कोणीच विचार करत नाही ही खंत आहे. बहिणींचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकल्याशिवाय वारसा हक्क ठरवता येणार नाही अशी आदरणीय कोर्टाने नोंद केली.

काय म्हणावे या प्रकारच्या नीचतम भाऊबंदकीला. आमच्या दोघांच्या मृत्यूनंतर कोणी एकाही मुलांनी बहिणींची विचारपूस केली नाही. सुखात तर सोडा दु:खात सुद्धासाथ विचारपूस केली नाही. आमची खात्री आहे, मुलींच्या जवळ बसून प्रेमाने, कौतुकाने विचारपूस करून, त्यांनी बाबाच्या संपत्तीतील हक्क सोडून देण्याचे नम्रपणे सांगितले असते तर तिघींनी काहीही न वाचता एका क्षणात सही करून दिली असती, जशी फार वर्षापूर्वी सौ. च्या मृत्यू नंतर काहीही न वाचता त्यांनी सह्या केल्या होत्या.

आमचे पतीपत्नी चे दुर्भाग्यच की मृत्यू लोकातून पुढची गती मिळाली नाही. कुठे तरी मुलांवर योग्य संस्कार देण्यात कमी पडलो. मनुष्य जन्म सार्थकी की लागणे भाग्यातच असावे लागते. भाऊबंदकीचा शापच आमच्या घराण्याला असावा. भाऊबंदकीमुळे कोणीही सुखी होऊ शकत नाही हे सत्य पुढच्या पिढीला कळलेच पाहिजे. मानवाचे अवघे ८० ते १०० वर्षाचे आऊष्य. वयाचे २५ वर्षा पर्यंत शिक्षण, शरीर कमावणे, नंतर नोकरी अथवा व्यवसाय, कर्तबगारी दाखवण्याचे वय, वयाचे ३५ सी ते ६० पर्यंत जीवनातील उत्कर्षाचा काळ. हा सगळा अवधी स्वताचे हीत चिंतण्यात त्यासाठी प्रयत्नात खर्च केला तर दुसऱ्याचे अहित, दुश्वास, कपट करण्यास वेळच मिळणार नाही. स्वत:हाची मानसिकता अभाधित राहील. कुटुंबाला सुखात ठेवण्यात यश मिळेल. भाऊबंदकीचे दुष्परिणाम नंतर पुढच्या पिढीला भोगावे लागतात. ज्या घराण्यात जमीन, जुमला, स्थावर, जंगम ईस्टेट आहे तेथे भाऊबंदकीला जातीपातीचे बंधन नसते. ही कीड समाजाने प्रयत्न पूर्वक जबाबदारीने नष्ट केली पाहिजे. ज्या घराण्यात उपरोक्त काहीच कारण नसते, तेथे पण काहीही कारणा शिवाय भाऊबंदकी बघायला मिळते ती सगळयात मी हुशार, बुद्धिमान, श्रीमंत, मोठा, याप्रकारच्या भावनान्मुळेच. एकाच कुटुंबातील व्यक्ती वेगवेगळ राहतात. एकत्र कुटुंब पद्धती दुर्मिळ झाली आहे. कुटुंबात सुसंवाद नसतो, वर्षनुवर्ष एकमेकांचे तोंडही बघितली जात नाही.

पुढची पिढीतील मूले एकमेकांना ओळखतपण नाही. सुसंवाद, सहवासच्या अभावी जन्म, मृत्यू, सणवार प्रसंगीही एकत्र जमणे नसते. कॉम्मुनिकेशन ग्याप नाती नष्ट करतो.

हेल्दी समाज बनवण्यासाठी पिढीजात चालत आलेल्या भाऊबंदकीचे समूळ उच्याटन केले पाहिजे. ही वृत्ती दर्शवते माझे ते माझे तुझे ते पण माझेच.

गोपू काकांनी झाडाभोवती कमीतकमी ५० चकरा मारल्या. गुरुजींचे स्वगत त्यांच्या लक्षात आले होते. कर्म योगाचे महत्व असाधारण होते. फक्त विचार करण्याशीवाय दुसरे काहीही करण्यास मृतात्मा असमर्थ असतो. समाज परिवर्तनाची गरज आहे. ही गोष्ट अनेकांच्या तोंडून कानावरून गेली होती. काय असते हे नेमके समाज परिवर्तन? मानवाच्या अतिवेगाने होणाऱ्या प्रगती बरोबरच, भौतिक सुखात प्रचंड वेगाने होत असलेले मानसिक बदल. मानवाला आस्त्मक सूखापेक्षा भौतिक सुखाचे असलेले नैसर्गिक आकर्षण. हे अनेक कारणांपैकी दु:खाचे चे एक महत्वाचे कारण. नाण्याला जश्या दोन बाजू असतात तसे सुख आणि दु:ख एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जसे खूप उनातून चालल्या नंतर झाडाच्या छोट्याशा सावलीचे महत्व कळते,

तसेच अनेक दु:ख सहन केल्यावर सुखाची एक झळक स्वर्गसुखाचा आनंद देऊन जाते. काहीही कारणाने दु:ख भोगायला लागावे असे कोणालाच वाटत नसते. ते अपरिहार्यच असते. खूप काही मिळवण्याची अमर्याद हाव मनुश्याला सोडवत नाही. परिणामी जितके सुख पदरी पडायला पाहिजे तितके मिळतच नाही. अपेक्षाभंगाने दु:खाची सुरवात होते.

संसारातील नाते संबंध, समाजातील मित्र, परिवार, व्यावसाईक सम्बंध, यांच्याकडून अपेक्षांचे ओझे डोक्यावर मृत्यू पर्यंत वागवले जाते. या प्रकारच्या दुःखाला अंत नसतो. गुरुजी तू जाणकार होतास. मृत्यू लोकातून कधी सुटका होईल माहित नाही. तो पर्यंत तुझे विचार कळावेत. तुझ्या परिवारातील सदस्यांच्या अनंत दु:खद घटनांना पूर्णविराम मिळेल असे वाटत नाही.

अरे गोप्या पहिल्या यापासून तुला असलेली कुठल्याही वादविवादाची फार आवड. मृत्यू नंतरही तशीच कायम दिसते आहे. आमच्या मोठ्या मुलाने बाबाची संपत्ती लाटण्याच्या मार्गात कोर्टाच्या न्याय्य भुमिकेमुळे अडचणी निर्माण होत असल्याचे जाणवत आहे. कालचक्राचा वेग कमी झाला कारे बाबा? मानवी जीवनात अनेक स्थित्यंतरे होत असतांना आपण मात्र अस्थिर असल्यासारखे वाटते. तू उपस्थित केलेल्या विषयावर बोलतो. जसे जन्म, मृत्यू या अटळ घटना तसेच सातत्याने परिवर्तन होणे आवश्यक पण आहे. परिवर्तनानेच मानवाची प्रगती होत आहे. मानवाने प्रगतीला सामोरे जाणेच शहाणपणाचे आहे. विरोध करणे मूर्खपणाचे ठरेल. आधुनिक प्रगतीला सामोरे जात असतांना आपल्या मुळ संकृतीला विसरू नये. तरच मानसिक स्थिरता

लाभेल. आधुनिक प्रगतीमुळे उपलब्ध असलेल्या आधुनिक समाजात सुखी होता येईल. फारच साधे गणित आहे गोप्या. समाजात अत्यंत वेगाने होणारे बदलामुळे आपल्या वैयक्तिक जीवनात थोड्याफार प्रमाणात बदल होणारच. पण त्याचा अहतरेक नहोऊदेणे माणसाच्याच हातात आहे. शिक्षणाला महत्व देऊ नका, घरातील वडील मंडळींचा आदर करू नका, त्यांचा सल्ला दुर्लक्षित करा, चांगली संगत धरूनका, रोज नशापाणी करा, आजारी माणसांची सेवा करू नका, पतीपत्नीने एकमताने संसार करून मुलाबाळांचे संगोपन करू नका, कमी वयात, कमी श्रमात जास्तत जास्त, अथवा काहीही श्रम न करताच पैशाचे आयते गाठोडे मिळावे, असे कुठलेही व्यवहार प्रगतीशील समाजाला, जातीला, धर्माला अपेक्षित नाहीत. शिक्षण नम्र भाव शिकवतो आणि अतिपैसा अवास्तव स्वाभिमानाला जन्म देतो, ईगो निर्माण होतो, त्याचा कधीच अंत नसतो. परिणामी मनुष्य अस्थिर, चंचल स्वभावाचा बनतो. छोट्या, छोट्या सुखाच्या क्षणापासून वंचीत होतो. याचे खापर आईवहिलांनी चांगले संस्कार दिले नाहीत याला देतो. पण त्यांनी दिलेल्या मार्गदर्शना प्रमाणे जीवनात आपण वाटचाल करीत आहोत का?

या प्रश्नाला उत्तर नसते.

ते बघ बाळचा मुलगा निशाच्या मुलाला घेऊन कुठे चालला आहे? अरे तो तर लिकर बार. बियरचे सेवन चालले दिसते. पैसा तर बापाच्या बापाचाच खर्च होत आहे. वाईट सवई शिकवतो आहे. हजतें द्रला वींल नाहीत, आपलेपणासाठी भुकेला आहे. त्याचा गैरफायदा घेतांना दिसत आहे. मोबाईलवर सारखे कुणाशी तरी बोलत आहेत. बियरची ओर्डेर रिपीट केलेली आहे. कुणाची तरी वाट पहात आहेत. तो पहा समोरून उमेशचा मुलगा जीवन येत आहे. आता तिघांची बैठक रंगतदार बनली आहे. श्रीमंती षोक पुरे करण्यात धन्यता मानली जात आहे. असे किती दिवस चालले आहे देव जाणे?

विना परिश्रम मिळालेले पैसे खर्च करण्यात दु:ख ते काय असणार बरे?

गोपीकाका चितना मध्ये मग्न होते. गुरुजी तू जिवंत असताना फारमोठी चूक केलेली आहेस. एवढी मोठी संपत्ती तू व वहिनीनी जीवापाड कष्ट करून पुढच्या पिढीच्या भविश्याची तरतूद म्हणून करून ठेवली. त्यामुळे मुले निष्क्रिय झाले. जीवन जगण्याला जरुरी असल्यापेक्षा जास्त

पैसा हाती आला. त्यांनी पैसे कमविण्याची धडपड बंद केली. स्वर्ग सुख दारी चालन आले होते. फक्त उपभोग घ्यायचा होता.

ते कार्य मात्र अखंडित चालू होते. पैशाचे इनकमिंग बंद होते, औटगोइंग मात्र चालूच होते कधीतरी तळे आटणारच याची त्यांना कल्पनाही नव्हती.

गोपी अरे भोग असतात ते भोगल्या शिवाय सुटका नाही असे म्हणतात. ते खरे नसावे. गुरुजींनी सुरुवात केली. आपणच आपल्या चुकांचे समर्थन करण्यासारखे आहे. भोग भोगायचेच असतील तर पाप कर्म करण्यापेक्षा पुण्य कर्मच का नाही करायचे, पदरमोड करून पुण्य कर्म करण्याची गरज नाही. जीवनात आपले विहित कर्म करीत असताना कोणावरही अन्याय होणार नाही, कोणाचे मन दुखावले जाणार नाही, कुणाच्याही मजबुरीचा गैर फायदा घ्यायचा नाही, कोणाचीही फसवणूक करायची नाही, कोणालाही चुकीचा सल्ला देऊन वाईट मार्गाला लावायचे नाही, एवढे केले तरी पुरेसे आहे. उपरोक्त कर्म न करणे म्हणजेच पुण्य कर्म केल्यासारखेच आहे. वेगळे असे काहीच नाही.

गोपी आता कलेच्या संसाराकडे बघ. कर्म योगावर जावयांचा फार विश्वास. अर्थार्जन कमी असले तरी कलेने संसाराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अर्धांगिनी म्हणून असलेली साथ फार महत्वाची. जावयांचे पुजाआर्च्ना मध्ये मनरमतांना दिसत नाही. याउलट कला आपल्या आईसारखीच फार धर्मिक वृत्तीची. अनेक अडचणींवर मात करून मुलांवर योग्य संस्कार, त्यांचे उच्च शिक्षण स्वकष्टाने केलेले स्वतुःचे घरची गरिबी असली तरी त्यातच सुख मानून त्यातूनच मार्गक्रमण करण्याची सवय. मोठा मुलगा डॉक्टर झाला, स्वतुःचा दवाखाना काढला सून इंजिनियर मिळाली, दोन जुळया गोंडस नाती झाल्या. लहाना अमर केरळ मध्ये मोठ्या कंपनीत काम करतो.

मुलीसाखीच प्रेमळ सून मिळाली आहे. अजून सुख म्हणजे काय असते? शाररीक व्याधी उतारवयात येणे अपरिहार्यच आहे. ते कुणालाच सुटत नाही.

गोपी तुला आठवत असेल आपण सर्व मित्रमंडळी सायंकाळी गावातल्या चावडीवर किती गप्पा मारायचो. विषय अनेक असायचे. आपले मित्र सर्व जातीधर्माचे होते. मनात दुरावा नव्हताच. चांगले संस्कार माणसास अनेक संकटात, मार्गदर्शन, मदत करतात.

चांगले संस्कार होणे हे कुठल्याही जातीवर अवलंबून नसून कोणत्याही जातीच्या आईवहिलांनी आपल्या मुलांनी जीवनाच्या प्रवासात काय चांगले करावे काय करू नये याचे स्वानुभवाने मार्गदर्शन करणे आवशक् असते, जसे वाईट संगत टाळणे, नशा न करणे, दुसऱ्याचा अपमान होईल, मनाला लागेल असे न बोलणे. जात जी जातच नाही ती, जात ती जी अपघाताने मिळते, कोणाच्याही इच्छेने नाही. कोणाच्या पोटी जन्मघेतल्यावर चांगले संस्कार तर कोणाच्या पोटी जन्म घेतल्यावर वाईट संस्कार मिळतात असा काही नियम नाही. अमेरिकेतील अती श्रीमंत दाम्पत्याच्या घरी जन्म मिळावा असे कोणाला वाटणार नाही, असे अनेक उदाहरणे देता येतील जिथे उच्च कुळात जन्म घेऊन सुध्धा लाजिरवाणी संतान निपजली आहे, तेथेच दोन वेळेची खायची भान्त असलेले गरीब कुटुंबातील संतान जीवनात गौरवाचे काम करतात, भारतमाते साठी, आपल्या समाजासाठी जीवाची पर्वा करीत नाहीत, आपल्या कुटुंबाचे जीवनमान उन्चवतात पण त्याच बरोबर आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करत असतात.

दुसरीकडे उच्च कुळातील संतान आपल्या समाजाचे सोडाच स्वतुःच्या कुटुंबातील व्यक्तींचे पण नुकसान करण्यास मागे पुढे पहात नाहीत. कोणाचीही उन्नती मुळात परमेश्वराने कुठलेही उद्दिष्ट डोळयासमोर ठेऊन केलेली नसून त्या त्या वेळेच्या समाजाने कर्मावर आधारित ( करीत असलेले कार्य) चार वर्णाची घोषणा पूर्वजांनी केली होती. जसे रक्षण करणारे क्षत्रीय समाजाचे- सर्वांचे संकटापासून रक्षण करणे, व्यापार करणारे वैश्य- समाजतील रोजच्या कौटुंहबक गरजा भागवणे, ब्राह्मण- समाजाला विद्या-अभ्यास, नीती-अनीती इत्यादी घडामोडी बद्दल अवगत करणे, आर्थिक, आत्मिक, अध्यात्मिक आचरणाचे मार्गदर्शन करणे ईत्यादी. क्षुद्र( खरा शब्द शुद्ध) – याचा नंतर अपभ्रंश झाला)- समाजासाठी कुठले ही कार्य करणे. या कार्यात कालप्रवाहात सामाजिक शिक्षणिक आर्थिक सरमिसळ झाली आहे तर नाही ती झालीच झाली पाहिजे, कारण समाजात योग्य स्थान मिळवण्यासाठी तुमचे कर्मच कामाला येते, जात नाही.

पण असे होत असतांना दुसऱ्याच्या जातीबद्दल नेहमी आदर भाव असणे अत्यंत आवश्यक आहे. तरच या सरहमसळीचा अंत हळूहळू समाज परिवर्तनाला मदत करेल, नाहीतर फक्त बरोबरी करण्यासाठी किवा आपले श्रेष्ठत्वसिद्ध करण्यासाठी कुमार्गाचा अवलंब केल्यास बंधुभाव संवेद्रेस प्रचंड तडा जाऊ शकतो व सर्वच क्षेत्रात समाजाची, देशाची पीछेहाट व्हायला वेळ

लागणार नाही. आरे गोप्या असा हसू नकोस, मी काही कुणाला उपदेश करीत नाही. माझ्या मुलांना चांगले संस्कार देण्यास मी कमी पडलो की काय याची खंत वाटते, पण फक्त मीच नाही तर सगळया जाती उपजाती मध्ये माझ्यासारखे दुदैवी महाभाग सापडतीलच की. पण होते काय बघ. मुले कुटुंबात जेव्हडा वेळ काढतात त्यापेक्षा जास्ती वेळ शाळा व इतर मुलांमध्ये, घराबाहेर काढतात. त्यामुळे त्यांच्यावर बाहेरचे संस्कार होण्याचे प्रमाण घरच्या पेक्षा जास्ती असू असते. समाजातील काही लोकांचा विचित्र स्वभावधर्म असतो, जसे एक माणूस झाडाखाली सावलीत केळी खात बसलेला असतो, केळीचे सालरोडवर फेकून देतो, समोरून येणारा माणूस केळीच्या सालावरून घसरून पडतो, त्याची फजीती पाहून त्याला प्रचंड आनंद होतो आनंदाने नाचायला लागतो. त्याला असे करून वैयक्तिक काहीही फायदा झालेला नसतो. पण विकृत आनंद मिळतो. समाजात अश्या लोकांची कमी नाही. तेव्हढ्यासाठीच आपल्या कडून कळत, नकळत दुसरा दुखावला जाणार नाही, कोणाचे वैयक्तिक नुकसान होणार नाही, दुसऱ्याला चुकीचा सल्ला दिला जाणार नाही याची दक्षता प्रतेकाने जातपात विसरून

घेतली पाहिजे. एकाच समाजाने सुधारण्याचा प्रयत्न करणे व दुसऱ्या समाजाने विरोध करणे झाल्यास सुधारणाच काय पण अस्तित्व पण धोक्यात येऊ शकते हे माझ्याच घरचे उदाहरण आहे.

एके काळी सदा आनंदाने किलबिल करणारा गोकुळासारखे भरलेला आमचा वाडा आता भकास दिसतो आहे. रात्रीच्या वेळीही भयाणता अजून जाणवते. लोकांचे येणे जाणे संपले आहे. जेथे नाती संपतात तेथूनच पुढे बुद्धीचा ऱ्हास होण्यास सुरुवात होते. जे आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी जवळच्या नातलगांचा बळी देण्यास मागेपुढे पहात नाहीत, त्यांच्या अस्तित्वाचा समाजाला धोकाच असतो. ही एक प्रकारची कीडच असते. अशी कीड संगोपनास कुठल्याही विशिष्ट जातीपातीचे बंधन नसून, जिथे संस्कार विरहीत स्वभावाची पट्टी डोळयांवर बांधलेली असेल तेथे या किडीचे अस्तित्व झपाट्याने वाढीस लागते. अशा परिस्थतीत समाज उन्नती मृगजळासारखी असून ऱ्हासाची सुरुवात झालेली असते. जीवनात आपले निश्तित असे ध्येय असावेच. पण ध्येय गाठत असतांना त्याच्या इतकेच महत्वाच्या इतर जबाबदाऱ्या, संस्कारांकडे दुर्लक्ष करून चालत नाही. मुलांच्या भविष्याची तरतूद व सुखासाठी मी खूप कष्ट करून पैसा साठवला. ध्येय जरूर गाठले. पण पुरेसे चांगले संस्कार देण्यात नापास झालो. दुसऱ्यांनी यापासून धडा घ्यावा. मी तसा गरिबीतच राहिलो, ठरवले असते तर श्रीमंतीचा उपभोग मी व सौ. करू

शकलो असतो. माणसाची श्रीमंती ठरते त्याला किती लोकांचा समुदाय स्मशानभूमीत पोहचवण्यास जमतो त्यावर, न की त्याने कीती धनसंपदा जमवली आहे यावर.

गुरुजी अश्या विपरीत परिस्थितीत काहीतरी उपाययोजना असेलच ना?

आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी आपल्या घरादाराची होळी करणाऱ्यांची पण अनेक उदाहरणे आहेत. हीच भारतीय संकृती आहे. इतिहासात अनेक राजघराणे भाऊबंदकीमुळे लयास गेल्याची उदाहरणे आहेत. पण त्या पासून कोणीही काहीही धडा घेतल्याचे दिसत नाही.

असो. सौ. ला कधीच पुढची गती मिळाली आहे. आपल्या दोघांचे पण अस्तित्व कमालीचे विरळ झाले असून मृत्यू लोकातून काही क्षणातच पुढची गती लाभणार आहे. आपले उपरोक्त व्यक्त केलेले विचार हे शरीर नसलेल्या मनांमध्ये धुसणारे वादळेच ठरवीत ना? कुठल्याही जीविंत मानवाच्या नजरेत आपले अनुभवाचे विचार मनात येण्याची, समजून घेण्याची, प्रत्यक्षात आणण्याची शक्यता नाहीच. यापेक्षा अजून काहीही करणे आपलया हातात नसले तरी नुसते चागले चिंतणे आपल्याला नक्कीच शक्य आहे. ठेच लागल्या शिवाय शहाणपण येत नाही म्हणतात तसेच समाज सुधारण्याच्या अफाट कल्पना सुचण्यासाठी मनुष्य देह सोडवा लागला ही किती दुदैवाची गोष्ट आहे?

गुरुजी, गोपीकाकांनी कुठल्यातरी विचारात बोलण्यास सुरवात केली. जन्म, मृत्यू, सुख-दु :ख, सर्वच समाजात, जातीपातीत समान आहेत. जातीपाती नुसार त्याचा प्रभाव कमीअधिक होत नाही कारण ते परमेश्वर निर्मित असून मनुष्य निर्मित नाहीत. परमेश्वराने इतर पशुपक्षा प्रमाणे मानवाची निर्मिती केली. समाजव्यवस्था मनुष्य निर्मित आहे. असे आहे तर सर्व जातींमध्ये सर्व श्रेष्ठ जात कुठली?

गोपी फारच साधे उत्तर आहे. आपण आपल्या शरीराचे उदाहरण घेऊ, जे समाजातील सर्व जाती मध्ये समान आहे. डोके, हात, पाय, हृदय, मेंदू, नाक, कान, रक्त, तांबड्या, पांढऱ्या पेशी, राग, लोभ, चिंता, प्रेम, आपल्या कुटुंब, मित्र परिवार, आपल्या गावाबद्दल, देशाबद्दल असलेले

प्रेम, सर्वच सारखेच आहे. या शरीररूपी यंत्रात काही अवयव नसले तर? किंवा असून काही कारणांनी निरुपयोगी झाले तर? होणाऱ्या यातना समान आहेत.


मी या जातीचा आहे म्हणून मला जास्ती यातना होतील व तो दुसऱ्या जातीचा आहे म्हणून त्याला कमी यातना होतील असा फरक आहे काय? नाही. आपण सायकल चालवतो. सायकलला दोन चाके, दोन पायडील, अन ब्रेक असतात. समजा ब्रेकने काम केले नाही तर काय होईल? अपघात. जीतीधर्माचे तसेच आहे. त्यात कोण श्रेष्ठ आहे हा विचार करण्या पेक्षा, समाज अस्तित्व व उन्नतीसाठी सर्वच जातींची समान गरज आहे. सर्वच आपल्या जागी श्रेष्ठच असतात. देवळाला पायऱ्याच नसत्या तर देव दर्शनाला जाता आले असते का? ज्या पायरीमुळे देव दर्शन सुलभ होते, ती पायरी सुद्धा देवा इतकीच महत्वाची नाही का? शरीरातील मेंदू सर्वच अवयवांवर कंट्रोल ठेवणारा राजाच म्हणावा लागेल. पण हृदयाने काम करणे बंद केले तर? मृत्यू अटळ आहे. समाजाचे तसेच आहे. सर्वांनी एकत्र राहून, मतभेद विसरून समाज उन्नतीसाठी काम केल्यास खऱ्या अर्थाने निरोगी समाज निर्माण होईल, अन्यथा समाज विघटन अटळ आहे, आणि त्याची झळ सर्वांनाच समान बसणार आहे. जातीजाती मध्ये उच्च नीच असे भेदभाव वाढून पुढच्या अनेक पिढ्यांवर अनुचित परिणाम होणार असतील, सज्जनांचे मनोबल खचून न देता गुण्यागोविन्दाचे साम्राज्य शांतता प्रस्थापित करण्याची गरज वाटेल, कारण कोणालाच कोणाचा धाक रहाणार नाही. समाज उन्नती साठी काय चांगले काय वाईट असा विचार लोप पावेल, फक्त मी, माझे, आमचे कसे खरे ही मनोवृत्ती वाढीस लागेल, त्यावेळी जातीविरहित स्माज्व्यास्थेकडे आपोआप लोकांचा कल वाढेल. राजवट, शासने करवट घेतील, नव्हे जागतिकीकरणाच्या प्रवाहात तसे करणे भाग पडेल.

कधी कधी प्रश्न पडतो गोपी, कुठले ही पाप कर्म न करणारा, सरळ मागी माणूस अनेक दु:ख भोगत असतांना दिसतो, परंतु अनेक लांड्या लबाड्या, फसवणूक, करून सुद्धा आनंदी जीवन जगणा दिसतात. असा फरक का? गुरुजी माझी परीक्षा बघतात का? तुमचे म्हणणे मुळातच चुकीचे आहे, कसे ते पहा. सरळ मार्गी माणूस अनेक दु :ख भोगत असतां ना दिसतो ती भोतिक सुखाच्या मागे लागल्यास क्षणिक स्वरूपात येणारे दु:ख असतात जेदुसऱ्याबरोबर तुलना केल्याने तीव्रतेने जाणवतात.

या उलट, लांड्या, लबाड्या, फसवणूक, करून सुद्धा आनंदी जीवन जगणारे दिसतात क्षणिक असते. त्यांना रात्रीची निवांत झोप लागत नाही. अनेक व्याधी, होतात त्यातून मुक्तता नसते.

कुटुंबाकडे लक्ष देण्यास पुरेसा वेळ असतो. धनसंचय करण्यात जीवन संपून जाते. चीता फक्त एकदाच मृत्यू नंतर मनुषाला जाळते, परंतु चिंता जिवंतपणी मनुषाला रोजच अग्नीदाह देत असते. मग सांगा सुखी, आनंदी कोण?

गोपी व माझी संवाद पातळी कमी कमी होत गेली. भावनांनी वेढलेले दोन गोळे वातावरणात विलीन झाले.



-समाप्त-

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. सुरेंद्र पाथरकर यांचे ईसाहित्यवर हे दुसरे पुस्तक.**

सुरेंद्र पाथरकरकर हे एक जुने जानते लेखक. आयुष्याच्या चडौतारांचा विलक्षण अनुभव पाठीशी असलेले. आणि या अनुभवांना कलात्मक रूप शब्दरूप देऊन ते आपल्या कथा सादर करतात. त्यांच्या कथांवरचे “या कथा काल्पनिक आहेत” हे वाक्य लिहावे लागते इतक्या त्या खऱ्याखुऱ्या वास्तव जीवनाशी निगडित असतात. सुरेंद्र पाथरकरांसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. कर्मयोग असतो. त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर (चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (४ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) , सुरेंद्र पाथरकर (२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।